# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग-१ : राज्यशास्त्र

# सार्वजनिक धोरण

## (Public Policy)

**सत्र २ : पेपर DSC-4**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१९

सुधारित आवृत्ती : २०२३

सुधारित आवृत्ती : २०२४

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर DSC-4

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-06-9

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र**

अध्यक्ष – **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या आवश्यक पेपर क्रमांक DSC-4 सत्र दोन साठी 'सार्वजनिक धोरण' हे सुधारित पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सार्वजनिक धोरण यामध्ये सार्वजनिक धोरण, सार्वजनिक धोरणातील दृष्टिकोन, सार्वजनिक धोरण निर्मिती आणि अंमलबजावणी व भारतातील सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, मानवविज्ञान विद्याशाखा माजी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. रविंद्र भणगे, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.


■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. शिवाजी पाटील**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. वर्षा मुरलीधर पोतदार**<br>श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी | १ |
| **डॉ. संतोष प्रभाकर कावडे**<br>आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा | २ |
| **डॉ. जयश्री कांबळे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २, ३ |
| **श्री. दिपक सर्जेराव पाटील–शेटके**<br>लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा | ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. शिवाजी पाटील**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | सार्वजनिक धोरण | १ |
| २. | सार्वजनिक धोरण निर्मिती आणि अंमलबजावणी | २२ |
| ३. | भारतातील सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण भाग–१ | ४४ |
| ४. | भारतातील सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण भाग–२ | ६२ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**सत्र २ : घटक १**

# सार्वजनिक धोरण

**(Public Policy)**

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ सार्वजनिक धोरणाचा अर्थ
- १.२.२ सार्वजनिक धोरणाचे स्वरूप
- १.२.३ सार्वजनिक धोरणाची व्याप्ती
  - १.२.३ (अ) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न
- १.२.४ सार्वजनिक धोरण विद्याशाखेचा विकास
  - १.२.४ (ब) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न
- १.२.५ सार्वजनिक धोरणाचे महत्त्व
  - १.२.५ (क) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न
- १.२.६ सार्वजनिक धोरणाचा वैचारिक पाया
  - १.२.६ (ड) स्वयं अध्ययन प्रश्न

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## १.० उद्दिष्टे

- सार्वजनिक धोरणाचा अर्थ, स्वरूप आणि व्याप्ती समजावून घेणे.
- सार्वजनिक धोरण विद्याशाखेचा विकास स्पष्ट करणे.
- सार्वजनिक धोरणाचे महत्त्व स्पष्ट करणे.
- सार्वजनिक धोरणाचा वैचारिक पाया समजावून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

अमेरिकेमध्ये राज्यशास्त्र या विद्याशाखेमधून सार्वजनिक धोरण ही उपविद्याशाखा उदयास आली. १९७३ मध्ये अमेरिकन पोलिटिकल सायन्स असोसिएशनने राज्यशास्त्राच्या आठ उपविद्याशाखा सुचविल्या आहेत. यापैकी 'सार्वजनिक धोरणः जडणघडण व आशय' या प्रकारची एक उपविद्याशाखा सुचविली आहे. आधुनिक राजकीय विश्लेषणामध्ये या विद्याशाखेच्या उदयाची बीजे आहेत. डेव्हिड इस्टन यांनी राज्यशास्त्राचा 'धोरण विश्लेषण' हा आशय असावा, अशी भूमिका घेतली होती. हेरॉल्ड लास्वेल आणि येहेझ्केल ड्रॉर यांनी ज्ञानक्षेत्राशी या उपविद्याशाखेचा संबंध जोडला आहे. राज्यशास्त्राने या विषयाकडे केवळ लोकप्रशासनाची उपविद्याशाखा म्हणून दुर्लक्ष केले. परंतु जेव्हा अमेरिकेत राज्यशास्त्रापासून लोकप्रशासन वेगळे झाल्यावर खऱ्या अर्थाने राज्यशास्त्राने सार्वजनिक धोरण या उपविद्याशाखेचा शैक्षणिक पातळीवर अभ्यास सुरू केला.

शासनसंस्थेइतकी जुनी 'सार्वजनिक धोरण' प्रक्रिया आहे. कारण सरकार किंवा शासनाच्या स्थापनेपासून 'सार्वजनिक धोरण' आखणी प्रक्रिया सुरू झाली आहे. अल्पजनसत्ता, उमरावशाही, जुलूमशाही, लोकशाही अशा सर्व प्रकारच्या शासनव्यवस्थांमध्ये धोरण-आखणी व धोरणांची अंमलबजावणी केली गेली आहे. नागरिकांकडून केलेल्या मागण्या व निर्माण झालेल्या समस्यांच्या संदर्भात शासन जे धोरण आखते, त्यास 'सार्वजनिक धोरण' असे संबोधिले जाते. म्हणजेच शासन व सार्वजनिक धोरण यांचा सहसंबंध असतो हा मुद्दा सार्वजनिक धोरणाच्या आरंभापासून असलेला दिसतो. नागरिकांकडून येणाऱ्या मागण्या व त्यावर शासनाने घेतलेला निर्णय हा मुद्दा राजकारणाशी संबंधीत आहे. यामुळे सार्वजनिक धोरण व राजकारण यांचा संबंध सार्वजनिक धोरणाच्या अभ्यासक्षेत्रात येतो. धोरणनिश्चितीची प्रक्रिया हा कृतिप्रवण राजकारणाचा एक भाग आहे. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकीय अर्थशास्त्र, धोरण विश्लेषण, सार्वजनिक व्यवस्थापन आणि कार्यक्रम मूल्यमापन इ. सामाजिक शास्त्रांमध्ये 'सार्वजनिक धोरण' या विद्याशाखेचे आधार मिळतात. परंतु प्रामुख्याने राज्यशास्त्र व लोकप्रशासन या दोन विद्याशाखांमधून ही नवी शाखा पुढे आली आहे.

'सार्वजनिक धोरण' या संयुक्त संकल्पनेमध्ये 'सार्वजनिक' व 'धोरण' अशा दोन भिन्न संकल्पनांचे एकत्रीकरण झालेले आहे. सार्वजनिक हा शब्द लोक किंवा जन या अर्थाने वापरला जातो. 'लोकांसाठीचे धोरण' असा या संयुक्त संकल्पनेचा अर्थ होतो. सार्वजनिक शब्दाला इंग्रजीमध्ये 'Public' असे म्हणतात. या इंग्रजी शब्दाची व्युत्पत्ती चौदाव्या शतकात झालेली आहे. लॅटिन भाषेत Publicus असा शब्दप्रयोग या काळात केला गेला. त्याचाच अपभ्रंश होऊन Populus असा शब्द निर्माण झाला. अँग्लो-फ्रेंच भाषेत हा शब्द Publique असा वापरला जाऊ लागला. तोच इंग्रजीत Public असा रुढ झाला. मराठीत या शब्दासाठी सार्वजनिक किंवा सार्वत्रिक असा शब्द वापरला गेला. जन, लोक ही उपनामे देखील या शब्दाकरिता वापरली जातात. देशातील जनतेकरीता हा शब्द वापरला जातो. जे समाजरुचीशी निगडीत आहे, मानवी व राष्ट्रीय कल्याणाशी निगडित आहे, जे सामाजिक आहे, लोकवित्त व शासकीय वित्त याच्याशी संबंधित आहे ते, ते सर्व सार्वजनिक असते.

'सार्वजनिक हा राष्ट्रातील लोकसंख्येचा परस्परसंबंधी अभिरुची, गुणवत्ता असलेला लोकांचा गट असतो' असा अर्थ माल्कम वेबस्टर शब्दकोशामध्ये दिलेला आहे.

**धोरण ही संकल्पना**

शासनाच्या कार्यासाठी मार्गदर्शक असणारी क्रिया म्हणजे धोरण होय. शासनाची कार्य करण्याची पद्धत म्हणजे धोरण होय. धोरण या शब्दाला इंग्रजीत 'Policy' हा शब्द वापरतात 'Policie' या मूळ लॅटिन भाषेतील शब्दापासून या शब्दाची निर्मिती झाली आहे. पंधराव्या शतकापासून हा शब्द प्रचलित आहे. प्राचीन कालखंडात 'धोरण' हा शब्द प्रचलित होता असे दिसून येते. वेद-पुराणे, स्मृती, ब्राह्मणके, उपांगे इत्यादी अतिप्राचीन ग्रंथांमध्ये हा शब्द सापडतो. ''बहुपर्यायांमधून व परिस्थितीतून विद्यमान व भविष्यकालीन निर्णयांना मार्गदर्शन करण्याकरिता निवडली गेलेली कार्यवाहीची पद्धत म्हणजे धोरण'', अशी व्याख्या माल्कम वेबस्टर शब्दकोशामध्ये करण्यात आलेली आहे. शासनाची सामान्य ध्येये व उद्दिष्ट गाठण्याकरिता सर्व प्रक्रियेचे उच्च पातळीवरील नियोजन म्हणजे धोरण होय. सार्वजनिक प्रशासन शब्दकोशामध्ये 'धोरण' हा शब्द राजनीती, कार्यकुशलता या अर्थाने वापरला आहे. मॅक्व्हली यांच्या मते, 'धोरण हा सत्तेचा आधार असतो'. डेव्हिड इस्टर यांच्या मते, 'धोरण हे राजकीय क्रियांचे फलित असते.' तर ड्रॉरच्या मते, 'धोरण हे मुख्य कार्यपूर्तीकरिता केलेले मार्गदर्शन असते.' भारतीय संविधानामध्ये कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याला मार्गदर्शक अशी नीतिनिर्देशक तत्वे देण्यात आली आहेत. आयर्लंड, अमेरिका, स्पेन या देशांच्या राज्यघटनांमध्ये सुद्धा अशी तत्त्वे स्पष्ट करण्यात आलेली आहेत. बहुतांश राष्ट्रांमध्ये राज्याने आखावयाचे धोरण कसे असावे हे त्यांच्या संविधानामध्येच स्पष्ट केलेले आहे. अर्थातच धोरण हा सर्वच राष्ट्रांसाठी महत्वाचा मुद्दा आहे. साधारणतः कायदा, नियम, कार्य-आराखडा, प्रशासन पद्धत, न्यायनिवाडा इ. स्वरुपामध्ये धोरण जाहीर केले जाते.

राज्य, सरकार व जनता यांना प्रभावित करणारी क्रिया म्हणजे सार्वजनिक धोरण होय. शासकीय प्रक्रियेतून जनकल्याणार्थ कार्यवाहीची जी पद्धत, दिशा, प्रक्रिया निश्चित केली जाते तिलाच सार्वजनिक धोरण असे म्हंटले जाते. राज्याकडे उपलब्ध असलेल्या उत्कृष्ट मार्गांचा, पद्धतींचा अवलंब करून जनहितकारी शासन व्यवस्थेची निर्मिती सार्वजनिक धोरणातून निर्माण होत असते. म्हणूनच तर मॅकियाव्हली यांनी धोरणाला सत्तेचा पाया संबोधले आहे. तर पार्सन्स यांनी धोरण हा कृतीचा आधार असतो असे म्हटलेले आहे.

## १.२.१ सार्वजनिक धोरणाचा अर्थ

लोकांची एखादी समस्या सोडविण्यासाठी किंवा गरज भागविण्यासाठी 'धोरण' हा शब्द वापरला जातो. सार्वजनिक धोरण ही अत्यंत व्यापक संकल्पना आहे. शासनाची वर्तणूक पद्धत किंवा निश्चित योजना म्हणजे सार्वजनिक धोरण होय. सार्वजनिक धोरणाचा अर्थ समजून घेण्यासाठी खालील काही व्याख्या पाहणे गरजेचे आहे.

१) **रॉबर्ट आयस्टोन**: ''शासकीय घटकांचा त्याच्या पर्यावरणाशी असणारा संबंध म्हणजे सार्वजनिक धोरण होय.'' (The relationship of government unites to its environment)

२) **थॉमस डाय**: ''शासन ज्या गोष्टीची पर्यायांमधून निवड करते किंवा करत नाही, त्या म्हणजे सार्वजनिक धोरण होय.'' (Public Policy is whatever government chooses todo or not to do)

३) **रिचर्ड रोझ**: '' सार्वजनिक धोरण म्हणजे निर्णय नाही, तर तो कृतीचा आकृतिबंध होय.'' (Public Policy is not a decision it is a course of or Pattern of activity)

४) **कार्ल जे फ्रेडरिक**: '' सार्वजनिक धोरण म्हणजे व्यक्ती, गट किंवा शासन यांची प्राप्त परिस्थितीत नियोजीत अशी कृती; ज्यामुळे विशिष्ट ध्येय, उद्दिष्ट किंवा हेतूपर्यंत पोहोचताना येणाऱ्या अडथळ्यांवर मात करण्याची संधी पुरविते.''

### **१.२.२ सार्वजनिक धोरणः स्वरुप** (Nature of Public Policy)

सार्वजनिक धोरणाचे स्वरुप खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतेः

१) सार्वजनिक धोरण लक्ष्योन्मुख असते. सार्वजनिक धोरण हा सरकारचा निर्णय असतो.

२) जनसामान्यांच्या हितासाठी सरकारने जी उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत त्याचे पूर्ततेकरीताचे साधन म्हणजे सार्वजनिक धोरण होय.

३) सार्वजनिक धोरणारंचे विकसन हे सरकारी साधने तसेच सरकारी अधिकारी, कर्मचारी, यांच्याद्वारे केले जाते.

४) सरकारच्या सामूहिक कार्याचा परिणाम म्हणजेच सार्वजनिक धोरण होय.

५) सार्वजनिक धोरणांना कायदेशीर संमती असल्यामुळे ते सर्व नागरिकांना बंधनकारक असते.

६) सार्वजनिक धोरणाचे स्वरुप सकारात्मक किंवा नकारात्मक असते.

७) निश्चित अशी उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवूनच सार्वजनिक धोरणांची निर्मिती आणि अंमलबजावणी केली जाते. सार्वजनिक धोरणात कोण एका व्यक्तीचा किंवा गटाचा विचार केला जात नाही, तर संपूर्ण समाजाचा विचार केला जातो. सामूहिक हित साध्य करणे हा सार्वजनिक धोरणाचा मुख्य उद्देश असतो.

८) सरकार काही वेळेस कृतिशीलतेने निर्णय घेते किंवा काही वेळेस घेत नाही. पण सरकारच्या सर्व घटकांशी धोरणांचा संबंध असतो. उदा. कायदा, न्यायालयीन निर्णय, कायदेमंडळाचा आदेश इ. विविध घटकांचा संबंध धोरणांशी येत असतो.

**१) सार्वजनिक धोरणे ध्येयानुवर्ती असतात**

सरकारच्या विशिष्ट ध्येयाला अनुसरून सार्वजनिक धोरणांची निर्मिती असते. जनतेचे कल्याण साधणे, विशिष्ट ध्येय, उद्दिष्ट साध्य करणे यासाठीच सार्वजनिक धोरणांची निर्मिती होत असते व त्या आधारेच अंमलबजावणी करावी लागते. या धोरणांमध्येच शासनाचे कार्यक्रम स्पष्ट स्वरुपात नमूद केलेले असतात.

**२) शासनाच्या सामूहिक कृतीचा परिपाक म्हणजे सार्वजनिक धोरण**

शासन ज्या ज्या कृती समूहासाठी करते त्या सर्वांचा परिपाक म्हणजे सार्वजनिक धोरण असते. धोरण निर्मिती व अंमलबजावणीच्या प्रक्रियेमध्ये सरकारी अधिकारी व कर्मचारी यांचा वाटा महत्वपूर्ण आहे. सार्वजनिक धोरण थोडक्यात त्यांच्या कृतीचा आकृतिबंध असतो. त्यांची कृती किंवा निर्णय वैयक्तिक नसून ते सामुदायिक धोरण असते.

**३) राजकीय वातावरणातील प्रशासकीय व्यवस्थेची शासकीय घटकांचा संबंध म्हणजे सार्वजनिक धोरण**

सार्वजनिक धोरण म्हणजे शासन प्रत्यक्षात काय ठरविते किंवा कोणती कृती निवडते, हे होय. विशिष्ट राजकीय वातावरणात प्रशासकीय व्यवस्थेची वेगवेगळ्या शासकीय घटकांचा संबंध येत असतो. यालाच सार्वजनिक धोरण म्हणतात. त्याची रूपे विविध स्वरूपाची आहेत. उदा. कायदा, वटहुकूम, न्यायालयीन निर्णय, कार्यकारी आदेश, निर्णय इ.

**४) शासकीय धोरणाचे स्वरुप सकारात्मक किंवा नकारात्मक असते**

सार्वजनिक धोरणाअंतर्गत ज्या समस्येबाबत धोरण आखले आहे, त्या समस्येला अनुसरून शासकीय कृती अपेक्षित आहे. शासनाच्या अशा कृतीस कायदेशीर व सनदशीर अशी संमती अपेक्षित असते. या अर्थानेच सार्वजनिक धोरण हे सकारात्मक असते. एखाद्या विशिष्ट प्रश्नासंबंधी शासनाने कोणती कृती करू नये, हे निश्चित केले जाते. या अर्थाने सार्वजनिक धोरण नकारात्मक असते.

सार्वजनिक धोरण ही एक सांघिक व व्यापक प्रक्रिया आहे. धोरण निर्धारण, त्याची अंमलबजावणी, मूल्यमापन या सर्वांचा धोरणाच्या प्रक्रियेत समावेश होतो. धोरणाच्या प्रक्रियेत जसे अनेक घटक अंतर्भूत असतात. तसेच धोरण प्रक्रियेवर कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, राजकीय पक्ष, दबाव गट, जनमत, प्रसार माध्यमे, रुढी परंपरा इत्यादी घटक प्रभाव टाकत असतात. धोरणाची निर्मिती हे शासनाचे व अंमलबजावणी हे प्रशासनाचे कार्य असले तरी धोरण निर्मिती हे राजकीय कार्य असून प्रशासन प्रेरित असते तर धोरणांची अंमलबजावणी प्रशासनाचे कार्य असले तरी ते राजकीय नियंत्रणाखाली चालते. शासनाद्वारे, निर्धारित केलेल्या तसेच घोषित केलेल्या प्रत्येक धोरणांचा स्वाभाविकपणे जनतेशी संबंध येतो. समाजातील कोणता ना कोणता घटक त्या धोरणाने प्रभावित होतो. म्हणून सरकारच्या अशा प्रत्येक धोरणास साधारणतः 'सार्वजनिक धोरण' असे

म्हणतात. धोरणातून शासनाला कृती करण्याचे मार्गदर्शन मिळते. धोरणामध्ये ध्येय, आदेश, कृतीचा मार्ग, सामजिक मूल्यांचा समावेश असतो.

अनेकविध प्रश्नांचा उहापोह सार्वजनिक धोरणात केला जातो. त्यात धोरण निर्धारणाचे सामाजिक, आर्थिक राजकीय इ. पैलू आहेत. कारण आधुनिक युगात शासकीय कृती इतकी व्यापक झाली आहे की, त्यात समाजव्यवस्थेचा एकही घटक सुटू शकत नाही. शासनाने सार्वजनिक धोरणात सर्व क्षेत्रांचे अवलोकन करावे व त्या त्या क्षेत्रांतील समस्या दूर कराव्यात असे अपेक्षित असते.

### १.२.३ सार्वजनिक धोरणाची व्याप्तीः

सार्वजनिक धोरण ही उपविद्याशाखा आता अतिशय व्यापक झाली आहे. या उपविद्याशाखेची व्याप्ती निश्चितपणे सांगता येत नाही. कल्याणकारी राज्यव्यवस्थेच्या उदयामुळे या विषयाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. तरीही राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विद्याशाखांच्या चौकटीत सार्वजनिक धोरण या उपविद्याशाखेची व्याप्ती सांगता येते. सार्वजनिक धोरण हे सरकारी किंवा शासकीय स्वरुपाचे असते, त्याचे स्वरुप वैयक्तिक किंवा खाजगी असत नाही. सार्वजनिक जीवनाच्या सर्व बाजू सार्वजनिक धोरणाशी संबंधित असतात. लोककल्याण, लोकहित, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक कायदा, धोरण निर्धारण, धोरण विश्लेषण, सार्वजनिक दळणवळण, सार्वजनिक कर्मचारी वर्ग, सार्वजनिक क्षेत्र अशी सार्वजनिक धोरणांची व्याप्ती वाढत आहे. याचबरोबर सार्वजनिक शिक्षणविषयक धोरण, सार्वजनिक व्यवस्थापन, शहरी धोरणे, सांस्कृतिक धोरणे यांचाही समावे सार्वजनिक धोरणात केला जातो. साधारणतः सार्वजनिक धोरणाची व्याप्ती खालीलप्रमाणे सांगता येतेः

**१) सार्वजनिक धोरण अंमलबजावणी व मूल्यमापन**

सरकारने आखलेल्या सार्वजनिक धोरणाचे विश्लेषण करणे, त्या धोरणाचा परिणाम स्पष्ट करणे, धोरण आखणी प्रक्रिया, पर्यायी धोरण, धोरणाची अंमलबजावणी व धोरणाचे मूल्यमापन हा सार्वजनिक व्याप्तीचा गाभा असतो. शहरी, कृषिविषयके, आरोग्यविषयक, औद्योगिक, शैक्षणिक इत्यादींसारख्या धोरणांमुळे केंद्रीकरण, विकेंद्रकरण, खाजगीकरण, आधुनिकीकरण, राष्ट्रीय सुरक्षितता, समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय व वाटपात्मक न्याय अशा संकल्पनात्मक मूल्यव्यवस्थेत होणारे बदल हा सार्वजनिक धोरणाच्या अभ्यासाचा एक भाग ठरतो.

**२) सार्वजनिक धोरणाची पार्श्वभूमी**

सार्वजनिक धोरण कोणत्या पार्श्वभूमीवर तयार झाले त्याची पार्श्वभूमी अभ्यासली जाते. सरकार धोरण निर्मिती करताना त्या धोरण निर्मिती प्रक्रियेवर प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घटकांचा प्रभाव पडला हे अभ्यासले जाते. त्याचबरोबर त्या देशाची घटनात्मक चौकट, तेथील समता, वंश, धर्म, चळवळी इत्यादी गोष्टींचा अभ्यासही सार्वजनिक धोरणाच्या चौकटीत केला जातो.

### ३) राजकारण व धोरण यांचा संबंध

सार्वजनिक धोरणांच निश्चितीनंतर कोणते राजकारण घडून आले. राजकीय परिणाम काय झाले याचा अभ्यासही या व्याप्तीत येतो. पक्षबदल, सत्ताबदल घडून आल्याने सार्वजनिक धोरणांमध्येही बदल घडून येतो. जो पक्ष सत्तेवर असतो, त्या पक्षाला विशिष्ट समाज, संघटना, गट यांचे संघटन करून नेतृत्व साधायचे असते. त्यामुळे अशा गटांनाच मध्यवर्ती ठेवून धोरण निर्मिती केली जाते. यासाठी धोरण व राजकारण यांचा संबंध अभ्यासणे, हा सार्वजनिक धोरण या उपविद्याशाखेचा अभ्यासविषय ठरतो.

### ४) दबावगट, संघटना, चळवळींचा अभ्यास

सार्वजनिक धोरण निश्चिती प्रक्रियेमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व विविध समित्या यांचा समावेश असतो. म्हणून सार्वजनिक धोरणाचा अभ्यास करताना दबाव गट, संघटना, चळवळी यांचा प्रभाव धोरणांवर कितपत झाला हे पहावे लागते. कारण या चळवळी, दबाव गट त्यांच्या अजेंड्याचे धोरणात रुपांतर करण्यासाठी प्रयत्न करतात. यामुळेच सार्वजनिक धोरण या उपविद्याशाखेत सरकार व त्यावर प्रभाव टाकरणारे दबाव गट सामाजिक चळवळी यांच्या संबंधाचा अभ्यास सार्वजनिक धोरणनिश्चितीचे क्षेत्र म्हणून केला जातो.

### ५) सरकारी कर्मचारी व राजकीय अभिजन यांचे संबंध

सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी करण्याचे कार्य सरकारी कर्मचाऱ्याला करावे लागते. सरकारी कर्मचारी वर्गाची सार्वजनिक धोरण अंमलबजावणीची पद्धत कोणती आहे? हा सार्वजनिक धोरण मूल्यमापनाचा एक भाग आहे. सार्वजनिक धोरणांच्या अंमलबजावणीवेळी त्यांचा राजकीय अभिजनांशी संबंध येत असतो. म्हणून सार्वजनिक धोरणामध्ये सरकारी कर्मचारीवर्ग, व राजकीय अभिजन यांचे संबंध, सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीची गतिशीलता व राजकारण अशा मुद्दांचा अभ्यास सार्वजनिक धोरणाच्या व्याप्तीत येतो.

सार्वजनिक धोरण ही विद्याशाखा दिवसेंदिवस अधिक व्यापक होत चालली आहे. आधुनिक राज्ये ही कल्याणकारी राज्ये असल्याने समाजहिताच्या दृष्टीने अनेकविध सार्वजनिक धोरणे सरकारकडून निर्मिली व अंवलंबली जातात. याचा अभ्यास सार्वजनिक धोरण विद्याशाखेत केला जातो. यामुळेच ही विद्याशाखा दिवसेंदिवस सर्वसमावेशक होत चालली आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्नः– १.२.३ (अ)**

१) सार्वजनिक धोरण या विद्याशाखेचा उमग कोणत्या दोन शाखेंतून झाला आहे?

२) थॉमस डाय ची सार्वजनिक धोरणाची व्याख्या सांगा?

३) सार्वजनिक धोरणाची विविध रुपे कोणती?

४) 'Public' या शब्दाची उत्पत्ती कधी झाली?

५) माल्कम वेबस्टर शब्दकोशामध्ये धोरणाची कोणती व्याख्या केलेली आहे?

## १.२.४ सार्वजनिक धोरण विद्याशाखेचा विकास

धोरणशास्त्र ही नव्याने उदयास आलेली विद्याशाखा आहे. सार्वजनिक धोरणनिश्चिती प्रक्रिये मध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने ती निर्माण झाली. ही विद्याशाखा समकालीन सामान्य शास्त्रांपेक्षा वेगळी व महत्वाची आहे. सार्वजनिक धोरणनिश्चितीत राज्यसंस्थेची भूमिका कोणती आहे. यासंबंधी विश्लेषण करणारी धोरणशास्त्र ही विद्याशाखा आहे. सार्वजनिक धोरणाला जर सामाजिक उपयुक्तता नसेल, तर त्याचा समावेश धोरणशास्त्रात होत नाही. सरकारची धोरणे कशी निर्माण होतात, त्याची अंमलबजावणी कोणत्या प्रकारे केली जाते, यासंबंधीचे विश्लेषण सार्वजनिक धोरण या विद्याशाखेत असते.

### सार्वजनिक धोरण विश्लेषणाचा इतिहास

साधारणतः चार हजार वर्षांपासूनचा इतिहास सार्वजनिक धोरण विश्लेषणाला लाभला आहे. सार्वजनिक धोरणाचा इतिहास हा बॅबिलॉन शहरापासून सुरू होतो अमेरिकन संदर्भांमध्ये सार्वजनिक धोरणशास्त्राच्या इतिहासासंबंधी लिहीले गेले आहे. सार्वजनिक धोरण विश्लेषणाचे वैचारिक आणि व्यावहारिक अशा दोन पातळ्यांवर वर्गीकरण केले जाते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस अनेक समाजशास्त्रज्ञांनी आपली विद्याशाखा अधिकाधिक व्यावसायिक करण्यावर भर दिला. यामुळे शासनसंस्थेला अधिक व्यापकता प्राप्त झाली. अभ्यासाच्या पातळीवर या सार्वजनिक धोरण विद्याशाखेला अधिमान्यता प्राप्त झाली. १९३७ साली हार्वर्ड विद्यापीठाने लोकप्रशासनाची जी विद्याशाखा सुरू केली, त्या विद्याशाखेच्या अभ्यासक्रमाचा गाभा सार्वजनिक धोरण हा होता या विद्याशाखेच्या अभ्यासाला गती प्राप्त होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे दुसऱ्या महायुद्धांनंतर स्वतंत्र विद्याशाखेचा दर्जा प्राप्त करण्यात सार्वजनिक धोरण विद्याशाखेला यश प्राप्त झाले होते. प्रारंभीच्या काळात हॅरॉल्ड लास्वेल यांनी आपल्या 'द पॉलिसी ओरियन्टेशन' या लेखात १९५१ मध्ये धोरणशास्त्र ही संकल्पना वापरली होती. डॅनिएल लेरनर आणि हॅरॉल्ड लास्वेल यांनी १९५१ मध्ये 'धोरणशास्त्रे' नावाने स्वतंत्र पुस्तक लिहिले. सामाजिक शास्त्रज्ञांना या पुस्तकाने अशी जाणीव करून दिली की, त्यांनी वापरलेली अभ्यासपद्धती तसेच अभ्यासाअंती काढलेले निष्कर्ष हे शासनकर्ते, धोरणकर्ते यांना उपलब्ध करून दिले पाहिजेत. कारण त्या काळात सामाजिक शास्त्रज्ञ उपयुक्त अशी माहिती धोरणकर्त्यांना पुरवित नव्हते. व्यवस्था विश्लेषक, प्रायोगिक गणितज्ञ, अभियंत्यांची कृती, प्रायोगिक संशोधक इ. घटकांमध्ये धोरणाची वाढ झाली. हे सर्व घटक औपचारिक प्रशिक्षण घेत होते. परंतु यामध्ये सामाजिक शास्त्रांचा समावेश नव्हता. त्यांचे अभ्यास व संशोधन हे 'ना-नफा' या तत्त्वावर आधारलेले होते. याकाळात सरकारने तर धोरण निर्मिती संबंधी सल्ला देण्यासाठी काही अभ्यासक संघ नियुक्त केले होते. अशा पद्धतीने प्रारंभीच्या काळात सार्वजनिक धोरण विद्याशाखेचा विकास अतिशय संथगतीने झाला.

१९६० नंतर मात्र राज्यशास्त्रज्ञांना असे वाटू लागले की, या विद्याशाखेने सार्वजनिक धोरणाच्या आशयाबद्दल जास्त जागृत असले पाहिजे. प्रक्रियेपेक्षा सार्वजनिक धोरणाच्या आशयावर अधिक भर दिला पाहिजे, अशी जाणीव राज्यशास्त्रज्ञांना झाली. १९७० च्या दशकामध्ये अनेक लोकप्रशासनतज्ज्ञ राज्यशास्त्रापासून गाभ्याचे अभ्यासक्षेत्र नव्याने वेगळ्या स्वरुपात उदयास आले. १९८० च्या दशकामध्ये सार्वजनिक धोरण अभ्यासावर आधारीत नव्या अभ्यासकांच्या संघटना, नियतकालिके, संस्था आणि विद्यापीठ पातळीवर पदव्यांचे शिक्षण देण्यास सुरूवात झाली. आज राज्यशास्त्र व लोकप्रशासनामध्ये सार्वजनिक धोरण विश्लेषण हे मान्यता असलेले अभ्यासक्षेत्र म्हणून ओळखले जाते. त्याचबरोबर अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, विज्ञान आणि तंत्रज्ञान या विद्याशाखांमध्ये देखील सार्वजनिक धोरण विश्लेषण अभ्यास यावर भर दिला जातो. सार्वजनिक धोरण विश्लेषण करणाऱ्या अभ्यासकांना ही विद्याशाखा उपयोगी ठरते. तर सरकारच्या धोरणाचे विश्लेषण करण्यासाठी ही विद्याशाखा उपयुक्त आहे.

प्रिन्स्टन विद्यापीठाचे माजी अध्यक्ष असणारे वुड्रो विल्सन हे एक समाजशास्त्रज्ञ होते. अमेरिकेच्या इतिहासातील पहिलीच वेळ होती की एक समाजशास्त्रज्ञ अमेरिकेचा अध्यक्ष बनला होता. वुड्रो विल्सन यांच्या मते, चांगले सार्वजनिक धोरण निर्माण होण्यासाठी चांगले मन असणे गरजेचे असते. राष्ट्रीय आर्थिक व सामाजिक कल याच्या विश्लेषणास हर्बर्ट हुवर यांनी सुरुवात केली. यामध्ये गुणवत्ता आणण्याचे काम फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी केले. दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामातून अमेरिकेला बाहेर काढण्यासाठीचे प्रयत्न रुझवेल्ट यांनी केले. यासाठी त्यांनी अनेक संघीय रचना निर्माण केल्या की ज्यामधून सार्वजनिक धोरण विश्लेषणाचा आरंभ झाला. अंमलबजावणीसंदर्भातील नवे कार्यक्रम त्यांनी आखले. यामध्ये राष्ट्रीय नियोजन मंडळ युद्ध संरक्षण मंडळ इ. उदाहरणे देता येतात.

धोरण विश्लेषणाशी संबंधित कृतीला १९७० मध्ये सुरूवात झाली. यामध्ये राज्य व स्थानिक शासन संस्थांच्या कार्यक्रमांचे मूल्यमापन करण्याची पद्धत सुरू झाली होती. सरकारची कामगिरी व निकालासंबंधीचा कायदा १९९३ मध्ये करण्यात आला. यालाच अनुसरून व्यवस्थापन, अंदाजत्रक अशी विविध कार्यालये निर्माण करण्यात आली. यामधूनच धोरण विश्लेषणास संघराज्यात्मक रचनेमध्ये एक सुरक्षित स्थान प्राप्त झाले. आज धोरण विश्लेषणास खूप महत्व प्राप्त झाले आहे. अमेरिकेत तर धोरण-विश्लेषण ही कायमस्वरूपी व अधिकृत अशी नोकरी किंवा काम बनले आहे. संघ नागरी सेवांमधून धोरण-विश्लेषकांची निवड केली जाते. धोरण-विश्लेषण शाखा ही एक ज्ञान-उद्योग शाखा म्हणून अमेरिकेत स्थापन करण्यात आली आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न – १.२.४ (ब)**

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) ..... शहरापासून सार्वजनिक धोरणाच्या इतिहासाला सुरुवात होते.

२) डॅनिएल लेरनर व हॅरॉल्ड लास्वेल यांनी १९५१ मध्ये ...... हे पुस्तक लिहले.

३) ...... यांनी अमेरिकेला दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले.

४) अमेरिकेत धोरण विश्लेषण ही ...... शाखा म्हणून स्थापन झालेली आहे.

## १.२.५ सार्वजनिक धोरणाचे महत्व

राज्यशास्त्राचा एक अभ्यासविषय म्हणून सार्वजनिक धोरणविद्याशाखा ओळखली जात होती. लोकप्रशासनातील एक उपविषय म्हणूनही ही शाखा ओळखली जात होती. सार्वजनिक धोरण ही शासनसंस्थेइतही जुनी प्रक्रिया आहे. शासन लोकांच्या कल्याणासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जे निर्णय घेते ते म्हणजे सार्वजनिक धोरण होय. ऐंशी-नव्वदच्या दशकात या उपविद्याशाखेचे अभ्यास क्षेत्र निश्चित झाले. डेव्हिड ईस्टन, हेरॉल्ड लास्वेल व येहेझ्केल ड्रॉर यांनी या उपविद्याशाखेची संकल्पनात्मक व सैद्धांतिक मांडणी केली. यानंतर 'सार्वजनिक धोरण' ही शाखा स्वतंत्र विद्याशाखा म्हणून उदयास आली. दिवसेंदिवस या विद्याशाखेचे स्वरुप व्यापक होत चालले असून महत्व वाढत चालले आहे. विकसित राष्ट्रांना आपली प्रगती विकसित अवस्था टिकवून ठेवण्यासाठी आपल्या धोरणांचा पाठपुरावा करणे, बदलत्या परिस्थितीत धोरणांमध्ये बदल करणे या गोष्टी कराव्या लागतात. त्याचबरोबर विकसनशील राष्ट्रांना विकसित अवस्था प्राप्त करण्यासाठी, अविकसित राष्ट्रांना विकसनशीलतेकडे जाण्यासाठी आपल्या सार्वजनिक धोरणाचा तुलनात्मक अभ्यास करावा लागतो. सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ही धोरणे ठरवावी लागतात. कल्याणकारी राज्य व्यवस्थेच्या उदयामुळे सार्वजनिक धोरण आखणी, विश्लेषण या बाबींना अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. खालील काही मुद्यांच्या आधारे सार्वजनिक धोरण अभ्यासाचे महत्व स्पष्ट करता येते.

### १) सरकारच्या सार्वजनिक धोरण विश्लेषणास उपयुक्त

'सार्वजनिक धोरण' अभ्यासविषयामुळे निश्चितपणे धोरण आखणी कशी केली जाते? धोरणाचा अर्थ, विविध सिद्धांत याची शास्त्रीय माहिती अभ्यासकाला प्राप्त होते. त्यामुळे सरकारने आखलेल्या सार्वजनिक धोरणाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यास ही विद्याशाखा सहाय्य करते. सार्वजनिक धोरण लोकहितैषी आहे की लोकविरोधी आहे हे ठरवता येते. सार्वजनिक धोरणांच्या दूरगामी परिणामांबाबत निष्कर्ष काढता येतात.

### २) धोरण विश्लेषण अभ्यासास उपयुक्त

'संपूर्ण समाजासाठी अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण करणे' हे राजकीय व्यवस्थेचे सर्वात महत्वाचे कार्य असते. समाजअंतर्गत व समाजबाह्य अशा दोन प्रकारच्या पर्यावरणांतून सार्वजनिक धोरणाच्या मागण्या केल्या जातात. राज्यव्यवस्थेचा प्रत्येक निर्णय नव्या मागण्यांना जन्म देत असतो. राज्यव्यवस्थेमध्ये मागण्यांचे रुपांतर धोरणनिर्णयांमध्ये होते. सार्वजनिक धोरण विद्याशाखा यासाठी सहाय्यभूत ठरते. यातील सिद्धांताच्या आधारे सार्वजनिक धोरणाचे विश्लेषण करुन सरकारच्या धोरणाचे समीक्षण करता येते.

### ३) मूल्यव्यवस्थेतील बदल अभ्यासण्यास उपयुक्त

सरकार जी वेगवेगळी धोरणे निर्माण करून त्याची अंमलबजावणी करत असते, त्यामध्ये शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, आरोग्यविषयक, कृषीविषयक इत्यादी धोरणांचा समावेश होतो. या धोरणांमुळे न्याय, स्वातंत्र्य, समता, सामाजिक वाटपात्मक न्याय, केंद्रीकरण, विकेंद्रीकरण यासारख्या मूल्यव्यवस्थेत बदल घडून येतो. हा बदल सकारात्मक आहे की नकारात्मक आहे हे समजण्यासाठी सार्वजनिक धोरणाचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

### ४) सामाजिक, राजकीय पार्श्वभूमीचा परिणाम अभ्यासण्यास उपयुक्त

कोणत्याही देशाच्या सार्वजनिक धोरणावर तेथील सामाजिक परिस्थिती, राजकीय पार्श्वभूमी परिणाम करत असते. सरकारचे सार्वजनिक धोरण घटनात्मक चौकटीत बसवावे लागते. राष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक परिस्थितीचा साकल्याने विचार राष्ट्राच्या सार्वजनिक धोरणात केला जातो. एकंदरीत सार्वजनिक धोरणामागील सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी कोणती होती? हे समजण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरतो.

### ५) सार्वजनिक धोरण व राजकारण यांचा संबंध स्पष्ट करणे

सार्वजनिक धोरण व राजकारण यांचा जवळचा संबंध आहे. जे सरकार सत्तेत नवीन येते ते आधीच्या सरकारची धोरणे बदलून नव्या धोरणांची निर्मिती करते. जो समाज राजकीय पक्षाला निवडून येण्यास सहाय्य करतो त्या समाजाच्या संतुष्टीकरीता सरकारकडून काही धोरणे आखली जाण्याची शक्यता असते. विशिष्ट धोरणाचा समाजावर जर दूरगामी चांगला परिणाम होत असेल तर ती धोरणे तशीच ठेवली जातात. राजकारणामध्ये यश मिळवायचे असेल तर सार्वजनिक धोरणांच्या निर्मिती, अंमलबजावणीमध्ये सरकारने जाणिवपूर्वक लक्ष घालणे महत्वाचे आहे. यामुळे सार्वजनिक धोरणाचे महत्व वाढत चालले आहे.

### ६) संस्था, संघटना, दबावगट, सामाजिक चळवळी यांचा प्रभाव अभ्यासणे

सार्वजनिक धोरणे ही विविध मागण्या व निर्णयांची परिणती असते. राष्ट्राअंतर्गत संघटना, दबाव गट आपापल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी राजकीय सत्तेवर दबाव टाकतात. विविध प्रश्नांसाठी ज्या सामाजिक चळवळी निर्माण होतात त्या अप्रत्यक्षपपणे सार्वजनिक धोरणावर प्रभाव टाकतात. सार्वजनिक धोरणावरील ह्या गोष्टींचा प्रभाव अभ्यासण्यासाठी ही विद्याशाखा मदत करते. सार्वजनिक धोरण अभ्यासण्यामुळे संपूर्ण देशाचा विकास समान पातळीवर आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येतात.

### ७) सरकारी कर्मचारी, व राजकीय नेते यांचे संबंध

सार्वजनिक धोरणे राजकीय नेते, म्हणजेच राजकीय सत्ता निर्माण करत असतात; तर त्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य सरकारी कर्मचारी करीत असतात. त्यामुळे सार्वजनिक धोरणांची

अंमलबजावणी चांगली व्हावयाची असेल तर राजकीय अभिजन व प्रशासकीय कर्मचारी यांचे संबंध चांगले असावे लागतात. थोडक्यात अंमलबजावणीस योग्य अशीच सार्वजनिक धोरणे निर्माण केली जातात. अंमलबजावणीमध्ये गतिशीलता येण्यासाठी सार्वजनिक धोरणाचा अभ्यास करणे फायद्याचे ठरते.

**८) सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास उपयुक्त**

सार्वजनिक धोरणाच्या स्वरूपावरून सरकारच्या कार्याचे मूल्यमापन केले जाते. शैक्षणिक, औद्योगिक, महिलांविषयक, कृषीविषयक जी धोरणे सरकार अवलंबते त्यामुळे घडून येणाऱ्या परिणामांवरून सरकारचे यश-अपयश निश्चित होत असते. त्यामुळे सार्वजनिक धोरणाचा अभ्यास केल्याने सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास नवी दृष्टी प्राप्त होते.

**९) आंतरविद्याशाखीय अभ्यासास उपयुक्त**

सार्वजनिक धोरण हे केवळ एका क्षेत्रापुरते मर्यादित नाही तर ते सर्वक्षेत्रीय आहे. सर्व शास्त्रांमध्ये आंतरसंबंध जोडण्यासाठी सार्वजनिक धोरणाचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**१०) स्वतंत्र विद्याशाखा**

राज्यशास्त्र, लोकप्रशासनाप्रमाणे 'सार्वजनिक धोरण' ही विद्याशाखा आता विद्यापीठ स्तरावर स्वतंत्रपणे अभ्यासली जात आहे. सार्वजनिक धोरणशास्त्राच्या अभ्यासामुळे राजकीय जागृती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे. यातील तज्ञ, जाणकार व्यक्तींची शासनाला मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाली आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढत चालल्या आहेत. अमेरिकेत धोरण विश्लेषण ही तर अधिकृत नोकरी किंवा काम बनले आहे. तेथे याविषयीची ज्ञान-उद्योग शाखा निर्माण झालेली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात 'सार्वजनिक धोरणशास्त्राचे' महत्व आणखी वाढत जाणारे आहे.

आधुनिक लोकशाही राष्ट्रांना प्रगत लोकशाही व्यवस्थेकडे जाण्यासाठी 'सार्वजनिक धोरण' ही विद्याशाखा मार्गदर्शक ठरणारी आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्नः- १.२.५ (क)**

१) सार्वजनिक धोरण विद्याशाखेची सैद्धांतिक मांडणी कोणी केली?

२) राजकीय व्यवस्थेचे महत्वाचे कार्य कोणते?

३) धोरणांमुळे कोणत्या मूल्यव्यवस्थेत बदल घडून येतो.

## १.२.६ सार्वजनिक धोरणाचा (धोरणशास्त्राचा) वैचारिक पाया

राज्यसंस्थेइतकेच सार्वजनिक धोरण हे जुने आहे. तरीही याचा स्वतंत्र शास्त्र म्हणून अभ्यास केला जात नव्हता. याचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याचे श्रेय अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांना द्यावे लागेल.

डेव्हिड ईस्टन व हॅरॉल्ड लास्वेल यांनी सार्वजनिक धोरणशास्त्राचे शास्त्रशुद्ध विश्लेषण केले. याशिवाय तिसऱ्या जगातील या क्षेत्रातील अभ्यासक म्हणजे येहेझ्केल ड्रॉर हे होय. सार्वजनिक धोरणशास्त्राचा वैचारिक पाया घालण्यामध्ये यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. सार्वजनिक धोरणशास्त्राचा उदय कसा झाला हे अभ्यासण्यासाठी वरील अभ्यासकांच्या विचारांचा शोध घेणे गरजेचे आहे.

**डेव्हिड ईस्टनः**

आधुनिक राज्यशास्त्राचा शिल्पकार व व्यवस्था विश्लेषणाचा पुरस्कर्ता अशी डेव्हिड ईस्टन यांची ओळख आहे. १९५० नंतर अमेरिकन राज्यशास्त्रामध्ये स्थित्यंतर घडवून आणण्या मध्ये त्यांचा पुढाकार महत्वपूर्ण आहे. डेव्हिड ईस्टन यांनी आपल्या ''Political System An Inquiry into the state of Political Theory'' या ग्रंथात राज्यवशास्त्राच्या अभ्यासाविषयी चिकित्सक विचारांची मांडणी करून व्यवस्था- विश्लेषणाचा पुरस्कार केला आहे. याच्या सहाय्याने सर्व राजकीय घडामोडींचे विश्लेषण करण्यासाठी व्यापक सिद्धांताची मांडणी करता येऊ शकते, असे विचार त्यांनी मांडले आहेत. यामध्येच त्यांनी सार्वजनिक धोरण संबंधित विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या मते, राज्यसंस्थेचा केवळ राज्य व सत्ता या दोन संज्ञांपुरताच अभ्यास होतो. यामध्ये त्यांनी सार्वजनिक धोरणाच्या अभ्यासाची भर घातली. त्यांचे याबाबत मत खालीलप्रमाणे आहे.

१) राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पनांची पुनर्मांडणी होणे आवश्यक आहे. निश्चितपणे यांत सार्वजनिक धोरणाचा समावेश आहे.

२) राज्यशास्त्राने नवनवीन प्रयोग व माहिती यांवर भर दिला पाहिजे. अर्थातच सार्वजनिक धोरणनिश्चिती, निर्मिती प्रक्रिया व राज्यसंस्था यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

३) नवीन सिद्धांतांची निश्चिती, निर्मिती करताना मूल्यांची भूमिका विचारात घ्यावी. कारण सार्वजनिक धोरणातून राजकीय मूल्ये घडतात, असा संबंध ईस्टनने व्यक्त केला.

या वरील घटकांच्या आधारे ईस्टनने राजकीय व्यवस्थेची संकल्पना मांडली.

चांगल्या जीवनाचे स्वरूप कोणते? कोणती धोरणे आखल्याने निश्चित उद्दिष्ट प्राप्त होतील? या प्रश्नांचा मागोवा घेतानाच राज्य हेच फलित होय, हा दृष्टिकोन समोर आला. धोरणनिश्चिती तसेच शासनाच्या समस्या यांचा व्यक्तिगत व गटा-गटांमधील संघर्ष यांच्याशी संबंध जोडण्याचे विश्लेषण डेव्हिड ईस्टन यांनी केले. 'अधिकारयुक्त मूल्यनियुक्ती म्हणजे राजकीय प्रक्रिया' अशी व्याख्या त्याने केली. राजकीय प्रक्रियेमध्ये धोरण, अधिसत्ता व समाज हे तीन भाग महत्वाचे असतात. धोरण तत्व म्हणजे त्याला मिळणारी स्विकृती किंवा नकार होय. ज्यांनी 'अधिकारयुक्त मूल्यनियुक्ती' स्वीकारलेली आहे, अशा लोकांमध्येच अधिसत्ता असते.

डेव्हिड ईस्टनच्या मते विश्लेषण आणि सिद्धांत यावर राज्यशास्त्राचा पाया अवलंबून असतो. पण या दोन गोष्टी वास्तव माहितीवर आधारित हव्यात. धोरणावर मानसशास्त्रीय, विधिजन्य,

कायदाविषयक घटक प्रभाव टाकत असतात. यातूनच धोरणशास्त्राचा पाया व्यापक होत असतो. याव्यतिरिक्त व्यक्तिगत मूल्यांचा देखील धोरणांवर परिणाम होतो. सत्ताधार लोकांचे प्राधान्यक्रम असणारे मूल्य म्हणजे धोरण. सार्वजनिक धोरणाचे महत्व ओळखून त्याच्या मर्यादा ईस्टनने स्पष्ट केल्या. सद्यः स्थितीमध्ये धोरणशास्त्र अकालिक आहे. राज्यशास्त्राचे रुपांतरण धोरणशास्त्रामध्ये होऊ शकत नाही. राजकीय रचना व प्रक्रिया यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याची क्षमता धोरणशास्त्रामध्ये आहे. केवळ मूल्यांचा विचार करून त्यामध्ये नवीन ज्ञानाची भर घालण्यापेक्षा वेगळा असा विचार धोरणशास्त्र करेल की ज्यामुळे जहाल सुधारणा घडतील व राजकीय प्रक्रियेचेही मूलभूत विश्लेषण होईल. परंतु याच दृष्टिकोनाचा अभाव सद्यःपरिस्थितीत असल्यामुळे धोरणशास्त्राचा विकास घडून येण्यात अडथळे निर्माण होत आहेत. सार्वजनिक धोरण दडपले जात आहे. अशी स्पष्ट मते ईस्टनने मांडली आहेत. डेव्हिड ईस्टन यांनी सार्वजनिक धोरण शास्त्राचा वैचारिक पाया घालून दिला.

**हॅरॉल्ड लास्वेलः**

हॅरॉल्ड लास्वेल हा अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ असून राज्यशास्त्रातील धोरणशास्त्राबद्दल लिहिणारा लास्वेल हा पहिला विचारवंत आहे. सत्ता संशोधकांच्या मनोव्यापाराचा शोध घेण्याचा प्रयत्न लास्वेलने दोन टप्प्यात केला. पहिल्या टप्प्यात त्याने मनोविश्लेषणाचे तंत्र वापरून सत्ताशोधनामागील मानसिक प्रेरणांचा अभ्यास केला. तर दुसऱ्या टप्प्यात धोरणविषयक शास्त्रावर लक्ष केंद्रित केले. लास्वेलने धोरणशास्त्राचा अर्थ पुढील प्रमाणे स्पष्ट केला आहे, ''समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त असलेल्या ज्ञानाचे मूल्यमापन करण्याची निवडप्रक्रियेचा अभ्यास.''

शिकागो विद्यालयाने इ. स. १९३० साली लॉस्वेल यांना सामजिक प्रश्न सोडविण्याच्या मार्गांचा बहुशाखीय व तात्विक दृष्टीने अभ्यास करावा, असे सुचविले. या अभ्यासाला व्यापकता येण्याच्या दृष्टीने अमेरिकी धोरण आयोगाची स्थापना करावी अशी विनंती लास्वेल यांनी केली. त्यानुसार इ. स. १९४० मध्ये धोरण आयोगाची स्थापना करण्यात आली. यायोगे त्यांना सार्वजनिक धोरणाच्या दृष्टिकोनाची बांधणी करण्याचा व्यापक अभ्यास करता आला. या अभ्यासानंतरच त्यांनी इ. स. १९५६ साली ''The Decision Process: Seven Categories of Functional Analysis'' हा ग्रंथ लिहिला. धोरण प्रक्रियेमधील सात प्रवर्ग त्यांनी या ग्रंथामध्ये स्पष्ट केले आहेत. ते प्रवर्ग खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) **बुद्धिमत्ता** (Intelligence)

बुद्धिमत्तेवरच चांगल्या धोरणाची गुणवत्ता अवलंबून असते.

२) **बढती** (Promotion)

धोरणांमुळे सामाजिक समस्या सुटणे आवश्यक आहे.

**३) नियम व विधी** (Prescription)

धोरण हे नियम व कायद्यांवर आधारित असते.

**४) स्मरण** (Invocation)

धोरणांची अंमलबजावणी करताना ती निर्माण करताना कोणत्या उद्दिष्टांवर आधारित केली होती ते स्मरणात ठेवावे लागते.

**५) अर्जितता** (Application)

धोरणाची उपयोगिता सर्वांसाठी असावी.

**६) प्रत्यय** (Termination)

समाज कल्याणाकरीताच धोरण निर्मिती करावी.

**७) मूल्य** (Appraisal)

धोरणांवरूनच शासनाचे मूल्यांकन होत असते.

अशा प्रकारे या सात प्रवर्गांद्वारे धोरण विकसित केले जाते. सार्वजनिक धोरणनिर्मिती प्रक्रियेचे मुख्य तीन आधार लास्वेलने खालीलप्रमाणे सांगितले आहेत.

१) सामाजिक समस्या

२) बहुशाखीयत्व

३) संकल्पना व तंत्रे

सामाजिक समस्या सोडविण्याच्या हेतूने निर्माण केलेले सार्वजनिक धोरण हे सामाजिक समस्याभिमुख असते. सामाजिक समस्या ह्या बहुविध असतात त्यामुळे सार्वजनिक धोरण देखील बहुशाखीय असावे लागते. धोरणनिर्मिती वेळी विविध संकल्पना, आदर्श व तंत्रांचा आधार घेतला जातो. धोरणांचे संदर्भ ठराविक असतात सार्वजनिक धोरणशास्त्र धोरणाचे स्पष्टीकरण, त्याच्या राबवणुकीसाठी असणारी तथ्ये, त्यांचे अर्थनिर्वचन यांच्याशी संबंधित असते. धोरणनिर्मिती करतानाच धोरणाच्या अंमलबजावणी प्रक्रियेचा विचार केला जातो. धोरण आखणी प्रक्रिया ही सामाजिक प्रक्रियांशी जोडली गेलेली आहे.

लास्वेल यांनी सार्वजनिक धोरणासंबंधी प्रथमच दृष्टिकोनाची मांडणी केली होती. यानंतर अनेक विचारवंतांनी तो व्यापक व विस्तृतपणे स्पष्ट केलेला आहे. सार्वजनिक धोरणशास्त्राच्या व्याप्तीमध्ये भर घालण्याचे श्रेय लास्वेल यांना द्यावे लागेल. त्यांच्या या प्रयत्नानंतर अनेक विचारवंतांना या सार्वजनिक धोरणशास्त्राच्या अभ्यासास प्रोत्साहन मिळत गेले.

**येहेझ्केल ड्रॉर**

डेव्हिड ईस्टन, लास्वेल यांच्यापेक्षा वेगळे विश्लेषण येहेझ्केल ड्रॉर ने केले आहे. वेगवेगळ्या सामाजिक शास्त्रांमध्ये सौदेबाजीची जी गरज असते ती सार्वजनिक धोरणशास्त्र या विद्याशाखेत पूर्ण होते. त्याने ज्ञानाच्या तीन पातळ्या मांडल्या आहेत. त्या म्हणजे १) पर्यावरण नियंत्रण, २) व्यक्ती व समाजावर नियंत्रण, ३) नियंत्रणावर नियंत्रण या होत. पर्यावरणाचे ज्ञान आधुनिक आहे. पर्यावरणावर नियंत्रण हा भाग विज्ञान व तंत्रज्ञानाच्या ताब्यात आहे. व्यक्ती व समाजावर नियंत्रण ठेवण्याचे ज्ञान मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहे. या प्रकारचे नियंत्रण ठेवण्याचा भाग मानव्यविद्या किंवा सामाजिक शास्त्राच्या ताब्यातील भाग आहे. परंतु सर्वात कमी विकसित ज्ञान म्हणजे नियंत्रणावर नियंत्रण ठेवण्याचे ज्ञान. हे क्षेत्र कोणाच्या ताब्यात नसलेले व दुर्लक्षित झालेले क्षेत्र धोरणशास्त्राचा मुख्य गाभा आहे. मानवी दुःखांना मानवी ज्ञान हेच कारण आहे. ज्ञानाचे दुर्लक्षित असे हे क्षेत्र अपघाती नाही किंवा त्याची वाढ ही काही विशिष्ट भागापुरतीच विकसित झालेली नाही. यासाठी प्रत्येक नव्या पिढीने ज्ञानाचा संपूर्ण दृष्टिकोण विचारात घेऊन, निर्माण झालेली पोकळी भरून काढली पाहिजे.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे मोठ्या प्रमाणावर बदल होतात, आधुनिकता निर्माण होते; परंतु यामुळे मुल्यपुरवठा होऊ शकत नाही. ड्रॉरच्या मते, ज्ञानातील आधुनिकता ही एकसंधपणे वाढली पाहिजे. यावर आधारित नियम ड्रॉरने मांडला असून त्यालाच 'ड्रॉरचा कायदा' या नावाने ओळखले जाते.

**येहेझ्केल ड्रॉर प्रणित कायदाः**

मानवी क्षमता पर्यावरणाला आकार देण्याचा प्रयत्न करतात. या क्षमता जरी सारख्या असल्या तरी धोरणनिश्चितीची क्षमता वाढविण्यासाठीचा प्रयत्न समाज व मानव सतत करीत असतो. हा कायदा असे सुचवितो की, दिशा देणारी संस्था समाजाकडे आहे. या परिस्थितीला सामाजिक मार्गदर्शक व्यवस्था असे ड्रॉर म्हणतो. सामाजिक मार्गदर्शक व्यवस्थेची धोरणनिश्चिती हा एक महत्वाचा विभाग आहे. ड्रॉरने ज्ञानाच्या एकात्मीकरणावर भर दिला असून या सरावासाठी त्याने अनेक सूचना मांडल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) सामाजिक शास्त्रामधील अडथळे मोडले पाहिजेत.

२) निव्वळ आणि उपयोजित शास्त्रामधील मोठी दरी भरून काढली पाहिजे.

३) 'मूल्यनिरपेक्ष शास्त्र' ही संकल्पनाच नाकारली पाहिजे.

४) मूल्यविकास मांडणाऱ्या सिद्धांताना मान्यता मिळाली पाहिजे.

चांगला समाज निर्माण करायचा असेल तर चांगले समाजउपयुक्त सिद्धांत मांडले पाहिजेत. सामाजिक कृती ही मूल्याशिवाय घडून येत नाही. समाजामध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक

करण्याचा दृष्टिकोन ज्ञानाने स्विकारावा. 'घ्या किंवा सोडून द्या' असा दृष्टिकोन स्विकारू नये. ड्रॉर ऐतिहासिक दृष्टिकोन नाकारतो. परंतु प्रत्येक मानवाला प्राचीन इतिहास असतो, प्रत्येक जण त्याचा भाग असतो. त्यामुळे इतिहासाला नाकारता येत नाही, असा ड्रॉरने फरक केला आहे. धोरणनिश्चितीसाठी शास्त्रीय ज्ञाननिर्मिती करताना अनेक समस्या येतात. त्या समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) हा सिद्धांत सूक्ष्म पातळीवर भर देतो. धोरणनिश्चितीला मदत करत नाही.

२) ज्ञान खंडित झाल्याने त्याचा उपयोग होत नाही.

३) नवीन कृती तयार न करता धोरणनिर्मितीमध्ये केवळ वाढ केली जाते. नवीन धोरणांची आखणी की जी जुन्या धोरणांवर आधारीत नाही, त्याला नवीन कल्पना, नवीन कृती म्हणतात.

४) धोरणनिश्चिती हा अत्यंत लहान विभाग असून त्यांचे अभ्यासक्षेत्र सुद्धा मर्यादित आहे. सामजिक आणि राजकीय घटकांकडे ते दुर्लक्ष करते. ज्ञानाचे व संशोधनाचे एकत्रित स्वरूप स्पष्ट केले गेले नसल्यामुळे उपलब्ध ज्ञानाचा वापर धोरणशास्त्राला करून घेता येत नाही.

या समस्या बाजूला सारून त्यावर मात करून धोरणशास्त्राचा विकास झाला पाहिजे, असे ड्रॉरचे मत होते. यासाठी सर्व सामाजिक शास्त्रे एकत्रित आली पाहिजेत. निसर्गावरील नियंत्रण, मानव व समाजावरील नियंत्रण यांचा एकत्रित अभ्यास झाला पाहिजे. ज्ञानावर अधिक भर देऊन धोरणशास्त्राने नियंत्रणावर नियंत्रण ठेवण्याचे क्षेत्र ताब्यात घेतले पाहिजे. सामाजिक मार्गदर्शन व्यवस्था अधिक बळकट करावी. धोरणशास्त्राने या उद्दिष्टासाठी कार्यकेले पाहिजे. जागतिक ज्ञानामध्ये असे काही विभाग लोक आहेत ज्यांना नवीन बदल स्विकारार्ह नाही. धोरणशास्त्राच्या अभ्यासकांनी ही समस्या विचारात घेऊन ती सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे मत येहेक्झेल ड्रॉरने व्यक्त केले आहे.

अशाप्रकारे ईस्टन, लास्वेल आणि ड्रॉर ने धोरणशास्त्र विकसित करण्याचा प्रयत्न केला. राज्यशास्त्राला धोरणशास्त्रामध्ये रुपांतरित करण्यावर त्यांचा भर होता. यामुळे राज्यशास्त्राचा सैद्धांतिक पाया बळकट होईल, असे ईस्टनचे मत होते. धोरणाबाबत ज्या समस्या आहेत त्या सोडविण्यामध्ये धोरणशास्त्र व धोरणशास्त्रज्ञ यांची भूमिका कोणती यावर लास्वेलने भर दिला आहे. ड्रॉरने धोरणशास्त्राच्या विकासासाठी अनेक सूचना केल्या. ईस्टन व लॉस्वेल यांच्या प्रयत्नांमुळे धोरणशास्त्राचा अमेरिकेमध्ये जास्त विकास झाला.

**स्वयंअध्ययन प्रश्नः– १.२.६ (ड)**

१) डेव्हिड ईस्टन यांनी आपल्या कोणत्या ग्रंथात 'व्यवस्था विश्लेषणाचा पुरस्कार' केला आहे?

२) ईस्टनच्या मते राज्यशास्त्राचा पाया कोणत्या गोष्टीवर आधारित असतो?

३) लास्वेलने धोरणशास्त्राचा कोणता अर्थ स्पष्ट केला आहे?

४) ड्रॉरने ज्ञानाच्या कोणकोणत्या पातळ्या सांगितल्या?

## १.३ सारांश

सार्वजनिक धोरण ही उपविद्याशाखा राज्यशास्त्रापासून स्वतंत्र झाली. याचा नव्याने अभ्यास अमेरिकेत होऊ लागला. ''शासन ज्या गोष्टींची पर्यायामधून निवड करते किंवा करत नाही, त्या म्हणजे सार्वजनिक धोरण होय.'' असे थॉमस डाय यांचे मत आहे. सार्वजनिक धोरण हे ध्येयानुवर्ती असून शासनाच्या सामूहिक कृतीचा तो परिपाक असतो. सार्वजनिक धोरण हे सकारात्मक किंवा नकारात्मक असते. सामूहिक कल्याण हेच त्याचे उद्दिष्ट असते. धोरण निर्धारण, विश्लेषण, अंमलबजावणी, धोरण राजकारण यांचा संबंध, विविध क्षेत्रातील धोरण, दबावगट संघटनांचा प्रभाव इ. गोष्टी व्याप्तीत येतात.

सार्वजनिक धोरण विश्लेषणाला चार हजार वर्षापासूनचा इतिहास आहे. बॅबिलॉन शहरापासून सार्वजनिक धोरणाच्या इतिहासाला सुरूवात होते. दुसऱ्या महायुद्धानंतर या विद्याशाखेला स्वतंत्र विद्याशाखेचा दर्जा मिळविण्यात यश आले. १९८० च्या दशकात विद्यापीठीय स्तरावर याचा समावेश अभ्यासक्रमात झाला. आज मान्यता असलेले अभ्यासक्षेत्र म्हणून सार्वजनिक धोरणाला ओळखले जाते. कल्याणकारी राज्य व्यवस्थेच्या उदयामुळे 'सार्वजनिक धोरण' विद्याशाखेला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाला आहे. ही शाखा सरकारच्या धोरण विश्लेषणास उपयुक्त असून सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास तितकीच आवश्यक आहे. सरकारला कल्याणकारी सामूहिक कृतीसाठी सार्वजनिक धोरण अभ्यास उपयुक्त ठरतो. या विद्याशाखेअंतर्गत 'धोरण निर्धारक, धोरण विश्लेषक, अभ्यासक' अशा रोजगाराच्या संधी निर्माण होत असून या शाखेचे महत्व वाढत जाणारे आहे.

धोरणशास्त्राच्या उदयाची चर्चा डेव्हिड ईस्टन, हॅरॉल्ड लास्वेल व ड्रॉर यांच्या विचारांशिवाय होऊ शकत नाही. या तीन लेखकांच्या लिखाणातून धोरणशास्त्राचा विकास झाला. राज्यशास्त्राला धोरणशास्त्रामध्ये रुपांतरीत करण्यावर त्यांचा भर होता. त्यामुळे राज्यशास्त्राचा सैद्धांतिक पाया बळकट होईल असे ईस्टनचे मत होते. ईस्टन व लॉस्वेल यांच्या प्रयत्नांमुळे धोरणशास्त्राचा अमेरिकेत जास्त विकास झाला.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थः

- **लोकप्रशासन**ः सार्वजनिक हिताच्या दृष्टीने प्रशासनाने केलेली कृती म्हणजे लोकप्रशासन.
- **ध्येयानुवर्ती**ः ध्येयाकडे घेऊन जाणारे.
- **सामूहिक हित**ः ज्यात सर्वांचे कल्याण समाविष्ट असते.
- **लोकहितैषी**ः लोककल्याणकारी.
- **प्राधान्यविषयक**ः ज्यास प्रथम पसंती असते त्यासंबंधीत.
- **विधिजन्य**ः कायदेविषयक.

- **अल्पजनसत्ता**: काही निवडक लोक सत्ताधारी असणे.
- **आंतरविद्याशाखीय**: सर्व शास्त्रांचा एकमेकांशी परस्परसंबंध असणे.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्ययन प्रश्न – १.२.३ (अ) ची उत्तरे**

१) सार्वजनिक धोरण या विद्याशाखेचा उगम राज्यशास्त्र व लोकप्रशासन या दोन शाखेंतून झाला आहे.

२) थॉमस डाय यांच्या मते, ''शासन ज्या गोष्टींची पर्यायांमधून निवड करते किंवा करत नाही, त्या म्हणजे सार्वजनिक धोरण होय.''

३) कायदा, वटहुकूम, न्यायालयीन निर्णय, कार्यकारी आदेश, निर्णय इ. सार्वजनिक धोरणाची विविध रूपे आढळतात.

४) 'Public' या इंग्रजी शब्दाची उत्पती चौदाव्या शतकात झाली.

५) 'सार्वजनिक हा राष्ट्रातील लोकसंख्येचा परस्परसंबंधी अभिरुची, गुणवत्ता असलेला लोकांचा गट असतो.' असा अर्थ माल्कम वेबस्टर शब्दकोशामध्ये दिलेला आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न – १.२.४ (ब) ची उत्तरे**

१) बॅबिलॉन

२) धोरणशास्त्रे

३) फ्रँकलिन रुझवेल्ट

४) ज्ञान-उद्योग शाखा

**स्वयंअध्ययन प्रश्न – १.२.५ (क) ची उत्तरे**

१) डेव्हिड ईस्टन, हॅरॉल्ड लास्वेल, येहेझ्केल ड्रॉर यांनी सार्वजनिक धोरण विद्याशाखेची सैद्धांतिक मांडणी केली.

२) 'संपूर्ण समाजासाठी अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण करणे' हे राजकीय व्यवस्थेचे महत्वाचे कार्य आहे.

३) धोरणांमुळे न्याय, स्वातंत्र्य, समता, सामाजिक वाटपात्मक न्याय, केंद्रीकरण, विकेंद्रकरण यासारख्या मूल्यव्यवस्थेत बदल घडून येतो.

**स्वयंअध्ययन प्रश्न – १.२.६ (ड) ची उत्तरे**

१) डेव्हिड ईस्टन यांनी आपल्या 'Political System An Inquiry into the state of Political Theory.' या ग्रंथात व्यवस्था विश्लेषणाचा पुरस्कार केला आहे.

२) ईस्टनच्या मते राज्यशास्त्राचा पाया विश्लेषण आणि सिद्धांत यावर आधारित असतो.

३) 'समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त असलेल्या ज्ञानाचे मूल्यमापन करण्याची निवडप्रक्रिया अभ्यासणे' हा लास्वेलने धोरणशास्त्राचा अर्थ स्पष्ट केला आहे.

४) येहेझ्केल ड्रॉरने पुढीलप्रमाणे ज्ञानाच्या तीन पातळ्या सांगितल्या आहेत. १) पर्यावरण नियंत्रण २) व्यक्ती व समाजावर नियंत्रण ३) नियंत्रणावर नियंत्रण या होत.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टीपा लिहा.**

१) धोरण शास्त्राचा अर्थ

२) सार्वजनिक धोरण विद्याशाखेचा विकास

३) हॅरॉल्ड लास्वेल यांचा सार्वजनिक धोरणविषयक दृष्टिकोण

४) सार्वजनिक धोरणाचे स्वरूप

५) सार्वजनिक धोरणाची व्याप्ती

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा.**

१) सार्वजनिक धोरणाचा अर्थ सांगून त्याचे स्वरूप विशद करा.

२) सार्वजनिक धोरणविद्याशाखेचे महत्व विशद करा.

३) सार्वजनिक धोरणशास्त्राचा अर्थ सांगून व्याप्ती विशद करा.

४) सार्वजनिक धोरणसंदर्भात डेव्हिड ईस्टनचे विचार सांगा.

५) येहेझ्केल ड्रॉर यांचे सार्वजनिक धोरण संदर्भातील विचार स्पष्ट करा.

६) सार्वजनिक धोरणशास्त्राचा वैचारिक पाया थोडक्यात स्पष्ट करा.

७) सार्वजनिक धोरण विद्याशाखेचा विकास कसा झाला ते विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) डॉ. पवार प्रकाश, २०१०: सार्वजनिक धोरण-संकल्पना, सिद्धांत आणि भारतीय सार्वजनिक धोरणाचा आढावा, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२) डॉ. पोहेकर प्रिती, २०१६: भारताचे सार्वजनिक धोरण, विद्या प्रकाशन पुणे.

३) Anderson, James E., 1975, Public Policy Making, Praeger, New York.

४) Dye. Thomas R, 2004, (Singapore) Pte. Ltd., Indian Branch, Delhi.

५) Verma S. P., (ed) (2004), Emerging Descipline of Policy Sciences Unit 5, School of Social Sciences IGNOU; New Delhi.

❑❑❑

## घटक २

# सार्वजनिक धोरण निर्मिती आणि अंमलबजावणी

(Public Policy : Making and Implementation)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ सार्वजनिक धोरणाचे अर्थ, व्याख्या, सार्वजनिक धोरणाची प्रक्रिया

२.२.२ सार्वजनिक धोरण प्रक्रियेचे स्वरूप

२.२.३ सार्वजनिक धोरण निर्मितीचे टप्पे

२.२.४ सार्वजनिक धोरणनिर्मितीचे आधार

२.२.५ सार्वजनिक धोरणनिर्माण करणारे शासकीय घटक

२.२.६ सार्वजनिक धोरण निर्मितीमधील स्वयंसेवी/अशासकीय संस्थांची भूमिका

२.२.७ सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी आणि मूल्यमापन

२.२.८ सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीतील घटक

२.२.९ आंतरराष्ट्रीय घटकांची भूमिका

२.२.१० सार्वजनिक धोरणाचे मूल्यमापन

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्न

२.६ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यास पुढील उद्‌दिष्टे साध्य करता येतील.

- सार्वजनिक धोरणाची निर्मिती प्रक्रिया समजेल.
- सार्वजनिक धोरणनिर्मिती घटकांचा अभ्यास करता येईल.
- सार्वजनिक धोरण निर्मितीचे आधार समजतील.
- सार्वजनिक धोरण निर्मितीमधील स्वयंसेवी संस्था/असहकारी घटकांची भूमिका समजेल.
- सार्वजनिक धोरणाचे अंमलबजावणीचे घटक समजतील.

## २.१ प्रास्ताविक

धोरण ठरविताना मुख्यत्वे शासनाने जनतेला दिलेली अभिवचने किंवा शासनाच्या कालखंडात उद्‌भवलेल्या समस्यांची उकल यांचा प्रभाव पडतो. हे दोन्ही घटक एकमेकात मिसळलेले आढळून येतात. निवडणुकीतील जाहीरनामा म्हणजे वचननामाच असतो. त्यानुसार शासन कार्यक्रमांची आखणी करून त्यांची अंमलबजावणी करते. उदाहरणार्थः अण्वस्त्र सज्जता, पाटबंधाऱ्यांची कामे, पायाभूत सुधारणांचा कार्यक्रम इत्यादी राष्ट्रीय राज्यीय समस्यांना वचननाम्यात भावनिक आव्हान करण्यात येते. त्यानुसारही धोरणनिश्चिती करावी लागते. उदा. आरक्षण, सीमा प्रश्न इत्यादी संबंधीचे धोरणात्मक निर्णय शासनाच्या कालखंडात उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करताना त्यासंबंधीचेही धोरणविषयक निर्णय शासन घेते. उदाहरणार्थः भाववाढ रोखण्यासाठी घेतलेले निर्णय, व्यावसायिक किंवा समाजहितसंबंधी अट (Interest group) आपल्या हितसंबधांना अनुकूलता असे लोकमत तयार करतात आणि शासनावर प्रभाव टाकून त्यासंबंधीचे धोरण निश्चित करण्यास त्याला प्रवृत्त करतात. त्याचप्रमाणे असे धोरण ठरविण्यास मदतही करतात. उदाहरणार्थः पर्यावरणासंबंधी धोरण संघराज्य पद्धतीत केंद्रशासन आणि घटकशासन यांचाही धोरण ठरविताना एकमेकांवर प्रभाव पडतो. पाणीवाटपासंबंधीचे धोरण हे त्याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. "Policy making is a porduct of ideology, attitude, national interest, class interest, national and class prejudices and the interest of self preservation"-शारदा प्रसाद.

## २.२ विषय विवेचन


धोरणप्रक्रिया ही नियंत्रित व नियमित वाढीची (incremental) असू शकते. यामध्ये धोरणामधील बदल सीमान्त (Marginal) असून तो नियमित व नियंत्रित असतो. गतवर्षाच्या धोरणांचे परिणाम आणि प्रतिक्रिया लक्षात घेऊन त्यानुसार चालू धोरण ठरविले जाते. त्यात मागील चुकांची दुरुस्ती किंवा अपेक्षांची पूर्तता दिसून येते किंवा मागील धोरणाच्या लक्ष्यप्राप्तीनुसार पुढच्या टप्प्याच्या

कार्यक्रमाची सुरुवातही असते. ''आधीच्या धोरणाचा तो स्वाभाविक विकास असून त्यात अकस्मात उद्‌भवणारे प्रश्न, धोरणात्मक दिशा-बदल आणि खर्च यांना वाव नसतो.'' विकासपातळीवर वरच्या श्रेणीत असलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रातील धोरण-प्रक्रिया सीमान्त वाढीची (Marginal Incrementalism) असल्याचे दिसून येते. विकसनशील देशात राष्ट्रउभारणीचे व त्यानुसार सामाजिक परिवर्तनाचे पर्व सुरु असल्याने महत्वाकांक्षी आणि व्यापक बदलांची दिशा दाखविणारे मूलगामी व दूरगामी असे धोरण प्रक्रियेचे स्वरुप असते. अशा धोरणाच्या निर्मितीची आणि अंमलबजावणीची प्रक्रिया प्रशासनात अनेक घटकाकडून होत असते.

## २.२.१ सार्वजनिक धोरणाचे अर्थ, व्याख्या, सार्वजनिक धोरणाचे प्रक्रिया

सार्वजनिक धोरणाची निश्चिती, अंमलबजावणी व मुल्यमापन शासन संख्या आणि बिगरसरकारी घटक अशा दोन घटकांमार्फत होते. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ हे तीन घटक शासनसंस्थेच्या वतीने सार्वजनिक धोरणात भूमिका पार पाडतात. तर दबाव गट, प्रसारमाध्यमे, स्वयंसेवी संघटना इत्यादी घटक बिगरसरकारी घटक म्हणून सार्वजनिक धोरणाला आकार देण्याचा प्रयत्न करतात. धोरण प्रक्रियेत विल्डावस्की यांच्या मतानुसार मुख्यत्वें दोन घटक असतात. एक बौद्धिक जाणिवेचा (Intellectual Cogitative) दुसरा सामाजिक आंतरप्रक्रियेचा (Social Interaction) त्यानुसार बुद्धिनिष्ठतेच्या कसोटीवर उतरली पाहिजे. त्यातील कार्यकारण भाव हा अकल्पित किंवा अपघाती असता कामा नये आणि त्याचे विवेचन, करता आले पाहिजे. त्याचबरोबर सामाजिक आंतरप्रक्रियेच्या संदर्भानुसार धोरण प्रभावित करणाऱ्या सामाजिक आणि राजकीय संघटना व संस्था यांच्या परस्परसंबंधाचे परिणामही अंतिम निर्णयात कल, तडजोड, लक्षगट, अग्रक्रम (Dias Accommodation, Target Group and Priority) यांमध्ये दिसून आले पाहिजेत. थॉमस डे, आर. आय. हाफरबर्ट, जेम्स ॲव्हरसन, गान्स मेरिल, शरकान्सकी या विचारवंतांनी सार्वजनिक धोरण निर्मिती ही एक राजकीय प्रक्रिया असते या विचाराचे समर्थन केलेले आहे. लोकांकडून केली जाणारी मागणी, व्यक्त होणाऱ्या इच्छा, अपेक्षा यांना राजकीय मूल्य, राजकीय परिणाम लाभत असते. त्याचे मूर्त रुप सार्वजनिक धोरण असते. सार्वजनिक धोरण ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये तंत्र व तत्वांचा अवलंब केला जातो. ती पुढील तीन क्रियांच्या व टप्प्यांच्या माध्यमातून पूर्ण होत असते.

## २.२.२ सार्वजनिक धोरण प्रक्रिया स्वरुप




सार्वजनिक धोरणप्रक्रियेचे विवेचन आणि विश्लेषण ही एक गुंतागुंतीची, अनेकअंगी प्रक्रिया आहे. सद्यःस्थितीचे विचेचन करीत असताना तिच्यापुढील समस्यांचे निदानही करण्याचा प्रयत्न न

केल्यास विवेचन निर्हेतुक व अनावश्यक ठरेल. समस्येचे उत्तर शोधताना ज्या समाजगटासमोर ती समस्या आहे किंवा त्या समस्येने त्यांच्यापुढे ज्या अडचणी निर्माण केलेल्या आहेत, त्या सोडविण्यासाठी विविध पर्याय आणि त्यांचे परिणाम यांची स्पष्ट कल्पना संबधित समाजगटास असणे आवश्यक आहे. कारण, त्यासाठी करावा लागणारा सेवा-सुविधांच्या संदर्भातील त्याग त्यांच्याकडूनच अपेक्षित आहे. वेगवेगळ्या पर्यायांच्या गुणदोषांची तौलानिक मांडणी केल्यानंतर त्यातील जास्तीत जास्त चांगला पर्याय निवडणे शक्य होते. लक्ष्यसाह्याच्या दृष्टीने साधनांची जुळवाजुळव आणि मागील अनुभवांचा संदर्भ लक्षात घेऊनच धोरण हे समस्येचे भविष्यकाळातील उत्तर शोधत असते.

सार्वजनिक धोरणनिर्मिती आणि धोरणविश्लेषण या दोन्ही प्रक्रिया परस्परपूरक आहेत. एकाशिवाय दुसरी प्रक्रिया एकमेकांना अवास्तव वा आधारशून्य बनविते, तर एकाबरोबर दुसरी प्रक्रिया एकमेकांना प्रभावी व कार्यक्षम करु शकते. धोरणविश्लेषण प्रक्रिया केवळ बौद्धिक आणि वास्तवाशी संबंध नसलेली प्रक्रिया नाही. कोणतेही धोरण राजकीयदृष्ट्या समर्थनीय, आर्थिकदृष्ट्या परवडणारे, तांत्रिकदृष्ट्या निर्दोष आणि प्रशासकीयदृष्ट्या अमलात आणता येणारे असावे. राजकीय आणि प्रशासकीय नेतृत्वाकडून या चार अपेक्षांचा मेळ घातला जावा, ही अपेक्षा आहे.

- **सार्वजनिक धोरण निर्मिती** (Formulation of Public Policy)

शासनाच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यामध्ये सातत्य टिकून राहावे यासाठी सार्वजनिक धोरणाची निर्मिती केली जाते. लोकांच्या मागण्या, गरजा आणि सरकारचे सामर्थ्य, क्षमता या सर्वांचे मिळून धोरण तयार होते. धोरण निर्मिती ही एक राजकीय क्रिया आहे. एका चांगल्या धोरणाची निर्मिती ही सरकारची जबाबदारी असते.

जेम्स ॲन्डरसन यांच्यामते धोरण निर्मिती क्रियेवर पर्यावरणीय घटकांचा प्रभाव पडत असतो. विशेषतः राजकीय संस्कृती आणि सामाजिक, आर्थिक चलिते हे सार्वजनिक धोरणांवर सर्वाधिक प्रभाव टाकणारे घटक आहेत.

सार्वजनिक धोरणाची निर्मिती ही प्रत्येक राज्यासाठी, प्रत्येक सरकारसाठी अत्यंत आवश्यक व अनिवार्य क्रिया आहे. धोरण निर्माण करणे ही एक पद्धतशीर, तांत्रिक क्रिया असते. धोरण निर्मात्यासमोर उत्कृष्ट धोरण निर्माण करणे हे एक आव्हान असते. धोरण अपयशी होणे हे सरकारचे अपयश असते. विशेषतः संरक्षण धोरण, आर्थिक धोरण, आरोग्य धोरण ही धोरणे सरकारच्या अस्तित्वावर थेट परिणाम करतात. त्यामुळे उत्कृष्ट धोरणाची निर्मिती कोणत्याही सरकारसाठी सत्ता सातत्याचे एक माध्यम असते. धोरण निर्मिती ही एक दीर्घ क्रिया आहे. अनेक विचारवंतांनी त्याचे वेगवेगळे टप्पे सांगितेलेले आहेत. जेम्स अँडरसन यांनी पुढील चार टप्पे सांगितेलेले आहेत.

१) सार्वजनकि समस्येचे शोधन

२) सार्वजनिक समस्येचा विषय- पत्रिकेमध्ये समावेश

३) धोरणाच्या पर्यायांची निवड

४) धोरणाची निर्मिती

अमिताई ईल्झोनी यांनी पुढील सात टप्पे सांगितलेले आहेत.

१) समस्येचे शोधन

२) धोरण निर्मितीच्या निकषांचे शोधन

३) पर्यायांचा विकास

४) पर्यायांचे मूल्यमापन

५) पर्यायांची निवड

६) निवडीची अंमलबजावणी

७) निर्णयाचे मूल्यमापन

हर्बर्ट सायमन यांनी खालील पाच टप्पे सांगितलेले आहेत.

१) समस्या निरुपण

२) उपयांचा शोध

३) पर्यायांची निवड

४) क्रियान्वयन

५) नियंत्रण

वरील तीनही धोरण निर्मिती टप्प्यांचा विचार केला असता पुढील टप्पे पाडता येतात.

१) सार्वजनिक समस्येचे शोधन


२) सार्वजनिक समस्येचा विषयपत्रिकेमध्ये समावेश

३) पर्यायांचा विकास

४) पर्यायांची निवड

५) धोरणांची निर्मिती

## २.२.३ सार्वजनिक धोरण निर्मितीचे टप्पे




### १) **सार्वजनिक समस्येचे शोधन** (Identifying Public Problem)

सार्वजनिक समस्या हे धोरण निर्मितीचे एक कारण असते. समस्येचे नेमके कारण, तिची तीव्रता त्यासाठी लागणारा अंदाजित वेळ, सामुग्री या सर्व बाबींचा यात शोध घेतला जातो. जितका मोठा समूह समस्येने ग्रस्त असेल तितकी ती अधिक व्यापक समजली जाते. समस्या सोडविण्यासाठी लागणारी साधने धोरणाच्या अपेक्षित लाभावरुन निश्चित केली जातात. विशेषतः आर्थिक साधने लाभाच्या किमतीहून कमी असतील याची काळजी घेतली जाते. लाभाची सामाजिक व्याप्तीदेखील विचारात घेतली जाते. या पहिल्या टप्प्यामध्ये समस्येचा सर्व बाजूंनी विचार केला जातो.

### २) **समस्येचा विषयपत्रिकेमध्ये समावेश** (Inclusion of Problem in a Policy Agenda)

भारतासारख्या राष्ट्रामध्ये अनेक दबावगट, संघटना, राजकीय पक्ष सक्रिय आहेत, जे सातत्याने शासनावर दबाव व प्रभाव टाकत असतात. मागणी घटना व कायदाबाह्य असेल तर किंवा प्रस्थापित सरकारच्या विचारप्रणालीस विसंगत असेल तर तिचा विचार केला जात नाही. काही वेळा प्रसार माध्यमे शासनाला एखादे धोरण स्वीकारण्यास भाग पाडतात. जर सरकारी पातळीवर सर्वानुमते किंवा बहुमताने एखादे धोरण गरजेचे वाटले तर त्याच्या निर्मितीचा विचार होत असतो.

### ३) **पर्यायांचा विकास** (Developing Alternatives)

विषयपत्रिकेमधील ज्या विषयावर धोरण निर्माण करण्याचे ठरलेले असेल त्याच विषयांचा विचार या टप्प्यामध्ये केला जातो. पर्यायांचा शास्त्रीय, व्यावहारिक पातळीवर विचार केला जाऊन त्यांचा योग्य विकास करता येतो. प्रामुख्याने कोणता पर्याय समस्येचे निराकरण करण्यात किती यशस्वी ठरु शकेल, यावरून त्यांचा विकास केला जातो.

### ४) **पर्यायाची निवड** (Selection of Alternative)

पर्यायाची अंतिम निवड करण्याचा हा टप्पा अत्यंत कसोटीचा ठरतो. या टप्प्यामध्ये चिकित्सक मार्ग पद्धत (Critical path Method) वापरली जाते. पर्यायांच्या राबवणूक व अंतिम यशाच्या

संभाव्यतेची ही चिकित्सा असते. बहुसंख्य गटास लाभदायी असणारा आणि गुंतवणुकीइतका किंबहुना त्याहून अधिक लाभ देणारा पर्याय अंतिमतः निवडला जातो. हा लाभ केवळ आर्थिक स्वरुपात न पाहता कार्यकारी स्वरुपात मोजला जातो. उदः ई-प्रशासन. शासनाची कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि गतिशीलता वाढविणाऱ्या धोरणांचा अंतिम निवड ही शासनाची लोकप्रियता वाढविण्यास किंवा घटविण्यास कारणीभूत ठरते.

**५) धोरणाची निर्मिती** (Policy Making)


अनेक पर्यायांचा आधार घेऊन धोरणाची अंतिम संहिता संबंधीत मंत्रालयाकडून जारी केली जाते. संबंधित सर्व कार्यालयांना धोरणाची प्रत पाठविली जाते. धोरण निर्मितीची ही क्रिया पूर्ण झाल्यानंतर अंमलबजावणी क्रिया सुरु होते. सार्वजनिक धोरण प्रक्रियेतील निर्मिती ही पहिली क्रिया आहे. धोरण जितके उत्कृष्ट असेल तितकी त्याची अंमलबजावणी सुलभपणे करता येते.

सार्वजनिक धोरण हे अंमलबजावणीच्या दृष्टीने विविध रुपांमध्ये विभाजित केले जाते.

१) कायदा (Law) २) योजना (Scheme) ३) कार्यक्रम (Programme) ४) अभियान (Mission) ५) ठराव (Resolution) ६) विधान (Ordinance) ७) आदेश (Orders)

या स्वरुपात धोरण अंमलबजावणीकरता जारी केले जाते.

## २.२.४ धोरण निर्मितीचे आधार




धोरण निर्माण करण्यास हे तीन आधार पुरेसे ठरतात.

**१) समाजाची गरज** (Need of the Society)

सार्वजनिक धोरण सामाजिक समस्या निर्मूलनाच्या गरजेतून निर्माण केले जाते. समाजातील कोणत्याही लोक घटकांची समस्या सोडविण्यासाठी, गरजांची पुर्तता करण्यासाठी, विकास साधण्यासाठी धोरण आखले जाते. त्यासंबंधीची मागणी काही वेळा त्या घटकाकडून केली जाते. काही वेळा तो घटक इतका जागरुक नसतो की काही मागणी करावी. अशा वेळी शासनकर्ते त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने धोरण निर्माण करतात. उदा. आदिवासी धोरण, बाल कुपोषण प्रतिबंधक धोरण इत्यादी. सार्वजनिक धोरण हे सार्वजनिक विकासार्थ राबविले जाते. समाजाच्या प्रत्येक घटक विकासाच्या मुख्य प्रवाहात हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे.

**२) राज्यघटना** (Constitution)

राज्यघटना हा जगण्याचा, व्यवहारांचा आधार असतो. राज्याच्या कार्यांचे दिशादर्शन असते. विशेषतः भारताची राज्यघटना राज्याच्या धोरण निर्मिती कार्याचे मार्गदर्शन करणारी आहे. कलम ३६ ते ५१ यामध्ये नोतिनिर्धारणाची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट आहेत. राज्यघटनेमुळे राज्याच्या धोरणांला एक दिशा प्राप्त होते. इंग्लंडसारख्या राष्ट्रामध्ये अलिखित राज्यघटना असली तरी देखील ती धोरण आखताना आधारभूत असते.

सरकार जरी बदलले तरी धोरणात सातत्य असेल तर कोणताही समाज विकास साधू शकतो धोरण निर्मितीस मार्गदर्शन व त्यातील सातत्य टिकविण्याची जबाबदारी केवळ राज्यघटनेची असते. वुड्रो विल्सन यांनी असे म्हटलेले आहे. ''राज्य घटनेची चौकट निर्माण करण्यापेक्षा ती राबविणे अधिक अवघड असते.''

## २.२.५ सार्वजनिक धोरण निर्माण करणारे घटक

सार्वजनिक धोरणाची निर्मिती, अंमलबजावणी व मूल्यमापन शासन संस्था आणि बिगरसरकारी घटक अशा दोन घटकांमार्फत होते. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ हे तीन घटक शासन संस्थेच्या वतीने सार्वजनिक धोरणात भूमिका पार पाडतात. दबाव गट, प्रसारमाध्यमे स्वयंसेवी संघटना इत्यादी घटक बिगरसरकारी घटक म्हणून सार्वजनिक धोरणाला आकार देण्याचा प्रयत्न करतात.

- **सार्वजनिक धोरणनिर्माण करणारे शासकीय घटक**

**अ) राजकीय घटक**

१) कायदे मंडळ

२) कार्यकारी मंडळ

३) निवडणूक

४) राजकीय पक्ष

५) दबाव गट

६) सामाजिक चळवळ

**ब) बिगरराजकीय घटक**

१) न्यायमंडळ

२) नोकरशाही

३) तज्ज्ञ सल्लागार

४) स्वंयसेवी संघटना

५) प्रसार माध्यमे

**कायदेमंडळ** (Legislature)

लोकशाही राष्ट्रामध्ये सभाग्रहे धोरण निर्माण करणारी सर्वोच्च यंत्रणा असते. जसे भारत व इग्लंडमध्ये संसद, अमेरिकेमध्ये कॉंग्रेस इत्यादी कायदे मंडळ हे धोरणाला अंतिम देते. परंतू अलिकडील काळामध्ये कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाला सार्वजनिक धोरण निर्माण करण्याची अधिकार आहे. परंतू या दोन घटकांच्या तुलनेत न्याय मंडळ अधिक क्रियाशील झाल्यामुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या सार्वजनिक धोरण निर्माण प्रक्रियेमध्ये घट होताना दिसते. तसेच कायदे मंडळ सार्वजनिक हितसंबंध आणि सार्वजनिक धोरण यांच्या संबंधातील सांगड घालण्यात अपयश येण्यातून कायदे मंडळाकडील सार्वजनिक धोरण निर्माण करण्याची अधिकार कार्यकारी मंडळामकडे सरकारला आहे.

**कार्यकारी मंडळ** (Executive Objects)

धोरण निर्मिती हे कार्यकारी मंडळाकडे मुख्य कार्य असते. भारतासारख्या संसदीय लोकशाही व्यवस्थेत सरकारचे नेतृत्व हे पंतप्रधानांच्या हाती असते. पंतप्रधान हा खरा किंवा वास्तव कार्यकारी प्रमुख असतो. राजकीय व्यवस्थेमध्ये धोरणनिर्मितीचे कार्य अध्यक्षीय पद्धतीत अध्यक्ष तर संसदीय पद्धतीत पंतप्रधान करीत असतो. औपचारिक दृष्टीने किंवा घटनात्मक दृष्टीने तो धोरणाचा एकमेव प्रवक्ता असला तरी वास्तवात एकमात्र निर्माता नसतो. अर्थात, धोरणनिर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर पंतप्रधान किंवा अध्यक्ष या प्रमुख राजकीय कार्यकारी पदावर असलेल्या व्यक्तीचा निश्चित प्रभाव पडत असतो.

- **धोरणनिर्मितीतील कार्यकारी मंडळाची भूमिका**

१) कॅबिनेट

२) पंतप्रधान

३) कॅबिनेट सचिवालय पंतप्रधान सचिवालय

**कॅबिनेट**

धोरणनिर्मितीमध्ये कॅबिनेटची भूमिका महत्वाची असते कॅबिनेटच्या मान्यतेशिवाय कोणतेही धोरण अमलात येऊ शकत नाही. काही वेळेस कॅबिनेट काही योजना धोरण परीक्षणासाठी उपसमित्यांकडे देखील पाठवू शकते. सामुहिक जबाबदारीच्या तत्वानुसार कॅबिनेट काम करते. धोरण पद्धती उदयाला आणण्यापेक्षा समाधानकारक धोरण तयार करण्यावर कॅबिनेट भर देते.

१) कॅबिनेट राष्ट्रीय धोरणाची दिशा व्यक्त करण्यात भूमिका घेते.

२) वेगवेगळ्या विभागांनी तयार केलेल्या योजनांना मान्यता देणे व संसदेपुढे सादर करणे.

३) राज्याच्या आर्थिक स्थितीला कॅबिनेट जबाबदार असते.

४) संसदेपुढे कोणत्या प्रकारचे धोरण सादर करावयाचे व त्यासाठी किती वेळ द्यायचा, हे कॅबिनेट ठरविते.

५) उच्च पदस्थांच्या नेमणूका करण्याचे कार्यही कॅबिनेटला करावे लागते.

वरील कार्ये कॅबिनेट पार पाडत असते. तसेच कॅबिनेच्या राजकीय व्यवहार समिती व आर्थिक व्यवहार समिती या दोन समिती महत्त्वाच्या असतात.

**पंतप्रधान**

पंतप्रधान हा कॅबिनेटचा प्रमुख नेता असतो. त्यामुळे अनेकदा कॅबिनेटचा निर्णय हा पंतप्रधानांचा निर्णय असतो. पंतप्रधान हा धोरणनिर्मितीतील एक महत्वाचा घटक असला तरी वास्तवात एक मात्र निर्माता नसतो. अर्थात धोरणनिर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर पंतप्रधान किंवा अध्यक्ष या प्रमुख राजकीय कार्यकारी पदावर असलेल्या व्यक्तीचा निश्चित प्रभाव पडत असतो. पंतप्रधान त्याचे मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य विधिमंडळ (सत्ताधारी आणि विरोधी पक्ष सदस्य) टप्प्याचे ज्येष्ठ सनदी नोकर, हितसंबंधी गट, लोकमताचे प्रवक्ते, राजकीयदृष्ट्या जागरुक असे नागरिक या सर्वांचा धोरणनिर्मितीच्या कार्यात आपापल्या परीने आणि आपापल्या पातळीवर वाटा असतो परंतु धोरणाचा आकार मात्र पंतप्रधानाच्या व्यक्तीमत्त्वावर अवलंबून असतो.

**कॅबिनेट सचिवालय व पंतप्रधान** (Cabinet Secretariate and Prime Minister's Office)

भारत सचिवालय व पंतप्रधान कार्यालय हे धोरण निर्मितीवर प्रभाव टाकरणारे दोन महत्वाचे घटक आहेत. मंत्री परिषदेइतकाच अप्रत्यक्ष प्रभाव सचिवालयाचा असतो. मंत्रिमंडळ (कॅबिनेट) सचिवालय ही प्रशासकीय यंत्रणा आहे, तसेच सचिवालय मंत्रिमंडळाला सल्ला देत असते. प्रत्येक समस्येवरील निर्णय-धोरणांच्या नोंदी सचिवालय ठेवत असते. धोरण निर्मितीच्या कार्यामध्ये मार्गदर्शन, समन्वयन व माहितीचे प्रसारण करीत असते.

धोरण निर्माण केल्यानंतर ते सर्व मंत्रालयांना, सर्व विभागांना, कार्यालयांना पाठविण्याचे काम सचिवालयाचे असते. पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो. 'मंत्रिमंडळरुपी नौकेचा सुकाणूधारी'असे पंतप्रधानाला म्हटले जाते. पंतप्रधान कार्यालय हे पंतप्रधानांचे सर्व प्रशासकीय व्यवहार पाहत असते. १९७० च्या दशकानंतर या कार्यालयाचे वर्चस्व वाढलेले आहे. पंतप्रधानांचे आणि पर्यायाने मंत्रिपरिषदेचे बहुतांश निर्णय पंतप्रधान कार्यालयातूनच घेतले जाऊ लागले. त्यामुळे पंतप्रधान कार्यालय व मंत्रिमंडळ सचिवालय या दोन्ही प्रशासकीय यंत्रणांचा प्रभाव पडत असतो.

**नोकरशाही**

नोकरशाहीची प्रत्यक्ष क्रिया सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीशी संबधित असते. अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणून नोकरशाहीचा सार्वजनिक धोरण क्रियेमध्ये सहभाग असतो. धोरणनिर्मिती ही राजकीय क्रिया असते आणि धोरणाची अंमलबजावणी ही प्रशासकीय क्रिया असते. सनदी सेवा, नोकरशाही हे प्रशासनाचे मूर्त रुप असते. सार्वजनिक धोरणनिर्मिती प्रक्रियेमध्ये सरकारला सल्ला देण्याचे, मार्गदर्शन करण्याचे, माहिती पुरविण्याचे काम करते. धोरणांची अंमलबजावणी करण्याचे उत्तरदायित्व नोकरशाहीचे असते. नोकरशाही ही सातत्य राखणारी असते. राजकीय नेत्यांहून अभ्यासू, माहितगार असते. सनदी सेवेच्या सातत्य, स्थैर्य, व्यवसायिकता या गुणांमुळे ती धोरणनिर्मितीमध्ये स्थैर्य व सातत्य आणते.

- **अकार्यकारी घटक** (Non-Executive Objects)

लोकशाही राष्ट्रामध्ये मंत्रिमंडळावर प्रभाव टाकरणारे अनेक असतात ते घटक पुढील प्रमाणे आहेत.

**प्रसारमाध्यमे:**

प्रसारमाध्यमे ही माहिती व विचारांची देवाण–घेवाण करणारी साधने असतात. यामाध्यमांच्या साह्याने एकाच वेळेस मोठ्या जनसमुदायाशी संपर्क साधता येतो. आकाशवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट, वृत्तपत्रे, नियतकालिके व अगदी अलीकडे संगणकीय सुविधांमधून निर्माण झालेली ‘इंटरनेट’ सारखी प्रमुख माध्यमे आहेत. सार्वजनिक धोरणनिर्मिती, अंमलबजावणी, आणि सार्वजनिक धोरणांच्या मुल्यमापनामध्ये प्रसारमाध्यमे महत्वाची भूमिका पार पाडतात.

समाजाला योग्य ध्येयाकडे घेऊन जाणारे धोरण हे महत्वाचे साधन आहे. म्हणूनच धोरणाची निर्मिती काळजीपूर्वक झाली पाहिजे. लोकशाही व्यवस्थेमध्ये वृत्तपत्रांना स्वातंत्र्य असते. विचार व भावना व्यक्त करण्याचे तंत्र प्रसारमाध्यमे असतात यांचा प्रभाव धोरणानिर्मितीवर होतो .

**जनमत** (Public Opinion)

जनमत हा जनतेचा धोरण निर्मितीमधील सक्रिय सहभाग असतो. जनमत विरोधी धोरणाचे परिणाम निवडणुकीच्या माध्यमातून दिसतात. जेम्स मेडिसन यांनी शासनाच्या अधिक लोकशाहीकरणाच्या दृष्टीने ही संकल्पना मांडलेली आहे. धोरण अधिक सामाजिक, सांस्कृतिक व व्यक्ति गटनिष्ठ होण्यासाठी त्याबाबत जनमताचा प्रभाव विचारात घ्यावा लागतो. पियर्सन पॉल यांच्या मते मतदार वर्तणुकीतून धोरणाबाबतचे जनमत स्पष्ट होत असते. निकोप व सशक्त लोकशाही राष्ट्रांमध्ये जनमताचा धोरणावर व्यापक परिणाम पडतो. विकसित राष्ट्रांमध्ये धोरणावर व्यापक परिणाम पडतो. विकसित राष्ट्रांमध्ये धोरणाबाबत जनमत आजमावणाऱ्या स्वतंत्र्य संघटना निर्माण करण्यात आलेल्या आहेत. उदाः American Association for Public Opinion Research, European Society for Opinion and Marketing Research, World Association for

Public Opinion Research, Walter Lippmann, Gabriel Trade इत्यादी. भारतातही The Indian Institute of Public Opinion Pvt. Ltd., यशदा सारख्या संस्था अधिकृतपणे जनमताचा आढावा घेत असतात.

**दबावगट**

सरकारच्या धोरणात विशिष्ट हितसंबंधाचे हेतू पूर्ण करवून घेणारा गट म्हणजे दबाव गट होय. इबन्स्टीनच्या मते दबाव गट हा सार्वजनिक धोरणावर परिणाम घडवून आणणारा खाजगी, अराजकीय गट असतो. धोरण निर्मिती मध्ये जनता व सरकार यांच्यामधील मध्यस्थांचे काम दबावगट करतात. इ. स. १७६९ मध्ये इंग्लंडमध्ये स्थापन झालेला Society for the Supporters of the Bill of Rights हा पहिला दबावगट मानला जातो. भारतासारख्या वैविध्यपूर्ण व गुंतागुंतीच्या समाजरचनेमध्ये प्रत्येक समाज घटक आपापले दबाव गट निर्माण करून धोरणावरील दबाव दाखवित असतो.

**नागरी समाज** (Civil Society)

सार्वजनिक धोरणाबाबत नागरी समाज जेव्हा मत नोंदवतो, मागणी करतो तेव्हा सरकारला त्याचा विचार करावा लागतो. हेच नागरी समाजाचे वैशिष्टे आहे असे जीन कोहेन व ॲन्ड्र्यु अॅरेहो यांनी म्हटले आहे. युरोपीय राष्ट्रांमध्ये हा नागरीसमाज अत्यंत सक्रियपणे धोरण निर्मितीवर परिणाम करत असतो. नैतिक, मूल्यधिष्ठित व सहयोगी मार्गाने संघटना करून सरकारी धोरणांवर प्रभाव टाकणारे अनेक गट समाजात सक्रिय असतात. हेगेल, फ्रेड्रिक एंजल्स, कार्लमार्क्स, मॅक्सवेबर या विचारवंतांनी नागरी समाजाच्या अस्तित्वास पूरक लेखन केलेले आहे. म्हणूनच लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी आज सर्वाधिक उपयोगी समजला जाणारा नागरी समाज हा एक घटक आहे.

**२.२.६ स्वयंसेवी / अशासकीय संस्था** (Voluntary / Non-Governmental Organisations)

इ. स. १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती झाल्यानंतर संघटनेनेच काही अभिकरणांना तिचा दर्जा, बैठका इत्यादींचे निरीक्षण करण्याचे अधिकार दिले आणि त्या अभिकरणांना स्वयंसेवी/ अशासकीय संघटना संबोधले. तेव्हापासून अशा संघटनांची लोकप्रियता व प्रमाण वाढत गेले. अ-शासकीय संघटनांचा आंतरराष्ट्रीय सहसंबंध असतो. त्याचबरोबर त्या स्थानिक क्रियेशी संबंधीत असतात. अनेकविध विषयांवर अशा संघटना काम करतात. उदा. महिला, बालक, वृद्ध, कुष्ठरोगी, एडस् इत्यादी पीडितांबरोबरच पाणी, स्वच्छता अशा विषयांवर काम करणाऱ्या असंख्य संघटना आहेत. सरकारवर प्रभाव टाकून एखादे धोरण स्वीकारण्यास भाग पाडतात.

**राजकीय पक्ष** (Political Party)

प्रथापित सरकारचा राजकीय पक्ष धोरण निर्मितीवर प्रभाव टाकत असतो. निवडणुकीपूर्वी पक्षाने जी आश्वासने दिलेली असतात त्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तो पक्ष धोरण स्वीकारत असतो, सरकारचे धोरण हे पक्षाचे धोरण असते. लोकशाही शासन प्रणालीमध्ये राजकीय पक्ष अनिवार्य

असतात. गेटेल यांच्या मते राजकीय पक्ष हा सत्ता संपादनासाठी संघटित झालेला समविचारी लोकांचा गट असतो. आगामी निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाची सत्ता टिकवून ठेवण्यासाठी राजकीय पक्ष धोरणावर प्रभाव टाकतात.

**सामजिक चळवळी**

सार्वजनिक धोरण आणि सामाजिक चळवळी यांचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सहसंबंध येत असतो. सामाजिक चळवळीचा उदय व विकास सार्वजनिक धोरणाच्या वादविवादावरच आधारलेला असतो. सामाजिक चळवळीचा कल सार्वजनिक धोरणामधून आपले ध्येय साध्य करण्याकडे असतो. सामाजिक चळवळींनी उभ्या केलेल्या प्रश्नावर आधारित धोरण निर्माण करण्यास धोरणकर्ते प्राधान्य देतात. तसेच सामाजिक चळवळीमार्फत समाजामध्ये धोरण अंमलबजावणीतील दोष पसरविले जातात याचा परिणाम सार्वजनिक धोरणावर होत असतो.

**सारांश**

सार्वजनिक धोरण निर्मितीमध्ये शासकीय व बिगरशासकीय अशी दोन प्रकारची माध्यमे आहेत. तसेच राजकीय व बिगरराजकीय अशा दोन प्रकारचे माध्यमसुद्धा आहेत जनता, प्रस्थापित सरकार, प्रशासन यांच्या सहसंबंधातून धोरणनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण होत असते. लोकशाही बळकट करण्यासाठी, एक सशक्त व प्रभावी राष्ट्र निर्माण करण्यासाठी उत्कृष्ट धोरण निर्मिती आवश्यक आहे.

## २.२.७ सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी आणि मूल्यमापन

सार्वजनिक धोरणाचे अंमलबजावणी ही एक तांत्रिक क्रिया आहे. जिथे धोरण निर्मिती संपते तेथे अंमलबजावणी सुरू होते. ती एक संपूर्ण प्रशासकीय क्रिया आहे. अंमलबजावणीच्या क्षमतेवरून धोरणाचे यश-अपयश स्पष्ट होत असते.

इ.स. १९७३ नंतर सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी हे अभ्यासाचे स्वतंत्र क्षेत्र मानले गेले. निर्मिती व अंमलबजावणी क्रिया भिन्न आहेत आणि त्यांचा वेगवेगळा अभ्यास केला जावा हा विचार पुढे आला. त्यानंतर अंमलबजावणीची सैद्धांतिक बांधणी केली जाऊ लागली.

**सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी : अर्थ** (Meaning)

सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी जितकी प्रभावीपणे केली जाते तितकी धोरणे यशस्वी होतात. केवळ चांगले धोरण आखून राज्याचा विकास होत नाही. विकासाप्रत नेणाऱ्या धोरणाची योग्य राबवणूक हा त्याचा मार्ग आहे. त्यासाठी अंमलबजावणीच्या व्याख्या अभ्यास करणे आवश्यक आहे.

१) **पी. जॉन :** अंमलबजावणी ही सार्वजनिक धोरणप्रक्रियेतील उद्देश कार्यान्वित करणारी अवस्था आहे. (Implementation is the stage in the policy process concerned with turning policy intentions into action)

२) **सुसन बॅरेट व कॉलडीन दुज :** अंमलबजावणी ही धोरणात्मक निर्णयाच्या दिशेने घडणाऱ्या घटनांची मालिका असते, जी धोरणाला विविध नेतृत्व व संस्था यांच्या चिकित्सक कार्यामध्ये रूपांतरित करते आणि निर्धारित केल्यानुसार त्या घडाव्यात यासाठी साधनांची उपलब्ध आहे, याची खात्री ठरवून देते. (Implementation process is a sequence of events triggered off by a policy decision, involving the translation of policy into operational tasks to be carried out by avarjety of actors and agencies and substantial co-ordinating activity to ensure that resources are available and that things are intended.)

### **२.२.८ सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीतील घटक** (Factors) :

मेरिली, ग्रिन्डल यांच्या मते धोरणाची अंमलबजावणी तेव्हाच शक्य होते जे धोरणाची साध्ये व साधिते स्पष्ट असतात. आणि ती पूर्ण करण्याकरिता आवश्यक व पुरेसा निधी प्राप्त झालेला असतो. त्यांनी अंमलबजावणीचे वर्णन 'प्रशासकीय कार्यवाही' असे केलेले आहे.

पुढील घटकावर सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी अवलंबून असते.

■ **अंमलबजावणीतील घटक**

१) कर्मचारी वर्ग

२) निधी

३) प्रशासकीय क्षमता

४) राजकीय इच्छाशक्ती

५) वैधानिक पाठिंबा

६) न्याय प्रोत्साहन

**१) कर्मचारी वर्ग :** सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी क्रिया प्रामुख्याने मानवी संसाधनावर अवलंबून असते. म्हणजे ती करणारी मानवी कर्मचारी यंत्रणा कितपत गांभीर्याने, क्षमतेने अंमलबजावणी करते यावरून तिचे यश ठरते. कर्मचारीवर्ग कार्यक्षम, कार्यगती असणारा असेल तर धोरण यशस्वी होते.

**२) निधी :** वित्त हा राज्याचा आत्मा आहे, असे कौटिल्य यांनी म्हटलेले आहे. जोपर्यंत राज्याची वित्तीय स्थिती सशक्त राहत नाही तोपर्यंत ठरविलेले कोणतेही काम पार पाडता येत नाही. धोरणाची अंमलबजावणी करताना निधी व अनुदान वेळेवर प्राप्त झाली तर प्रशासन कामे करू शकते.

**३) प्रशासकीय क्षमता :** जगभरातील प्रशासकीय व्यवस्थांसमोर काही समस्या असतात. उदा. भ्रष्टाचार, लालफितशाही, नोकरशाही इत्यादी. या समस्या प्रशासकीय कार्यक्षमतेवर परिणाम करतात. सार्वजनिक धोरणाचे अंमलबजावणी करीत असताना या समस्या दूर करणे आवश्यक असते.

**४) राजकीय इच्छाशक्ती :** सार्वजनिक धोरणाची निर्मितीमध्ये राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची असते. ते कार्य कार्यकारी मंडळामार्फत जाते. त्यामुळे धोरणाच्या अंमलबजावणी क्रियेवर कार्यकारी मंडळाचे नियंत्रण नेहमी असते.

**५) वैधानिक पाठिंबा :** सार्वजनिक धोरण निर्मितीमध्ये कार्यकारी मंडळाची भूमिका महत्त्वाची असते. परंतु निश्चित केलेले धोरण कायदेमंडळाच्या संमतीखेरीज राबविले जात नाही. म्हणून या सार्वजनिक धोरणांच्या कायदेमंडळाचे नियंत्रण, प्रभाव असते.

**६) न्याय प्रोत्साहन :** सार्वजनिक धोरणांची निर्मिती सरकारने केल्यानंतर त्या धोरणाची रीतसर अंमलबजावणी न केल्यास न्यायालय हस्तक्षेप करून सरकारला ते करण्यास भाग पाडते.

अशाप्रकारे वरील घटकावर सार्वजनिक धोरणाचे अंमलबजावणीचे कार्य अवलंबून असते.

त्याचबरोबर समाज, स्वयंसेवी संस्था, नेतृत्व, लोकसहभाग, न्यायमंडळ, प्रशासकीय यंत्रणा या घटकांचा सार्वजनिक धोरणाचे अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण सहभाग असतो. उपलब्ध संसाधनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची असते. जर अपयश आल्यास सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असते. त्यामुळे सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यावरच राष्ट्राचा विकास अवलंबून असतो.

### २.२.९ आंतरराष्ट्रीय घटकांची भूमिका (Role of Transnational Actors)

राजकारणामध्ये स्थानिक घटक, प्रादेशिक घटक, राष्ट्रीय घटक आणि आंतरराष्ट्रीय घटक राजकीय प्रक्रिया घडवून आणतात. यामुळे सार्वजनिक धोरणावरती देशाबाहेरील घटकांचा प्रभाव पडता. देशाबाहेरील घटकांमध्ये राष्ट्रसंघ (UN), संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक, प्रादेशिक संघटना यांचा प्रभाव पडतो. देशांतर्गत शांतता आणि सुव्यवस्थेचे धोरण ठरविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ सातत्याने प्रयत्न करत असतो. यामुळे प्रत्येक देशाचे सार्वजनिक धोरण ठरविताना जागतिक शांततेला महत्त्व दिले जाते. युद्धविरोध हा मुख्य विचार सार्वजनिक धोरणात सामील केला जातो. १९९० नंतर बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणावरती वेगवेगळ्या देशांमध्ये स्थापन झाल्या. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि बहुराष्ट्रीय बँका देशाच्या सार्वजनिक धोरणाला आकार देताना पुढाकार घेताना दिसतात तसेच लॉबिंग करताना दिसतात. यामुळे देशाबाहेरील घटक देशाच्या अंतर्गत सार्वजनिक धोरणावरती प्रभाव टाकतात. देशाच्या अंतर्गत धोरणाला नवीन आकार देतात असे दिसते.

## १) **राष्ट्रसंघ (लीग ऑफ नेशन्स) :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात आंतरराष्ट्रीय संघटनांच्या भूमिकेला महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संघटनांना विशेष महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. इ.स. १९१४ ते १९१८ या कालावधीत पहिले महायुद्ध झाले. ११ नोव्हेंबर १९१८ ला पहिले महायुद्ध समाप्त झाल्याची घोषणा करण्यात आली. युद्ध समाप्तीनंतर जगास आनंद झाला मात्र त्यानंतर शांतता प्रस्थापित करणे जास्त गरजेचे होते. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी एका जागतिक संघटनेची गरज ओळखून प्रे. विड्रो विल्सन यांना १४ कलमी योजना आखली.

पहिल्या जागतिक महायुद्धाने संपूर्ण जगाचे तसेच विशेष युरोप खंडाचे संपूर्ण समाजजीवन उद्ध्वस्त केले होते. युद्धाचा प्रत्यक्ष अनुभवच जगाने घेतल्याने याविषयी सर्वत्र भिती पसरली होती. पहिल्या महायुद्धाची प्रमुख कारणे म्हणजे आत्यंतिक राष्ट्रवाद, फाजील दुराभिमान व राष्ट्राराष्ट्रांतील जीवघेणी स्पर्धा व संघर्ष होय. त्यामुळे या सर्व गोष्टींना आळा घालणे अत्यावश्यक होते. तसेच राष्ट्रांराष्ट्रांतील संघर्ष व तंटे सामोपचाराने आणि शांततेच्या मार्गाने सोडविणे हीदेखील एक काळाची गरज होती. त्यासाठी युद्धासारख्या भयानक मार्गाचा अवलंब केला जाऊ नये हा विचारही पुढे येवू लागला. त्यासाठी एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेची गरज जगातील अनेक विचारवंतांना वाटू लागली. अशारितीने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या विचारातून प्रे. वूड्रो विल्सन यांच्या पुढाकाराने १० जानेवारी, १९२० मध्ये राष्ट्रसंघ (League of Nations) या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली.

राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली असली तरी त्या कालखंडात राष्ट्रसंघासारखी आंतरराष्ट्रीय संघटना यशस्वी होण्यासाठीची अनुकूल परिस्थिती नव्हती. कारण बड्या राष्ट्रांचा हस्तक्षेप, व्हर्सायची अन्यायकारक संधी, रशिया व अमेरिका यासारखी बलाढ्य राष्ट्रे राष्ट्रसंघात सामील झाली नाहीत. आर्थिक मंदी इ. सारख्या अनेक उणीवा किंवा मर्यादा राष्ट्रसंघात होत्या. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्यात राष्ट्रसंघ यशस्वी होऊ शकला नाही. त्यामुळे १९३९ ला दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात झाली आणि राष्ट्रसंघ अपयशी ठरला असे म्हटले गेले. मात्र राष्ट्रसंघ स्वतः अपयशी ठरला नाही. तर त्याच्या सभासद राष्ट्रांनीच या संघटनेस अपयशी ठरविले.

## २) **संयुक्त राष्ट्रसंघ** (United Nations)

इ.स. १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले. राष्ट्रसंघ अपयशी ठरला आणि दुसऱ्या महायुद्धास सुरुवात झाली. अल्पावधीतच या युद्धाने भयानक रूप धारण केले. तेंव्हा दुसरे महायुद्ध सुरू असतनाच युद्धाच्या यशापयशाच्या पलिकडे जाऊन मित्र राष्ट्रांनी जगाला युद्ध, भीती यापासून कशी मुक्तता देता येईल याचा विचार करून नव्या जागतिक संघटनेच्या प्रस्थापनेची गरज प्रतिपादित केली त्यानुसार २४ ऑक्टोबर, १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघटना अस्तित्वात. अनेक करार, परिषदा आणि मुत्सद्दी लोकांच्या प्रयत्नातून या संघटनेचा उदय झालेला आहे. परंतु या संघटनेच्या स्थापनेचे श्रेय प्रामुख्याने प्रे. रुझवेल्ट यांना दिले जाते.

संयुक्त राष्ट्रसंघाचे कामकाज कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी सहा प्रमुख अगांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये (१) महासभा, (२) सुरक्षामंडळ, (३) आर्थिक व सामाजिक मंडळ, (४) विश्‍वस्त मंडळ, (५) आंतरराष्ट्रीय न्यायालय, (६) सचिवालय

या प्रमुख अंगांचा तर अ) आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, ब) खाद्य व कृषीसंघटन, क) जागतिक आरोग्य संघटना, ड) संयुक्त राष्ट्राची शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना, ई) आंतरराष्ट्रीय बँक या प्रमुख उपांगाचाही समावेश होतो.

जागतिक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने अनेक आंतरराष्ट्रीय जटील प्रश्‍न सोडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. याशिवाय आरोग्य, शिक्षण, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातही संयुक्त राष्ट्र संघटनेने उल्लेखनीय कार्य केले आहे. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय मुद्राकोष (I.M.F.), आंतराष्ट्रीय कामगार संघटना (I.L.U.), युनेस्को (U.N.E.S.C.O.), आरोग्य संघटना (W.H.O.), खाद्य व कृषी संघटना (F.A.O.) या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या उपांगांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. युनिसेफ (United Nations Children's Emergency Fund) या संस्थेच्या माध्यमातून युनोने बालकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न केले आहेत. सकस आहार, चांगले आरोग्य, शिक्षण यासाठी खास बालनिधीची सोय युनिसेफमार्फत करण्यात आली आहे.

**आशियान** (ASEAN – Association of Southeast Asian Nations) **:**

आग्नेय आशियातील काही राष्ट्रांनी एकत्र येवून आशियान या क्षेत्रीय संघटनेची स्थापना केली आहे. इ.स. १९६७ मध्ये बँकॉंक जाहिरनाम्याद्वारे या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. सुरुवातीला इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स, सिंगापूर, थायलंड ही पाच राष्ट्रे या संघटनेची सभासद होती. त्यानंतर ब्रुनेई, व्हिएतनाम, लाओस, म्यानमार आणि कंबोडिया ही राष्ट्रे या संघटनेत समाविष्ट झाली. आज या संघटनेत दहा राष्ट्रांचा सहभाग आहे.

या संघटनेतील बहुतेक राष्ट्रे साम्राज्यवादाला बळी पडलेली आहेत. त्यामुळे दारिद्र्य, निरक्षरता, बेरोजगारी, आर्थिक व सामाजिक मागासलेपण या प्रामुख्याने या संघटनेतील राष्ट्रांच्या प्रमुख समस्या आहेत. त्यामुळे आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक विकासाला चालना देणे, आशियाई विभागात शांतता व स्थैर्य प्रस्थापित करणे, शेती, उद्योग, व्यापाराच्या क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविण्यावर भर देणे, तांत्रिक, शैक्षणिक, प्रशासकीय प्रशिक्षण व संशोधन सुविधा पुरविणे इ. या संघटनेची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.

आशियान तिच्या सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात साह्यभूत ठरली असे या संघटनेचे सदस्य असलेल्या काही राष्ट्रांचा विकासाचा दर ७ ते ८ टक्के इतका दिसून आला आहे. त्यामुळे या सदस्य राष्ट्रांपैकी काही राष्ट्रांची गणना विकसित राष्ट्रांमध्ये होऊ लागली आहे. त्यामुळे त्यांचा 'आशियाई वाघ' असा नामोल्लेख होतानाही दिसतो.

### ३) बहुराष्ट्रीय कंपन्या :

बहुराष्ट्रीय कंपनी ही एक कार्पोरेट संस्था आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे आंतरराष्ट्रीय नियम, आंतरराष्ट्रीय कार्पोरेशन यांचा विकास होतो. आंतरराष्ट्रीय कंपन्या एकापेक्षा अनेक देशांमध्ये गुंतवणूक करतात. कारखाने स्थापन करणे, बंदर बांधणे, शहर उभारणी करणे अशी कामे बहुराष्ट्रीय कंपन्या करतात. ईस्ट इंडिया कंपनी ही यापैकीच एक होती. तसेच डच ईस्ट इंडिया कंपनीदेखील कृतीशील होती. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये यांचा सहभाग असतो. १८७३ मध्ये स्थापन झालेली रेवो, हिरो कंपनी सार्वजनिक धोरण ठरविण्यामध्ये सहभाग होत होती. जागतिक पातळीवरती पेट्रोलियमला महत्त्व आहे. या क्षेत्रात आंग्लो इराणी तेल कंपनी, रॉयल डच सेल, कॉलिफोर्नियाची मानक तेल कंपनी (शेव्हरॉन), गल्फ ऑईल, टेक्साको, स्टँडर्ड ऑईल कंपनी ऑफ न्यू जर्सी, स्टँडर्ड ऑईल कंपनी ऑफ न्यूयार्क या बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. या कंपन्या तेलाचे धोरण ठरवितात. त्यांचा प्रभाव सार्वजनिक धोरणावरती पडतो. थेट विदेशी गुंतवणूक या घटकावरदेखील या घटकाचा प्रभाव पडतो. बहुराष्ट्रीय कंपन्या देशाच्या सार्वजनिक धोरणाला त्यांच्या पद्धतीने आकार देण्याचा प्रयत्न करतात.

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवहाराला सूचिबद्ध तसेच नियंत्रित करण्यासाठी गॅट GATT – General Agreement on Trade and Tariff या संघटनेची स्थापना १९४९ मध्ये झाली. पुढे याच संघटनेचे डंकेल प्रस्तावाच्या शिफारसीनुसार १ जानेवारी, १९९५ रोजी WTO – World Trade Organization जागतिक व्यापार संघटनेमध्ये रूपांतर करून स्थापना करण्यात आली. आज WTO मार्फत जागतिक पातळीवरील बहुराष्ट्रीय कंपन्यांचा व्यापार व आर्थिक व्यवहार नियंत्रित केले जात आहेत. WTO जागतिक व्यापाराविषयी आपले धोरण जाहीर करते त्यानुसार बहुराष्ट्रीय कंपन्या आपले धोरण आखत असतात.

बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे Multi National Corporations होय. या कंपन्या जगभरात कोणत्याही देशात वस्तू आणि सेवांची आयात आणि निर्यात करतात. मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करतात. टोयोटा, मॉनसँटो, फोर्ब्स ग्लोबल, फोर्ड फाऊंडेशन, आय. बी. एम., ॲमेझॉन, मॅकडोनाल्ड इ. प्रचंड मोठा आर्थिक व्यवहार करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. या कंपन्या सरकारच्या सार्वजनिक धोरणावर प्रभाव टाकत असतात.

याचबरोबर World Bank, International Monetary Fund या आंतरराष्ट्रीय संस्थाही देशाच्या सार्वजनिक धोरणावरती आपला प्रभाव टाकत असतात. जागतिक पातळीवरील या मोठ्या आर्थिक संस्थांवर अमेरिका, रशिया, चीन, युरोपियन संघ इ. देशांचे वर्चस्व आहे. त्यामुळे आपोआपच हे मोठे देश आपल्या सोयीनुसार इतर देशावर आपले सार्वजनिक धोरण लादत असतात. आर्थिक दुर्बल देशांना आपले सार्वजनिक धोरण या बड्या राष्ट्रांच्या मर्जीप्रमाणे आखावे लागते. थोडक्यात, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून बडे देश जगाची आर्थिक धोरणे ठरवित आहेत.

**सरावासाठी प्रश्न**

१) आंतरराष्ट्रीय राजकारणातील आंतरराष्ट्रीय घटकांची भूमिका स्पष्ट करा.

## २.२.१० सार्वजनिक धोरणाचे मूल्यमापन (Evaluation of Public Policy)

सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी केल्यानंतर ते धोरण यशस्वी होईल का आणि त्यातून समाजाची किती प्रगती साधता येईल, हे पाहण्यासाठी त्याचे मूल्यमापन केले जाते. धोरण यशस्वी झालेले आहे का, त्याची उद्दिष्टपूर्ती झालेली आहे का आणि त्यासाठी पूर्वनिर्धारित खर्चामध्ये ते काम पार पडलेले आहे का, हे पाहण्यासाठी धोरणाचे मूल्यमापन आवश्यक असते. सार्वजिक धोरणाचे मूल्यमापन दोन प्रकारे केले जाते. पहिले, धोरण निर्माण करताना गृहितकांच्या आधारे आणि दुसरे, धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर त्याच्या परिणामांचे मूल्यमापन. या दोन्ही पद्धतींनी मूल्यमापन होऊ शकते. परंतु मूल्यमापनाचा दुसरा प्रकार अधिक उपयुक्त व तर्कशुद्ध आहे.

**सार्वजनिक धोरणाचे मूल्यमापन : अर्थ** (Meaning) :

१) **थॉमस डे :** धोरण मूल्यमापन म्हणजे सार्वजनिक धोरणाची फलिते तपासणे होय. (Policy Evaluation is learning about the conseqences of public policy)

२) **जोसेफ होले :** राष्ट्रीय कार्यक्रमाच्या उद्दिष्टपूर्तीची परिणामकारकता तपासणे म्हणजे धोरणाचे मूल्यमापन होय. (Policy Evaluation is the assessment of the overall effectiveness of a national programme in meeting its objectives)

मूल्यमापन क्रिया ही विस्तारवादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करणारी आहे. धोरणाचे अंतिम टप्प्यामध्ये मूल्यमापन करून त्यातील त्रुटी, उणिवा दूर करता येतात. काही वेळा यश-अपयशाची संभाव्यता गृहीत धरून मूल्यमापन केले जाते.

**सार्वजनिक धोरण मूल्यमापनाची उद्दिष्टे** (Objectives) :

**१) धोरणाची कार्यवाही तपासणे :** धोरण आखताना निश्चित केलेली उद्दिष्टे त्याच्या कार्यवाहीतून पूर्ण होतात का हे तपासण्यासाठी त्याचे मूल्यमापन केले जाते. धोरणाची निर्मिती चांगली असेल, परंतु अंमलबजावणी जर चांगल्या पद्धतीने होत नसेल तर ते फसते. त्यामुळे त्याच्या अंमलबजावणीची पद्धत तपासून ती योग्य दिशेने होत आहे का, हे तपासले जाते.

**२) धोरणाचा प्रभाव तपासणे :** धोरण कितीही चांगले असले तरी ते लोकोपयोगी असावे लागते. तसे ते आहे हे जनतेने मानावे लागते. धोरणाचा नेहमीच जनतेवर वेगवेगळा प्रभाव पडत असतो.

**३) धोरणाची अद्ययावत माहिती ठेवणे :** धोरण राबविताना ते काही ठिकाणी अधिक परिणामकारक करते तर काही ठिकाणी त्याचा प्रभाव कमी पडतो. ज्या ठिकाणी त्याची प्रभावशीलता कमी असेल, अशा भागासाठी स्वतंत्र उपाययोजना केल्या जातात. ज्या ठिकाणी धोरणाचा सकारात्मक प्रभाव पडलेला असेल तिथे ते किती प्रमाणात यशस्वी झालेले आहे ते तपासता येते. अशा प्रकारची अद्ययावत माहिती ठेवणे आवश्यक असते.

४) **समस्येच्या निवारणाचे प्रमाण तपासणे :** समस्या दूर करणे हा धोरणनिश्चितीचा एक उद्देश असतो. धोरणाच्या निर्मिती व अंमलबजावणीतून तिचे निवारण होत आहे का, हे मूल्यमापनामुळे स्पष्ट होते. धोरणाची समस्या निर्मूलनातील उपयोगिता लक्षात येते.

५) **पर्याय शोधणे :** एखादे धोरण चांगले असते, त्याची अंमलबजावणी देखील रीतसर होत असते. तरीदेखील ते समस्या दूर करू शकत नाही. अशा वेळी धोरणांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना व कार्यक्रमांना पर्याय शोधले जातात.

वैधानिक मंडळे, नियंत्रक व महालेखा परीक्षक विविध आयोग, कार्यान्वयन कर्मचारी इत्यादी यंत्रणाकडून सार्वजनिक धोरणाचे मूल्यमापन केले जाते. समस्येवर धोरणाचा किती परिणाम झालेला आहे? धोरणाचे सामाजिक व नैतिक मूल्य समजण्यासाठी मूल्यमापन आवश्यक असते. त्यातूनच सार्वजनिक धोरणाला गती प्राप्त होऊन देशाच्या विकासाला चालना मिळते.

## २.३ सारांश

सार्वजनिक धोरण निर्मिती आणि अंमलबजावणी या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणाला सार्वजनिक धोरणाच्या निर्मितीचे घटक समजतात. तसेच धोरण निर्माण करीत असताना अनेक घटक परिणाम करीत असतात या सर्वांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सार्वजनिक धोरण ठरविताना मुख्यत्वे शासनाने जनतेला दिलेली अभिवचने किंवा शासनाच्या कालखंडात उद्भवलेल्या समस्यांची उकल यांचा प्रभाव पडतो. या घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. सार्वजनिक धोरणनिर्मिती ही एक राजकीय प्रक्रिया आहे. लोकाकडून केली जाणारी मागणी, राजकीय मूल्य याचे मूर्त रूप सार्वजनिक धोरण असते. सार्वजनिक धोरण प्रक्रियेचे विवेचन आणि विश्लेषण ही एक गुंतागुंतीची, अनेकअंगी प्रक्रिया आहे. सार्वजनिक धोरण निर्मिती आणि धोरण विश्लेषण या दोन्ही प्रक्रिया परस्परपूरक आहेत. सार्वजनिक धोरणाची निर्मिती आणि अंमलबजावणी ही प्रत्येक राज्यासाठी, प्रत्येक सरकारसाठी अत्यंत आवश्यक व अनिवार्य क्रिया आहे. १९९१ नंतरच्या जागतिकीकरणाच्या धोरणामुळे जगभर बहुराष्ट्रीय कंपन्या विस्तारित गेल्या. या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून बडे देश जगाची आर्थिक धोरणे ठरवित आहेत.

## २.४ पारिभाषिक शब्द व त्याचा अर्थ

- **पब्लिक :** सार्वजनिक, सरकारी
- **Policy :** धोरण
- **Interest Group :** समाजहित संबंधी
- **Incremental :** नियिमत वाढीची
- **Intellectual Cogitative :** बौद्धिक जाणीव
- **Public Opinion :** जनमत

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न

**अ) योग्य पर्याय निवडून योग्य उत्तरे लिहा.**

१) सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी करणारे मुख्य घटक ओळखा.

अ) कायदे मंडळ ब) कार्यकारी मंडळ क) न्याय मंडळ ड) राष्ट्रपती

२) सार्वजनिक धोरण निर्मितीवर कोणत्या घटकाचा परिणाम अधिक जाणवतो?

अ) पंतप्रधान ब) राष्ट्रपती क) राज्यपाल ड) न्यायाधीश

३) सार्वजनिक धोरण निर्मितीवर प्रभाव टाकणारे बिगर राजकीय घटक ओळखा?

अ) निवडणूक ब) कायदेमंडळ क) नोकरशाही ड) राजकीय पक्ष

४) कॅबिनेट मंत्र्यांचा प्रमुख नेता कोण असतो?

अ) राष्ट्रपती ब) राज्यपाल क) महान्यायवादी ड) पंतप्रधान

५) सार्वजनिक धोरण कोण निर्माण करतात?

अ) दबावगट ब) विरोधी पक्ष क) सरकार ड) यापैकी नाही

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) ब – कार्यकारी मंडळ

२) अ – पंतप्रधान

३) क – नोकरशाही

४) ड – पंतप्रधान

५) क – सरकार

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सार्वजनिक धोरणाचा अर्थ स्पष्ट करा?

२) सार्वजनिक धोरणाचे निर्मिती घटक सांगा?

३) सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीचा अर्थ व व्याख्या लिहा.

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर माहिती लिहा.**

१) सार्वजनिक धोरणावर निर्मितीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

२) सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीची व्याख्या सांगून अंमलबजावणीचे घटक स्पष्ट करा.

३) सार्वजनिक धोरण मुल्यमापनाचे अर्थ व उद्दिष्टे स्पष्ट करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ


१) भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय (२००६), भारताचे संविधान, महाराष्ट्र राज्य (सहावी आवृत्ती) मुंबई

२) पळशीकर सुहास (२००९), समकालीन भारतीय राजकारणाचे विश्लेषण, मराठी वाचन साहित्य मालिका क्र.-२, राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

३) पवार प्रकाश (२०१०), सार्वजनिक धोरण संकल्पना, सिद्धांत आणि भा.सु.धो. चा आढावा, प्रतिमा प्रकाशन, औरंगाबाद

४) पोहेकर प्रिती (२०१७), भारताचे सार्वजनिक धोरण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

५) सुमंत यशवंत (२००३), सामाजिक चळवळीचा परिप्रेक्ष्य आणि महाराष्ट्रातील चळवळी; काही निरीक्षणे, बदलता महाराष्ट्र : साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा, आंबेडकर अकादमी, सातारा

६) के. सागर, नान्देडकर व्ही. जी. (१९९९), लोकप्रशासन, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे

७) शिरसाठ, वासनिक, बैलाडे (२०११), प्रशासकीय व व्यवस्थापन विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

८) Public Policy in India, Some Emerging Concers (2002), Indian Institute of Public Administration, New Delhi

९) Chakarabarty Bidyut, Chand Prakash (2016), Public Policy Concept, Theory of Practice, Sage Publications, New Delhi

१०) Daptardar Vaidchi Shriram (2015), India : Economic Policies and performance 1947-48 to 2015-16, New Delhi

११) सक्सेना प्रदिप (२०१४), नीती विज्ञान एवं लोकप्रशासन, आरबीएसए पब्लिशर्स, जयपूर

१२) योजना, वर्ष ४०, अंक ११, जून २०१३ (पर्यावरण आणि पर्यावरणाची सुरक्षा विशेषांक).


❑❑❑

## घटक ३
# भारतातील सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण भाग-१
(Public Analysis in India Part-I)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय-विवेचन

३.२.१ जल आणि आरोग्य धोरण

३.२.२ विज्ञान आणि तंत्रज्ञान धोरण

३.२.३ पर्यावरण धोरण

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं:अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे :-

संबंधित घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

१) पाणी आणि आरोग्य धोरणाविषयी सविस्तर माहिती उपलब्ध होईल.

२) विज्ञान-तंत्रज्ञानासंदर्भात भारत सरकारच्या धोरणांची माहिती होईल.

३) पर्यावरणाच्या विविध समस्यांची जाणीव होईल.

४) पर्यावरण वाचविण्यासाठी शासन स्तरावर आखलेल्या धोरणांची माहिती होईल.

५) पाणी, आरोग्य, विज्ञान आणि पर्यावरण धोरण आखण्याची गरज का निर्माण झाली याविषयी जाणून घेता येईल.

६) पाणी, विज्ञान आणि पर्यावरण यांची मानवी जीवनातील महत्त्व आणि उपयुक्तता अभ्यासता येईल.

## ३.१ प्रस्तावना :

'सार्वजनिक धोरण' ही शासनव्यवस्थेइतकीच जुनी प्रक्रिया असल्याने शासनव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो त्याठिकाणी धोरणांची आखणी ही करावीच लागते ही बाब प्रकर्षाने लक्षात येते. लोकशाही, लष्करशाही, साम्यवादी अशा कोणत्याही प्रकारच्या शासनव्यवस्थेत धोरण निर्मिती आणि त्यांची अंमलबजावणी ही प्रक्रिया सातत्याने सुरू असते. राजकीय पर्यावरणातील नागरिकांकडून विविध प्रकारच्या मागण्या राजकीय व्यवस्थेकडे येत असतात. त्या मागण्यांच्या संदर्भात शासन व्यवस्थेच्या स्तरावर धोरणांची आखणी होत असते. त्यामुळे धोरणांच्या संदर्भात थोडक्यात असे म्हणता येईल की, 'शासनाची ध्येये व उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचे उच्च पातळीवरील नियोजन म्हणजे धोरण होय.'

भारताच्या संदर्भात सार्वजनिक धोरणांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, ब्रिटीशांनी भारतावर सुमारे १५० वर्षे राज्य केले. त्यामुळे ब्रिटीश राजवटीच्या काळात ब्रिटीशांनी स्वत:ला पूरक अशीच धोरण प्रक्रिया राबविली. भारताकडे एक व्यापारी बाजारपेठ म्हणून पाहणाऱ्या ब्रिटीशांच्या स्वार्थी, अन्यायकारक धोरणांमुळे देशाचे सर्वच पातळ्यांवर अध:पतन झाले. त्यामुळे देश मागासलेल्या किंवा अविकसित अवस्थेत राहिला. त्यानंतर ब्रिटीश सत्ता संपुष्टात येऊन १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर भारताने राज्यघटना आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली. सामाजिक, आर्थिक, राजकीय लोकशाही व कल्याणकारी राज्यांच्या प्रस्थापनेसाठी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे अंतर्भूत करण्यात आली आहेत. शासकीय ध्येयधोरणे सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने कार्यरत असली पाहिजेत, समाजामध्ये समतेचे अधिष्ठान प्रस्थापित करण्यासाठी आणि कल्याणकारी योजना राबविण्यासाठी शासनाच्या धोरण निर्धारण प्रक्रियेत मार्गदर्शक तत्त्वे महत्त्वाची भूमिका बजावतात. ही बाब लक्षात घेऊन राज्यघटनाकारांनी मार्गदर्शक तत्त्वांचा अंतर्भाव राज्यघटनेमध्ये केला आहे.

स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या कालखंडात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली आधुनिक भारताच्या उभारणीची सुरुवात होऊन नव-नवीन योजना, धोरणे यांचा पाया घातला गेला. देशाचा विकास साधायचा असेल, तर ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देणे गरजेचे आहे असे समीकरण तयार झाले होते. कारण ८० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहत होती आणि याठिकाणच्या लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती होता. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास साधायचा तर कृषी धोरणांना अग्रक्रम देणे ही काळाजी गरज होती. शिवाय शेतीवर पडणारा अतिरिक्त मनुष्यबळाचा बोजा कमी करण्यासाठी औद्योगिकीकरणाला ही चालना देणे गरजेचे बनले होते. त्यामुळे सरकारला कृषी व उद्योग क्षेत्राला समोर ठेवून धोरणांची आखणी करावी लागली. शिवाय मानवनिर्मित असमानतेमुळे मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, स्त्रिया यांच्यावर मोठ्या प्रमाणात अन्याय झाला होता. त्यामुळे या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी आणि या संबंधित घटकांच्या उन्नतीसाठीदेखील स्वातंत्र्योत्तर कालखंडात धोरणांची आखणी केली गेली.

शिवाय भारताने कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा स्विकार केल्याने वरील घटकांच्या संदर्भात सार्वजनिक धोरणांची आखणी करणे क्रमप्राप्त बनले होते.

तसेच आज जगाच्या पाठीवर अस्तित्त्वात असणाऱ्या राज्यांची विभागणी अविकसित, विकसनशील आणि विकसित राज्य म्हणून केली जाते. तेव्हा अविकसित राज्यांना विकसनशील अवस्थेत प्रवेश करण्यासाठी, विकसनशील राज्यांना विकसित राज्याच्या यादीत प्रवेश करण्यासाठी आणि विकसित राज्यांना स्वत:ची विकसित ही प्रतिमा टिकवून ठेवण्यासाठी धोरणांची अत्यंत काळजीपूर्वक आखणी करावी लागते.

## ३.२ विषय विवेचन

याबरोबर आज मानवी जीवन अनिश्चिततेच्या घेऱ्यामध्ये सापडले आहे. पाणी, हवा, पर्यावरण, विज्ञान, आरोग्य याला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. परंतु मानवाच्या अतिहव्यासामुळे पाणी, हवा, पर्यावरण, आरोग्य यांना मोठ्या प्रमाणात हानी पोहचून त्यांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाला आज २१व्या शतकात मोठ्या प्रमाणात महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे यासंदर्भातही अभ्यास होणे गरजेचे आहे.

### ३.२.१ जल आणि आरोग्य धोरण

**जलधोरण :**

जलव्यवस्थापनात 'जलनितीला' महत्त्वाचे स्थान असल्याने जलनितीला जलव्यवस्थापनाचा पाया असे संबोधले जाते. मानवी जीवनामध्ये पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे दररोज दरडोई पाण्याची उपलब्धता कमी-कमी होत चालली आहे. त्यामुळे आज २१व्या शतकातील प्रमुख आव्हानांपैकी पाणी टंचाई व पाणी व्यवस्थापन हे मानवी समुदायासमोर एक मोठे भीषण आव्हान म्हणून उभे आहे. जगाला आणि त्याचबरोबर भारतालाही पाणीटंचाईची समस्या भेडसावत आहे.

पाण्याच्या संदर्भात केवळ तीव्र पाणीटंचाई ही केवळ एकमेव समस्या नाही तर पाण्याला जात, धर्म, पंथ, भाषा, राज्यांतर्गत, आंतरराज्य, राजकीय, पक्षीय, प्रादेशिक, पर्यावरणीय, आर्थिक, सांस्कृतिक, इ. अभिनिवेश प्राप्त झालेले आहेत. तेव्हा अशाप्रकारचे अभिनिवेश, दबाव बाजूला सारून पाण्याचे योग्य धोरण आणि व्यवस्थापन सुनिश्चित करणे गरजेचे आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम २१ च्या संदर्भात निवाडा देताना सर्वोच्च न्यायालयाने हे आधोरेखित केले आहे की, पाण्यावर प्रत्येक भारतीयाचा समान हक्क आहे. ते सर्वांना समन्यायी पद्धतीने मिळावयास पाहिजे. हे तत्त्व स्वीकारून शासन-प्रशासन, विधिपक्ष, लोकप्रतिनिधी आणि लोकांनी पाण्याशी संबंधित प्रश्नावर तोडगा काढून जलनिती आखली पाहिजे.

जलनिती ठरविताना पाण्याचा सामाजिक मूल्याच्या व आर्थिक मूल्याच्या अनुषंगाने विचार झाला पाहिजे. हा दृष्टिकोन समोर ठेवून मानवी जीवनासाठी आणि पर्यावरणीय उपयोगासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून दिल्यानंतर उरलेल्या पाण्याचा आर्थिक वस्तू किंवा व्यापारी वस्तू म्हणून वापर करण्यास हरकत नसल्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. पाण्याचा केवळ पिण्यासाठी इतका मर्यादित वापर नसून शेती, औद्योगिकीकरणासाठी देखील पाणी महत्त्वपूर्ण आहे. याव्यतिरिक्त वाहतूक, विविध क्रिडा व पर्यटन यासाठी देखील पाणी आवश्यक आहे. बहुतांश मानवी संस्कृती नदी खोऱ्यातच उदयास आल्याचे संदर्भ सापडतात.

परंतु पाण्याच्या संदर्भात अनेक समस्या उद्भवल्या आहेत. जसे औद्योगिकीकरणामुळे सांडपाण्याची समस्या, कचरा, विषारी द्रव्य मिश्रित पाणी नदीत मिसळणे, मानवी अज्ञानामुळे नद्यांचा होणारा गैरवापर, प्रलंयकारी महापूर त्यातून मोठ्या प्रमाणात होणारी जीवित व वित्तहानी या धर्तीवर जलधोरण व राष्ट्रीय कायदे बनविणे काळाची गरज बनली आहे.

जगभरातील विविध राष्ट्रांनी आपापले जलधोरण व राष्ट्रीय कायदे बनविले. त्याचपद्धतीने भारताने देखील राष्ट्रीय पातळीवरचे आपले जलधोरण सर्वप्रथम १९८७ मध्ये घोषित केले. त्यानंतर त्यामध्ये काळानुरुप बदल करत २००२, २०१२ मध्ये त्यात सुधारणा केल्या आहेत. २०१९ साली भारत सरकारने नवे जलधोरण प्रस्तावित केले असून ते पूर्ण संमत होणे बाकी आहे. नियोजन आयोगाने पाणी प्रश्नाचे महत्त्व व समस्या लक्षात घेऊन जलधोरणाची आखणी केली. त्यासंबंधी टप्प्या-टप्प्यावर सुधारणा घडवून आणल्या; परंतु आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली असली तरी राष्ट्रीय पातळीवरचा पाणी प्रश्न समाधानकारकपणे सुटलेला नाही.

**२००२ चे राष्ट्रीय जलधोरण :–**

एप्रिल २००२ मध्ये राष्ट्रीय जलस्त्रोत परिषदेने राष्ट्रीय जल धोरण (National Water Policy) जाहीर केले. या धोरणाचा प्रमुख उद्देश शाश्वत विकास व कार्यक्षम व्यवस्थापन असून जलस्त्रोत व्यवस्थापनाच्या विविध प्रश्नांची त्यामध्ये चर्चा करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय जलधोरणाची वैशिष्ट्ये :–**

१) पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असून तो एक मूलभूत नैसर्गिक स्त्रोत आहे. मानवी जीवनातील पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन पाण्याचे व्यवस्थापन, विकास व नियोजन करणे. हे राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे असे अधोरेखित करण्यात आले.

२) केंद्रीय व राज्य पातळीवरील पाण्याशी संबंधित माहितीचे एकात्मीकरण करणे. तसेच माहिती मिळविण्याच्या आधुनिक पद्धती विकसित करणे.

३) देशात उपलब्ध असलेल्या पारंपरिक (छपरावर पडणारे पावसाचे पाणी साठवणे) तसेच अपारंपरिक (नदी-जोड, भू-जलाचे कृत्रिमरित्या पुनर्भरण, खाऱ्या किंवा बेचव पाण्यावर प्रक्रिया करून वापरण्या योग्य बनविणे) जलस्त्रोतांचा जास्तीत जास्त वापर करणे. तसेच त्याबाबतीतील संशोधनास चालना देणे.

४) जिथे पाण्याची कमतरता आहे. अशा ठिकाणी पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे असून त्यासाठी नदीजोड सारखे उपक्रम राबविणे.

५) बहुउद्देशीय व बहुपयोगी भूमिकेतून जलस्त्रोत विकासाचे प्रकल्प कार्यान्वित करणे.

६) पाणी वाटपाचे नियोजन करताना प्रथम ते पिण्यासाठी, त्यानंतर शेतीसाठी व नंतर उतरत्या क्रमाने जलविद्युत, पर्यावरणीय घटक, उद्योग यांना पुरविले जावे.

७) अति-उपशामुळे पर्यावरणावर होणारे संभाव्य दुष्परिणाम टाळण्यासाठी भूजल उपशावर बंधने घातली पाहिजेत.

८) धरणग्रस्तांचे पुनर्वसन व्यवस्थितपणे होण्यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी राष्ट्रीय धोरण आखणे गरजेचे आहे.

९) खाजगी क्षेत्राच्या सहभागातून जलस्त्रोतांचा विकास, नियोजन व व्यवस्थापन करणे.

१०) जलव्यवस्थापन करताना दुष्काळप्रवण भागांचा विचार प्राधान्यक्रमाने केला जावा.

११) जलस्त्रोतांचे व्यवस्थापन करताना प्रशिक्षण व संशोधनास महत्त्व देणे.

१२) बांधकाम व पुनर्वसनाची कामे व्यवस्थित होण्यासाठी किनाऱ्यावर व पूरप्रवण भागात केल्या जाणाऱ्या सर्वप्रकारच्या कामांवर नियंत्रण ठेवणे. इ.

वरील राष्ट्रीय जलधोरणांच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय पातळीवर जागृती व वचनबद्धता निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी भारत शासनातर्फे राज्यांना प्रोत्साहनपर तांत्रिक व आर्थिक मदत देणे गरजेचे आहे.

**राष्ट्रीय जलधोरण २०१२:-**

भारत सरकारने आपल्या पूर्वीच्या राष्ट्रीय जलधोरणात सुधारणा करून २०१२ साली राष्ट्रीय जलनिती प्रकाशित केली आहे. या २०१२ च्या जलधोरणातील काही ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे -

१) नदीचे मूळ स्वरूप (ओघ) कायम ठेवण्यासाठी नियोजन करावे.

२) महापूर तसेच दुष्काळावर मात करण्यासाठी सक्षम व्यवस्था असावी.

३) पाण्याचे वाटप व पाण्याचा वापर याबाबत एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारावा.

४) जलव्यवस्थापन धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व प्रकारची माहिती एकत्र उपलब्ध करून देणारा माहिती स्त्रोत निर्माण करावा.

५) पाण्याचा योग्य पद्धतीने व कार्यक्षमपणे वापर होण्यासाठी सक्षम व्यवस्था उभी करावी. इ.

वरीलप्रमाणे पाण्याचे महत्त्व व पाणी धोरण यासंबंधी चर्चा केल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, पिण्याच्या व उपजीविकेच्या भूमिकेतून पाण्याला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्या खालोखाल पर्यावरणीय, व्यापारी, उद्योग इ. पाणी वाटपात स्थान देण्यात आले आहे. पाण्याचा योग्य व कार्यक्षमपणे वापर व्हावा यासाठी उद्योगधंद्यांना पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी आवश्यक असलेले उपाय राबविण्यासाठी व शोधण्यासाठी अनुदाने देण्यात यावीत. याचा एक भाग म्हणून नियोजन आयोगाने राष्ट्रीय जलआयोगाची स्थापना करून पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सात कलमी कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

१) प्रत्येक घटकाला पाण्याचा हक्क द्यायचा असेल तर देश व राज्य पातळीवर पाण्यासंबंधाचे सर्वंकष धोरण समन्यायी पद्धतीने ठरविले पाहिजे.

२) जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, पर्यावरण रक्षण यासंबंधी उपाययोजना तपशीलासह ठरवाव्या लागतील.

३) पाण्याशी संबंधित सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इ. जे वाद आहेत ते सोडविण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

४) धोरणात्मक निर्णयांच्या परिपूर्तीसाठी कायदेशीर उपाययोजनाही अत्यावश्यक आहेत.

५) देशातील मध्यवर्ती पाणी व्यवस्थापन संस्था, राज्य, केंद्रशासित प्रदेश, जलव्यवस्थापनाचे कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांनी समन्वयात्मक पद्धतीने धोरणे निश्चिती केली पाहिजे.

६) राज्यांमध्ये व राज्यांतर्गत पाणी प्रश्नासंबंधीचे जे वाद लवादामार्फत सोडविले जातील त्याच्यासाठी लवादाचा निर्णय अंतिम राहिल.

७) जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, पर्यावरण रक्षण यासाठी आवश्यक असे आर्थिक तरतुदीसाठीचे धोरण विकसित करणे.

राष्ट्रीय जलनिती ठरविताना नियोजन आयोगाने या सप्तसुत्रीचा विचार केल्यास पाण्याचा प्रश्न चांगल्या पद्धतीने सोडविण्यास यश प्राप्त होईल असे वाटते.

**आरोग्य धोरण :–**

देशाला स्वातंत्र मिळाले तेव्हा देशासमोर ज्या अनेक समस्या उभ्या होत्या त्यामध्ये प्रामुख्याने गरिबी, निरक्षरता, बेकारी, उपासमार इ. प्रमुख समस्यांचा उल्लेख करता येईल. या विविध समस्यामध्ये निर्माण झालेली एक गंभीर समस्या म्हणजे आरोग्याची समस्या होय. विविध श्रेणीतील या समस्यांना नियंत्रित करण्यासाठी सरकारने अनेक कल्याणकारी योजना अंमलात आणल्या. त्याचाच एक भाग म्हणजे शासनाने आरोग्याशी संबंधित विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आरोग्य विभागाची केलेली स्थापना होय. या विभागांतर्गत आरोग्याशी संबंधित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विविध योजना व कार्यक्रमांचा अंतर्भाव करण्यात आला. मात्र या विभागांतर्गत योजनेमध्ये व कार्यक्रमात सुसुत्रता नव्हती ही प्रमुख बाब/उणीव/मर्यादा लक्षात घेऊन यामध्ये एकसंघता निर्माण करण्यासाठी भारत सरकारने १९८३ साली पहिले राष्ट्रीय आरोग्य धोरण [First National Health Policy (NHP)] अंमलात आणले या धोरणामुळे आरोग्य क्षेत्रात अमूलाग्र बदल घडून येऊन त्यामध्ये एकसंघता व सुसुत्रता निर्माण झाली.

आरोग्य हा विषय भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ट करण्यात आला असून राज्यघटनेमध्ये मार्गदर्शक तत्त्वामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, लोकांचे पोषण व राहणीमानाचा दर्जा वाढविणे तसेच लोकांचे आरोग्य सुधारणे ही राज्यांची प्रमुख जबाबदारी आहे. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडून देशात आरोग्य सेवा पुरविली जाते तसेच देशात सरकारी आरोग्य यंत्रणेला समांतर अशी खाजगी आरोग्य यंत्रणा कार्यरत असल्याचे दिसून येते. देशात खाजगी आरोग्य यंत्रणा सरकारी आरोग्य यंत्रणेपेक्षा जास्त लोकप्रिय असल्याचे दिसून येते. ग्रामीण तसेच शहरी भागातील लोक खाजगी यंत्रणेलाच जास्तीत जास्त प्राधान्य देतात हे विविध सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. लोकांच्या आरोग्याशी संबंधित विविध समस्या सोडवण्यासाठी

सरकारने वेळोवेळी त्यामध्ये बदल घडवून आणले आहेत. आतापर्यंत प्रामुख्याने तीन राष्ट्रीय आरोग्य धोरण आखण्यात आल्याचे दिसून येते.

१. पहिले राष्ट्रीय आरोग्य धोरण – १९८३

२. दूसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण – २००२

३. तिसरे राष्ट्रीय आरोग्य धारेण – २०१७

वरीलप्रमाणे शासनाने तीन राष्ट्रीय आरोग्य धोरणे अंमलात आणली आहेत.

**१. पहिले राष्ट्रीय आरोग्य धोरण :–** (First National Health Policy) 1983

सर्वांसाठी आरोग्य या प्रमुख उद्‌दिष्टाच्या प्राप्तीसाठी प्राथमिक आरोग्य सेवा ओळखली जाते ही बाब लक्षात घेऊन भारत सरकारने पहिले राष्ट्रीय आरोग्य धोरण (NHP) १९८३ साली अंमलात आणले या धोरणाची प्रमुख ध्येये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) संपूर्ण देशामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची उभारणी करणे.

२) आरोग्य सुविधांच्या विकेंद्रीकरणास प्राधान्य देणे.

३) आरोग्य क्षेत्रात सरकारी बरोबरच खाजगी क्षेत्रास वाव देणे.

४) आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक अशा जनजागृती, सार्वजनिक आरोग्य, स्वास्थ यासारख्या बाबींवर विशेष लक्ष देणे.

५) प्राथमिक आरोग्य केंद्रांचा विकास साधणे.

६) बाल मृत्यूदर, माता मृत्यूदर अनुक्रमे ६० व २०० पर्यंत कमी करणे इ.

२. **दुसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण** [Second National Health Policy (NHP)] : 2002

दुसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण २००२ मध्ये लागू करण्यात आले. पहिले राष्ट्रीय धोरण १९८३ साली अंमलात आणले गेले. या धोरणाच्या यशानंतर तसेच आरोग्याशी संबंधित नव्याने उद्भवणाऱ्या समस्या सोडविण्याच्या प्रमुख भूमिकेतून एक नवीन राष्ट्रीय आरोग्य धोरण आखण्याची आवश्यकता निर्माण झाली. तेव्हा जुन्या धोरणांची पूर्तता आणि नवीन धोरणाची आखणी या प्रमुख भूमिकेतून दूसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण २००२ मध्ये अंमलात आणले गेले. दुसऱ्या राष्ट्रीय आरोग्य धोरणाची प्रमुख ध्येये पुढीलप्रमाणे विषद करता येतील.

१) लोकांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांना प्राधान्य देणे.

२) आरोग्यविषयक कार्यक्रमांमध्ये महिला व बालकांना प्राधान्य देणे.

३) आरोग्य विम्याची व्याप्ती वाढवावी तसेच खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.

४) आरोग्यविषयक सेवांमधील तफावत दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

५) बालमृत्यू व मातामृत्यू दर अनुक्रमे ३० व १०० पर्यंत कमी करणे.

६) अंधत्वाचे प्रमाण ०.५% पर्यंत कमी करणे.

७) किटकजन्य, जलजन्य, हिवताप, क्षयरोग आजारातील लोकांचा मृत्यूदर कमी करणे.

**उद्दिष्ट्ये –**

१) मानवी आरोग्याच्या फलश्रूतीसाठी आरोग्य सुविधांचे विकेंद्रीकरण करणे.

२) संपूर्ण देशात प्राथमिक आरोग्य केंद्र उघडणे.

३) आरोग्य सेवेत खासगी क्षेत्राच्या सहभागास मुभा देणे.

४) AYUSH उपचार पध्दतीला प्रोत्साहन देणे इ.

**३. तिसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण** [Third National Health Policy (NHP)]: 2017

भारत सरकारने पहिले राष्ट्रीय आरोग्य धोरण १९८३ साली अंमलात आणले त्यानंतर दूसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण २००२ मध्ये अंमलात आणले गेले या दोन्ही धोरणांनी आरोग्य क्षेत्रात अत्यंत भरीव कामगिरी पार पाडली. बालमूत्यू व मातामृत्यूचे प्रमाण कमी झाले, एक सक्षम अशा आरोग्य सेवेचा उदय झाला. त्यामुळे तिसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ साली अंमलात आणले गेले त्याची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) निरोगी व आरोग्य संपन्न जीवनासाठी राष्ट्रीय आरोग्य धोरण (२०१७) सर्वांपर्यंत पोहचविणे.

२) सर्वांना परवडणाऱ्या किंमतीत दर्जेदार आरोग्य सेवेचा लाभ उपलब्ध करून देणे.

३) गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करून धोरणात्मक कार्यवाहीने आरोग्याची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्नशील राहणे इ.

**३.२.२ विज्ञान धोरण–**

विज्ञान–तंत्रज्ञानाला मानवी जीवनामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यामुळेच सामाजिक अंगाच्या अनुषंगाने विज्ञान–तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेऊन मेघनाद साहा यांनी आजच्या मानवापुढील विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी विज्ञानाला महत्त्व दिसून येते. त्यांनी मानवी जीवन आणि समाज आधुनिकतेच्या, संपन्नतेच्या मार्गावर नेण्यासाठी विज्ञान–तंत्रज्ञानाची गरज प्रतिपादन केली. त्यांच्यामते, देशाला आधुनिक युगात प्रवेश करायचा असेल तर गांधीजींच्या विचारसरणीनुसार खेडी स्वयंपूर्ण करण्यासाठी कुटीर उद्योगांवर भर देणाऱ्या विचारांना आपण फाटा दिला पाहिजे.

विज्ञान-तंत्रज्ञान या विषयाच्या अनुषंगाने विचार करता असे लक्षात येते की, केवळ स्वातंत्र्योत्तर कालखंडातच नव्हे तर स्वातंत्र्यपूर्व कालखंडातही या विषयाच्या अनुषंगाने विचारमंथन झाल्याचे दिसून येते. त्यानुसार मार्गक्रमणही झाल्याचे प्रत्ययास येते. मेघनाद साहा यांच्या प्रयत्नामुळेच १९३८ साली काँग्रेस पक्षांतर्गत पं. नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय नियोजन' समिती स्थापन करण्यात आली होती. तसेच सप्टेंबर १९४२ मध्ये 'वैज्ञानिक व औद्योगिक संशोधक' संस्थेची (Council of Scientific and Industrial Research – (CSIR)) ची स्थापना करण्यात आली होती. त्याच बरोबर प्रा. हिस (लंडन रॉयल सोसायटीचे सचिव) यांनी १९४३-४४ ला भारतभेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी देशातील अनेक वैज्ञानिकांना भेटी दिल्याचाही संदर्भ सापडतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील या घडामोडी पुढील काळात आधुनिक भारताच्या उभारणीत महत्त्वाच्या ठरल्या.

**स्वातंत्र्योत्तर कालखंडातील विज्ञान धोरणाची वाटचाल:-**

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर पं. नेहरु यांच्या नेतृत्वाखाली देशाची वाटचाल सुरू झाली. जागतिक आणि राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे प्रश्न नेहरुंसमोर होते. हे प्रश्न सोडविण्याचे एक प्रभावी साधन म्हणून नेहरु वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे पाहत होते. हे त्यांच्या १९४७ च्या भारतीय विज्ञान परिषदेच्या भाषणातूनही स्पष्ट होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्यांनी त्या दृष्टिकोनातून मार्गक्रमण सुरू केले. आपल्या पहिल्याच मंत्रीमंडळात स्वत:च्या नियंत्रणाखाली वैज्ञानिक खाते निर्माण केले. त्यादृष्टीने त्यांनी मंत्री, सचिव, संचालक यांची बैठक बोलावून संशोधनाची नियोजनाशी सांगड घालण्याचा आपला संकल्प किंवा मनोदय व्यक्त केला. त्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष स्वत: पंतप्रधान होते तर इतर सदस्यांत आरोग्य, शेतकरी, शिक्षण, दळणवळण, संरक्षण इ. या खात्यांचे मंत्री यांचा समावेश होता. यावरून नेहरूंचा विज्ञान-दृष्टीकोनावर भर देण्याच्या धोरणात्मक प्रवृत्तीचा प्रत्यय येतो. त्यांच्या मते जगातील सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा कोणत्याही घटकाला किंवा घडामोडीला विज्ञानापासून बाजूला ठेवता येत नाही. त्यामुळे नेहरुंच्या मार्गदर्शनाखाली देशात मोठ्या प्रमाणात उपयोजित संशोधनासाठी विज्ञान संशोधन संस्थांच्या उभारणीस प्रारंभ झाला. १० ऑगस्ट १९४८ ला के.एस. कृष्णन, एस.एस. भटनागर, डॉ. होमी भाभा यांची त्रि-सदस्यीय अणुउर्जा आयोगाची स्थापना करण्यात आली. १९५४ साली मुंबईतील तुर्भे येथे अणुउर्जा संस्थेची स्थापना झाली. तसेच केंद्र सरकारने १९५४ मध्येच अणुउर्जा खातेही निर्माण केले.

**विज्ञान धोरण वैशिष्ट्ये आणि विकास:-**

मानवी जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञानाचे स्थान लक्षात घेता आपल्या देशाने पूर्ण सामर्थ्याने विज्ञानाच्या क्षेत्रावर स्वत:ची पकड निर्माण केली पाहिजे असा एक मुद्दा प्रकर्षाने पुढे येऊ लागला. त्याची दखल होत ४ मार्च १९५८ साली भारत सरकारने विज्ञान धोरणविषयक विधेयक लोकसभेत संमत केले. या धोरणाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१) स्त्री-पुरुष या समाजव्यवस्थेतील दोन्ही घटकांना त्यांच्या नवनिर्मितीक्षम, संरचनात्मक कार्याला विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कशाप्रकारे वाव मिळेल याची व्यवस्था करणे.

२) विज्ञान संशोधनाची शास्त्रशुद्ध, मानवी कल्याणासाठी उपयुक्तता आणि शैक्षणिक विकासास हातभार या तिन्ही बाजूंनी त्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे.

३) विज्ञान-तंत्रज्ञानाची कास धरल्याने जे काही फायदे होणार आहेत ते जनतेला मिळवून देणे. इ.

या धोरणाच्या अनुषंगाने जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संशोधन शिक्षण देणाऱ्या पाच भारतीय औद्योगिकी संस्था (आय.आय.टी.) अखिल भारतीय पातळीवर स्थापन झाल्या. पहिले शेती/कृषी विद्यापीठ १९६० साली पंतनगर येथे स्थापन झाले. पुढील २० वर्षांच्या काळात कृषी विद्यापीठाची संस्था तीनपटीने वाढली. तर विज्ञान शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली.

साधारणत: १९६०-७० च्या दशकात नेहरु व डॉ. होमी भाभा यांच्या मृत्यूनंतर विज्ञान-तंत्रज्ञानाच्या उभारणीचे पहिले पर्व संपले असे मानले जाते. नंतरच्या काळात विज्ञान धोरणात फारसे बदल झाले नसले तरी वैज्ञानिकांचे महत्त्व मात्र वाढले. तसेच विज्ञान-तंत्रज्ञान खाते (१९७०), इलेक्ट्रॉनिक खाते (१९७०) अवकाश आयोग व अवकाश खाते (१९७२), पर्यावरण खाते (१९८०) साली स्थापन करण्यात आले. त्या माध्यमातून अनेक ज्येष्ठ तंत्रज्ञ, संशोधक यांना सत्तेमध्ये स्थान प्राप्त झाले. तसेच १० ज्येष्ठ वैज्ञानिकांची विज्ञान व तंत्रज्ञानावरील राष्ट्रीय समिती (NCST- National Committee on Science and Technology) स्थापन झाली. देशातील दारिद्र्यांवर ठोस कार्यक्रम आखण्याची शिफारस या समितीने केली. मात्र विज्ञान-तंत्रज्ञान खात्याने आखलेल्या पंचवार्षिक योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र झाली नाही.

**पोखरण I (१९७४) ते पोखरण II (१९९८) मधील कालखंड:-**

१९७४ मध्ये भारताने पहिला अणुस्फोट घडवून आणला. मात्र विज्ञान-तंत्रज्ञानाची पंचवार्षिक योजनेची गती मात्र मंदावली. १९७० साली स्थापन विज्ञान-तंत्रज्ञानविषयक राष्ट्रीय समितीच्या शिफारशींकडे काहीसे दुर्लक्ष झाले असले तरी त्यातील काही महत्त्वपूर्ण नोंदी पुढील दिशा ठरविण्यासाठी उपयुक्त ठरल्या. १९७३ साली राष्ट्रीय समितीने आपला अहवाल सादर करून देशातील गरिबी, दारिद्र्य हटविण्यासाठी व्यापक नियोजनाची आवश्यकता प्रतिपादीत केली होती पण प्रत्यक्षात मात्र विज्ञानाच्या माध्यमातून जनतेच्या समस्यांची सोडवणूक न करता संरक्षण सिद्धता व राष्ट्रीय अस्मिता या घटकांना अग्रक्रम किंवा प्राधान्य देण्यात आले. अवकाश संशोधन, सागरी संशोधन, अणुउर्जा प्रकल्प, उपग्रहीय प्रक्षेपण, दळणवळण इ. क्षेत्रात क्रांतीकारी बदल घडून आले. १९७० च्या दरम्यान हरितक्रांती व धवलक्रांती देशात घडून आली. त्यामुळे देशाने अन्नधान्य, वस्त्रोद्योग क्षेत्रात स्वयंपूर्णता साध्य प्राप्त केली.

२१ व्या शतकाच्या सुरुवातीला विज्ञान-तंत्रज्ञानाचे मानवी जीवनातील महत्त्व ओळखून जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी राजीव गांधीनी संगणकीकरणाचा जोरदार पुरस्कार केला. राजीव गांधी आणि

त्यांचे सल्लागार सॅम पित्रोदा यांनी खेड्यातील तसेच मागासलेल्या वंचित घटकांच्या सशक्तीकरणासाठी पाच प्रमुख घटक डोळ्यासमोर ठेवून धोरणांची आखणी केली. हे पाच घटक पुढीलप्रमाणे:-

१) पिण्याचे स्वच्छ व मुबलक पाणी २) तेलबियांच्या उत्पादन वाढीस प्रोत्साहन ३) देशात साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणे. ४) नवजात शिशू व गरोदर मातांसाठी रोगप्रतिकारक लसींची सोय करणे. ५) दूरसंचाराच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचणे.

यादिशेने तयारी तर सुरू झाली परंतु पुढील काळात राजीव गांधी पंतप्रधान राहिले नाही तर सॅम पित्रोदा अमेरिकेला निघून गेले. त्यामुळे या धोरणांचीही पिछेहाट झाली.

**पोखरण** II

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात ११ मे आणि १३ मे १९९८ मध्ये राजस्थानमधील पोखरण येथे अणुचाचण्या करण्यात आल्या. यामध्ये एकूण पाच अणुचाचण्या केल्या. यामधील पहिला स्फोट फ्युजन बॉम्ब (हायड्रोजन बॉम्ब) तर दुसरा स्फोट फिजन बॉम्ब स्वरूपाचा होता. (एम.विकीपिडीया.ओआरजी)

आज २१ व्या शतकात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकास साधताना दारिद्र्य, भूकबळी, लोकांचे राहणीमान उंचावणे इ. प्रश्न सोडविणे अपेक्षित असताना आपले महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार करण्यामध्ये ध्येयांचे स्वरूप बदलल्याचे दिसते. त्यामुळे ही धोरणे आत्मनिर्भरता, परावलंबित्वाला विरोध, राष्ट्रीय अस्मितेचा जोरदार पुरस्कार यामध्ये परावर्तित झाल्याची दिसतात. यातून देशाची महासत्ता बनण्याची प्रबळ भावना प्रतिबिंबीत होते. तसेच धोरणांचा बदललेला नूर तर निर्देशित होतो शिवाय देशाचा झालेला विकास व आत्मविश्वासही दिसून येतो.

सुरुवातीपासून भारताच्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील वाटचाल लक्षात घेता असे लक्षात येते की, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने नेत्रदिपक कामगिरी केली आहे. मात्र विज्ञानाची प्रत्यक्ष धोरणे आणि वाटचाल यामध्ये बरीच तफावत असल्याचे दिसते.

धोरणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील तफावतीची कारणे :-

१) संशोधनासाठी निधीचे वाटप करताना पक्षपातीपणा दिसून येतो. ज्या व्यक्तीचा प्रभाव अधिक त्यांना निधीचा मोठा वाटा प्राप्त होत असे. निधी वाटपासाठी संशोधनाची उपयुक्तता किती या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले. हे धोरण आजही कायम आहे. असे दिसून येते.

२) संशोधन संस्थांचे मूल्यमापन करणारी प्रभावी यंत्रणा नाही. शिवाय या संशोधन संस्थांमध्ये नोकरशाही उदयास आली. त्यामाध्यमातून वैज्ञानिकांवर वर्चस्व प्रस्थापित करू पाहणाऱ्या प्रवृत्तींचा शिरकाव झाला.

३) उपयोजित संशोधनाच्या माध्यमातून राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे प्रश्न, समस्या सोडविणे अपेक्षित असते. पण प्रत्यक्षात आपल्या देशातील संशोधन हे जागतिक स्पर्धेशी संलग्न राहिले. भारतासारख्या देशामध्ये

सैद्धांतिक संशोधनाऐवजी उपयोजित संशोधनावर भर देणे गरजेचे आहे. शिवाय विकसित देशाप्रमाणे आपल्याकडे संशोधनाची वर्गवारी करणारी उत्तम व्यवस्था कार्यरत नाही.

४) विज्ञान धोरण राबविताना शिक्षणाला त्यामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. परंतु आपल्याकडे सर्वच पातळ्यांवर शिक्षणाची आबाळ झाली. त्याचा परिणाम विज्ञान धोरणावर झाला. देशामध्ये काळाच्या ओघात मोठ्या प्रमाणात विद्यापीठांची संख्या वाढली मात्र त्यांना पुरेसा निधी मिळाला नाही. त्यामुळे सुमार दर्जाचे संशोधन झाले. संशोधनाचा दर्जा घसरला. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून पारंपरिक अनिष्ट दृष्टीकोन, वैचारिक प्रतिगामीत्व, अंधश्रद्धांचे अवडंबर, धार्मिक स्त्रोत या गोष्टीचा ऱ्हास होणे अभिप्रेत होते. पण त्याऐवजी आधुनिकता, पुरोगामी दृष्टीकोन, मानवतावाद या गोष्टी मागे पडत गेल्या. धार्मिक विद्वेष, धार्मिक मूलतत्त्ववाद, जातीयवाद फोफावला.

५) समाजाप्रती आपली असलेली नैतिक जबाबदारी ओळखून संशोधकांनी समाजाला प्रगतीच्या वाटेवर नेण्यावर प्रयत्न करणे अपेक्षित असताना या क्षेत्रात वैज्ञानिकांचा एक श्रेष्ठीजन वर्ग उदयास आल्याचा दिसून येते.

वरील विवेचनावरून एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते की, विज्ञानाची समाजाप्रती असलेली भूमिका कार्यक्षमपणे यशस्वी करायची असेल तर विज्ञानविषयक धोरणे व्यापक स्वरूपात राबवून त्यामध्ये पारदर्शकता आणली पाहिजे तसेच लोकांनीही सजगता दाखविली पाहिजे.

**३.२.३ पर्यावरण धोरण :–**

५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. प्रत्येक व्यक्तीला स्वच्छ, निरोगी वातावरणात जगण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेनेच बहाल केला आहे. मात्र वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात हानी पोहचत आहे. अर्थातच मानवी जीवनावर त्याचा विपरित परिणाम होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे 'पर्यावरण धोरण' हा एक महत्त्वाचा विषय बनला आहे.

आज २१ व्या शतकातील अनेक आव्हानांपैकी पर्यावरणविषयक समस्या हे एक फार मोठे आव्हान मानवजातीसमोर उभे आहे. पृथ्वीवरील हवा, पाणी, भूमी यांचे मोठ्या प्रमाणावर होणारे शोषण तसेच निरनिराळ्या वनस्पती व प्राणी यांच्या प्रजातींचा झपाट्याने होणारा ऱ्हास यामुळे मानवी अस्तित्वाचे देखील प्रश्न उभे राहिले आहेत. त्यामुळे पर्यावरणीय प्रदुषण आणि पर्यावरणाचा होणारा ऱ्हास यासंदर्भात ठोस कार्यक्रम व धोरणे राबविणे गरजेचे बनले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी व प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी सरकारने जे कायदे किंवा धोरणे तयार केली त्यांचा अभ्यास करूच, पण तत्पुर्वी भारतीय राज्यघटनेत पर्यावरणविषयक ज्या तरतूदी करण्यात आल्या आहेत त्यांचा थोडक्यात आढावा घेऊ.

**मूलभूत अधिकार :–**

भारतीय राज्यघटनेच्या भाग तीन मध्ये मूलभूत अधिकारातील कलम १४, १९, २१ आणि ३२ नुसार स्वच्छ आणि आरोग्यदायी पर्यावरण आता व्यक्तीचा मूलभूत अधिकार म्हणून अंतर्भूत करण्यात आला आहे.

**१) कलम १४:–**

नुसार प्रत्येकाला कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण दिलेले आहे.

कलम १४ पर्यावरणविषयक उपायासंदर्भात निष्पक्षतेचे धोरण स्वीकारण्याचे बंधन घालते.

**२) कलम १८:–**

मध्ये सहा प्रकारचे स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आलेले आहेत.

**कलम १९ (क):–**

अभिव्यक्ती आणि भाषणस्वातंत्र्य देण्यात आलेले आहे.

**१९ (ख):–**

शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य बदल करण्यात आले आहे.

कलम १९ (क) व (ख) चा सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी प्रदूषणाच्या संदर्भात अर्थ लावला. लाऊडस्पीकर किंवा ध्वनी अम्लीफायर वापरणे हे कलम (१९) (क) आणि (ख) अंतर्गत सुरक्षित नाही अशी भूमिका मांडली.

**१९ (छ):–**

नुसार व्यक्तीला उपजीविका करण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे. त्यानुसार व्यक्तीला कोणताही उद्योग, व्यवसाय, व्यापार करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

या अधिकार मर्यादेच्या अधीन राहून नागरिकांना पर्यावरणीय आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या व्यवसायामध्ये गुंतवणुकीची व्यक्तीस परवानगी नाही.

**कलम २१:– जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण**

या कायद्यानुसार प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

या कायद्यानुसार न्यायालयाने हे वारंवार स्पष्ट केले आहे की, कायदा रोग आणि संसर्गाच्या धोक्यापासून मुक्त असलेल्या पर्यावरणाच्या अधिकाराची जन्मजात हमी देतो.

उदा. कोरोना महामारीच्या काळात व्यक्तीच्या जीविताच्या रक्षणासाठी व्यक्तीस्वातंत्र्यावर अनेक निर्बंध घातले.

**कलम ३२:–**

कलम ३२ घटनात्मक उपाययोजनेच्या अधिकारानुसार कोणतीही व्यक्ती, संस्था, संघटना यांना पर्यावरण संरक्षणासाठी रिट याचिका किंवा व्यक्तींच्या आरोग्याला हानी पोहचविणाऱ्या कोणत्याही कृतीला आव्हान देणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याची परवानगी देतो.

**कलम २५३:–**

संसदेला कोणत्याही देशासोबत कोणताही करार किंवा करार अंमलात आणण्यासाठी संपूर्ण किंवा देशाच्या कोणत्याही भागासाठी कोणताही कायदा करण्याचा अधिकार आहे.

या तरतुदीला अनुसरून नैसर्गिक पर्यावरणाशी संबंधित कायदे करण्याचा अधिकार संसदेला असून त्यानुसार हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ आणि पर्यावरणाशी संबंधित पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ सारखे काही कायदे करण्यात आले आहेत.

**ब) राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे :–**

**कलम ४७ : पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य:–**

आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यांपैकी असल्याचे मानील आणि विशेषत: मादक पेये व आरोग्यास अपायकारक अशी अंमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

**कलम ४८ (क) : पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करणे :–**

राज्य हे देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहिल.

**क) मूलभूत कर्तव्ये:–**

भारतीय राज्यघटनेमध्ये कलम ५१ क नुसार पर्यावरणाशी संबंधित कर्तव्ये.

**कलम ५१ (क) (छ):–**

वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे (ज) विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

अशा रितीने भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत अधिकार, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्य यामध्ये पर्यावरणविषयक तरतूदी करण्यात आल्या आहेत. या घटनात्मक तरतूदींच्या आधारे पर्यावरणीय संरक्षणासाठी पावले उचलण्यात आली आहेत. सरकार, न्यायव्यवस्था यांच्याकडून अनेक कायदे, धोरणे, नियम, आंतरराष्ट्रीय करार केले आहेत.

**जल (प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९७४:–**

(The Water Prevention and Control of Polution Act 1974)

भारत सरकारने पर्यावरणाचे संरक्षण व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने भारतातील जलप्रदूषणाला आळा घालण्यासाठी १९७४ मध्य Water Act 1974 चा कायदा केला. देशातील पाण्याची गुणवत्ता राखणे हे

प्रमुख उद्दिष्ट संबंधित कायद्याचे आहे. त्यानुसार जलप्रदूषणाचे केंद्र, राज्यात आणि केंद्रीय स्तरावर नियंत्रण करण्यासाठीचे नियोजन करण्यात आले. प्रत्येक घटकराज्यात Water Pollution Board निर्माण करण्यात आले.

**वायू (प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८१:-**

पाण्याबरोबर हवेची गुणवत्ता राखणे व प्रदूषण नियंत्रण करणे या उद्देशाने १९८१ मध्ये वायू (प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा तयार करण्यात आला. संबंधित कायद्यानुसार केंद्र व राज्य स्तरावर मंडळे निर्माण करून हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६:-**

या कायद्यानुसार पर्यावरण व वनखात्याकडून कारखाना सुरू करताना, उद्योग सुरू करताना आवश्यक अनुमतीचे प्रमाणपत्र आवश्यक केले आहे. पर्यावरण संरक्षण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस ७ वर्षांची शिक्षा शिवाय १ लाख रुपये दंड किंवा रोख ५,००० रुपये असा दंड भरावा लागतो.

**जैविक विविधता कायदा २००२:-**

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी भारतामध्ये जे विविध कायदे केलेले आहेत. त्यापैकीच जैविक विविधता कायदा २००२ (The Biological Diversity Act, 2002) हा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याद्वारे जैवविविधतेतील स्त्रोतांचा शाश्वत पद्धतीने वापर करणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि त्यांच्या अतिरिक्त वापरावर बंधने घालणे किंवा अतिरिक्त वापर टाळणे या गोष्टींवर भर दिला आहे. या कायद्याच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी २००२ साली राष्ट्रीय जैवविविधता संस्था स्थापन करण्यात आली आहे. संबंधित कायद्याचे उल्लंघन झाल्यास या संस्थेकडे दाद मागता येते.

याशिवाय भारतीय संसदेत पर्यावरणाशी संबंधित अनेक आंतरराष्ट्रीय कायदे, करारांवर स्वाक्षरी करून पर्यावरण संरक्षणासाठी मूलभूत भूमिका घेतली आहे. घटनात्मक तरतूदीचा आधार घेऊन राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरण, राष्ट्रीय गंगा खोरे प्राधिकरण, वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्यूरो यांसारख्या संस्था स्थापन करण्यात आल्या. तसेच वन्यजीवांच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव अभयारण्ये, संवर्धन राखीव आणि सामुदायिक राखीवसह संरक्षित क्षेत्रे स्थापन करण्यात आली. शिवाय जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि अरुणाचल प्रदेशातील हिम बिबट्या, जम्मू-काश्मीरमधील हंगुल, तामिळनाडूमधील निलगिरी तहर, पंजाब, हरियाणा आणि गुजरातमधील गिधाड यासारख्या लुप्त होणाऱ्या प्रजातींच्या पुनर्प्राप्तीसाठी एकात्मिक विकास वन्यजीव अधिवास योजना राबविण्यात येत आहे. तसेच प्रोजेक्ट रायनो (१९८७), प्रोजेक्ट टायगर (१९७३), प्रोजेक्ट एलिफंट (१९९२), मगरी प्रजनन प्रकल्प यासारखे जैवविविधता व पर्यावरणीय संरक्षण उपक्रम राबविले जात आहे.

## ३.३ सारांश

सार्वजनिक धोरणाचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की, पाणी, पर्यावरण, विज्ञान हे तिन्ही घटक मानवी जीवनामध्ये अत्यंत महत्वाचे आहेत. त्यांचे जतन करणे गरजेचे आहे. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे तसेच मानवाच्या अतिहव्यासापायी हे स्त्रोत हळूहळू नष्ट होत आहे. तेव्हा त्याचे संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करताना धोरण निश्चिती ही अत्यंत विचारपूर्वक करावयास हवी तरच भविष्यातील मानवी जीवन सुखकर होणार आहे. आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साठ्याने मानवी जीवनात मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली आहे. विकासाचे अनेक टप्पे पादाक्रांत केले आहेत. असे असले तरी ही विज्ञान-तंत्रज्ञानात झालेली प्रगती मानवी संहारासाठी देखील कारणीभूत ठरत आहे. कारण या विज्ञान प्रगतीमध्ये आपण पर्यावरणाशी संबंधित अनेक घटकांनादेखील हानी पोहचवली आहे. विज्ञानाच्या माध्यमातून मानवी जीवनातील समस्या सोडवून मानवी जीवन सुखकर बनवणे अपेक्षित आहे. मात्र आज संरक्षण सिध्दता, राष्ट्रीय अस्मिता यासारखे आयाम विज्ञान धोरणाला प्राप्त झाल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यातून संहारक शस्त्रे ते उद्योग धंद्यांच्या वाढीसाठी भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब यासारखे पर्याय निवडले जात आहेत त्यातून अनेक प्रश्न मानवी समाजासमोर आव्हानाच्या रूपात उभे आहेत. या सर्व घटकांचा विचार करून सार्वजनिक धोरणांची आखणी झाली पाहिजे.

## ३.४ पारिभाषिक शब्द

- **कल्याणकारी राज्य :-**

भांडवलशाहीला विरोध करणाऱ्या समाजवादी उपाय योजनेतून हा विचार पूढे आला. दुसऱ्या महायुध्दानंतर भांडवलशाही प्रधान देशातील शासन व्यवस्थांनी या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यास सुरुवात केली व जनकल्याण या भूमिकेतून आरोग्य, शिक्षण, नोकरी, सामाजिक प्रश्नांची सोडवणूक, गरिबांना मदत इ. धोरणात्मक निर्णय राज्यांमार्फत घेतले जाऊ लागले.

- **आधुनिकीकरण :-**

आधुनिकीकरण ही एक प्रक्रिया असून त्याव्दारे बुध्दी व विज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध साधन-संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करून नवसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रक्रियेत विज्ञान, तंत्रज्ञान यांचा विस्तृत वापर, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक गतिमानता यांना महत्व दिले जाते. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, बुध्दिनिष्ठता, विज्ञान निष्ठता हे आधुनिकीकरण प्रक्रियेचे घटक मानले जातात.

- **साम्यवाद :-**

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात सोव्हिएत युनियन मधील मार्क्सवाद म्हणजे साम्यवाद असे मानले जात होते. केवळ राष्ट्रीय नव्हे तर जागतिक पातळीवरून वर्गविहिन समाज निर्माण करणे, उत्पादनाची सर्व साधने कामगारांच्या नियंत्राणाखाली आणणे.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

★ **एका वाक्यात उत्तरे द्या**

१) धोरण म्हणजे काय?

शासनाचर ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्यासाठीचे उच्च पातळीवरील नियोजन म्हणजे धोरण होय.

२) जलनिती ठरविताना पाण्याचा कोणत्या अनुषंगाने विचार केला जातो?

जलनिती ठरविताना पाण्याचा सामाजिक व आर्थिक मूल्यांच्या अनुषंगाने विचार केला जातो.

३) 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून दिवस साजरा केला जातो?

५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो.

४) अणुउर्जा संस्थेची स्थापना केंव्हा झाली?

१९५४ साली मुंबईतील तुर्भे येथे अणुउर्जा संस्थेची स्थापना झाली.

५) पहिले राष्ट्रीय आरोग्य धोरण केव्हा जाहीर केले? इ.स. १९८३

★ **रिकाम्या जागा भरा**

१) भारतीय राज्यघटनेच्या **३६ ते ५१** कलमात मार्गदर्शक तत्वांची तरतूद करण्यात आली आहे.

२) **जलनितीला** जलव्यवस्थापनाचा पाया असे संबोधले जाते.

३) पर्यावरण संरक्षण कायदा **१९८६** साली संमत झाला.

४) **१९७४** साली भारताने पहिला अणुस्फोट घडवून आणला.

५) १८६०-७० च्या दशकात देशात **हरितक्रांती** व **धवलक्रांती** घडून आली.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

★ **टिपा लिहा**

अ) जलनिती सप्तसुत्री

ब) मुलभूत अधिकारातील पर्यावरणविषयक तरतूदी

क) विज्ञान धोरणाची वैशिष्टे

ड) राष्ट्रिय जलधोरण २०१२

इ) स्वातंत्र्यपूर्व काळातील विज्ञान धोरण

फ) दुसरे राष्ट्रीय आरोग्य धोरण -२००२

★ **थोडक्यात उत्तरे द्या.**

१) भारताच्या जलनितीचा थोडक्यात आढावा घ्या.

२) भारतीय राज्यघटनेतील अंतर्भूत पर्यावरण विषयक तरतूदींची चर्चा करा.

३) पर्यावरण धोरण म्हणजे काय? पर्यावरणविषयक कायद्यांची सविस्तर चर्चा करा.

४) भारतीय विज्ञान धोरणविषयी सविस्तर माहिती द्या.

५) आरोग्य धोरण स्पष्ट करा.

## ३.७ आधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) Anderson J.E, 2006 Public Policy-Making : An Introduction, Boston, Hougnton.

२) Dye Thomas, 2008, Understanding Public Policy Singapore, pearson Education.

३) शहा घनश्याम, २०११ भारतातील सामाजिक चळवळ, डायमंड पब्लिकेशन, पुणे व्दितीय आवृत्ती.

४) भोले भास्कर लक्ष्मण, बेडकीहाळ किशोर, २००६ शतकांतराच्या वळणावर, आंबेडकर अकादमी, सातारा, प्रथम आवृत्ती.

५) पवार प्रकाश सार्वजनिक धोरण- संकल्पना, सिध्दांत आणि भारतीय सार्वजनिक धोरणाचा आढावा : प्रतिमा प्रकाशन पुणे.


❑❑❑

## घटक ४

# भारतातील सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण भाग–२

(Policy Analysis in India Part-II)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ कृषीविषयक धोरण
- ४.२.२ औद्योगिक धोरण
- ४.२.३ मागासवर्गीय व अल्पसंख्यांक समाजासंदर्भातील धोरण
- ४.२.४ महिला सबलीकरणाचे धोरण

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्ट्ये

आपल्या देशातील सार्वजनिक धोरण प्रक्रिया ही आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव टाकत असते. सार्वजनिक धोरण प्रक्रिया हा अत्यंत उपयुक्त असा अभ्यासविषय आहे. सदर घटकात आपण स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या भारत सरकारच्या सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण अभ्यासणार आहोत. या घटकात आपण –

- भारतातील कृषी विषयक धोरणांचे घटक, योजना व त्यांचे यश–अपयश (परिणाम) समजावून घेणार आहोत.
- भारतातील औद्योगिक धोरणांची निर्मिती, त्यांचे परिणाम व यश–अपयश अभ्यासणार आहोत.
- भारतातील मागासवर्गीय व अल्पसंख्यांक समाजाच्या विकासाकरिता राबवण्यात आलेल्या धोरणांचा व त्यांचा परिणाम अभ्यासणार आहोत.

- भारतीय सार्वजनिक धोरणांमधील महिला सक्षमीकरणासंदर्भातील धोरणांचे विश्लेषण अभ्यासणार आहोत.

या घटकामुळे वरील विषयांचे आकलन आपणास होईल.

## ४.१ प्रस्तावना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने स्वतंत्र संविधान निर्माण करून ते स्वीकारले. स्वतंत्र भारताची वाटचाल एक नवस्वतंत्र, सार्वभौम व धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून सुरू झाली. पारतंत्र्याच्या काळात ब्रिटीश राजवटीत भारतातील सर्व धोरणप्रक्रिया ब्रिटीशांनी त्यांच्या वसाहतवादी राजवटीला पूरक ठरतील अशी राबवली. पारतंत्र्यातील भारत ब्रिटीशांच्या शोषक, स्वार्थी व अन्यायकारक धोरणांमुळे एक राष्ट्र म्हणून अविकसित बनला होता. १५ ऑगस्ट १९४७ साली राष्ट्रीय स्वातत्र्यचळवळीच्या प्रदीर्घ लढ्यातून आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरु यांच्या नेतृत्वात नवभारताची उभारणी सुरु झाली. नवस्वतंत्र भारताची सर्वच क्षेत्रातील जडणघडण संमिश्र अर्थव्यवस्थेतून सुरु झाली.

'कृषी प्रधान व खेड्यांचा देश' अशी प्राचीन ओळख लाभलेल्या आपल्या देशात संतुलित विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण चिकित्सकपणे होणे आवश्यक आहे विशाल भौगोलिक विस्तार, खंडप्राय रचना आणि प्रचंड विविधता असणाऱ्या भारतासारख्या बहुभाषिक बहुधार्मिक, बहुवांशिक देशातील सार्वजनिक धोरण प्रक्रिया ही तितकीच क्लिष्ट व आव्हानात्मक असते.

भारतातील कृषी, उद्योग ही दोन क्षेत्रे आपल्या अर्थव्यवस्थेचे पायाभूत घटक आहेत. या दोनही क्षेत्रांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी स्वातंत्र्य प्राप्तीपासून ते आजपर्यतच्या सर्व सरकारांनी अनेक पातळीवर समाधानकारक प्रयत्न केले आहेत. आपल्या देशातील सार्वजनिक धोरणप्रक्रिया ही देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीमुळे प्रभावीत होते. संसदीय लोकशाही प्रणाली, असणाऱ्या आपल्या देशात धोरण निर्मिती कायदेमंडळाकडून रीतसर वैधानिक प्रक्रियेतून होते. बहुपक्षीय राज्यव्यवस्थेमुळे मत-मतांतरे, चर्चा-वाद, व सर्वसंमतीने होणारी आपली धोरणप्रक्रिया दीर्घकालीन परिणाम करणारी असते. स्वातंत्र्यप्राप्तीला आज ७० वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतातील सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण या घटकांत आपण आपल्या देशातील कृषी व उद्योग क्षेत्रांच्या संदर्भातील धोरणांच्या अभ्यासाबरोबर मागासवर्गीय व अल्पसंख्याक समाजाच्या प्रगती संदर्भातील राबवण्यात आलेल्या धोरणांचे विश्लेषण करणार आहोत. भारतीय राज्यघटनेने ज्या उदात्त व आदर्श ध्येयांचा स्वीकार करुन 'कल्याणकारी राज्य' निर्मितीचा मार्ग आखून दिलेला आहे, अशा सर्वसमावेशक विकासाचे भारतातील चित्र प्रत्यक्षात साकारले आहे का?

याचा अभ्यास आपल्याला या घटकांतून होतो. तसेच कृषी-उद्योग-मागासवर्गीय-अल्पसंख्याक-महिला सक्षमीकरण यांच्या संदर्भात धोरणांचे परिणाम आपणांस समजतील.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ भारतातील कृषी विषयक धोरण

भारत 'कृषीप्रधान' देश आहे. शेती आणि शेतकरी हे आपल्या जिव्हाळ्याचे विषय आहेत. खंडप्राय व प्रचंड भौगोलिक विस्तार असणाऱ्या आपल्या देशातील शेती ही वैविध्यपूर्ण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राबवण्यात आलेल्या कृषी धोरणांमध्ये अनेक चढ-उतार व बदल झाल्याचे दिसतात. उदा. हरितक्रांती.

भारताच्या कृषी धोरणांसदर्भात पं. नेहरु यांचे हे वाक्य खूपच बोधप्रद ठरते, ''Everything else can wait, but not agriculture!'' स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंतच्या चित्रावरुन असे लक्षात येते की, आजही रोजगार आणि उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती हेच आहे. आजही ५३% लोकसंख्या प्रत्यक्षरित्या शेतीवरच गुजराण करते. १९५० पासून भारतातील पंचवार्षिक योजनांचा आढावा घेतल्यास कृषी पूरक धोरणांचे आकलन आपल्याला होते.

- पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९५१-५६) कृषी ला सर्वाधिक महत्व देण्यात आले होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९५६-६१) दरम्यान कृषी आणि उद्योग या क्षेत्रांना केंद्रस्थानी करण्यात आले. यानंतरच्या पुढील पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी क्षेत्राऐवजी उद्योग आणि पायाभूत सुविधा ही क्षेत्रे महत्वाची ठरू लागली. त्यानंतर ६ व्या योजनेमध्ये (१९७४-७९) दरम्यान सर्वोच्च प्राथमिकता कृषीला देण्यात आली. पं. नेहरु नी स्थापन केलेला 'नियोजन आयोग' व 'राष्ट्रीय विकास परिषद' या दोन संस्था प्रामुख्याने धोरणकर्त्या होत्या.

कृषीप्रधान भारतातील ५१% भाग कृषीवर आधारित २१% वने, २४% पडीक व ४% चराई क्षेत्र आहे. कृषी साठी दीर्घकालीन धोरण निर्मितीसाठी भारतात पुढील यंत्रणा कार्यरत आहेत.

१) केंद्रीय कृषी मंत्रालय

२) कृषी मूल्य आयोग

३) भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्ली

४) केंद्रीय कृषी विद्यापीठे

५) राज्य कृषी विद्यापीठे

६) विविध पीक निहय, संशोधन संस्था

७) भारतीय अन्न महामंडळ

'कृषी' हा भारतीय राज्यघटनेप्रमाणे 'राज्यसूची' तील विषय आहे. पं. नेहरुंच्या काळात कृषी क्षेत्रासाठी जल सिंचन खते, बी-बियाणे, कृषी पुरक अनुदाने या मुलभूत गरजांवर भर देण्यात आला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत अन्नधान्याच्या उत्पादनात स्वंयपूर्ण नव्हता. अन्नधान्यांची आयात करावी

लागत होती. आज भारत अन्नधान्याच्या उत्पादनात भरपूर प्रमाणात स्वंयपूर्ण आहे. खाद्यतेल, डाळी या क्षेत्रात आयातीवर अवलंबून रहावे लागते.

- **हरितक्रांती**

भारत सरकारची देशाला अन्नधान्य उत्पादनात स्वंयपूर्ण करण्यासाठी १९६० च्या दशकात राबवण्यात आलेली व बऱ्याच प्रमाणात यशस्वी ठरलेली महत्वाकांक्षी योजना म्हणजे हरितक्रांती होय. लाल बहादूर शास्त्रींच्या कार्यकाळात या योजनेला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन लाभले. गहु, तांदुळ या पिकांचे प्रचंड उत्पादन झाले. शेतीमध्ये रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा प्रभाव वाढला, पंजाब, हरियाना, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांना हरितक्रातींचा सर्वाधिक लाभ झाला हरितक्रांतीच्या सुपरिणामाबरोबर काही दुष्परिणाम ही निर्माण झाले. जसे की, रासायनिक खतांचा बेसुमार वापर, ठरावीक राज्यांनाच अधिक लाभ इ. डॉ. एम. एस. स्वामी नाथन यांना त्यांच्या कृषी संशोधन व हरितक्रांतीतील अमूल्य योगदानाबद्दल आपण 'हरितक्रांतीचे भारतीय जनक' असे संबोधतो.

यासोबत केंद्रसरकार व विविध केंद्रीय मंत्रालयाकडून पुढील कृषी-पुरक उत्पादनवाढीचे धोरण राबवले गेले.

अ) श्वेतक्रांती - दुग्धउत्पादन

ब) नीलक्रांती - मत्स्य उत्पादन

क) रजतक्रांती - अंडी उत्पादन

ड) कृष्ण क्रांती - बायोडीजेल उत्पादन

इ) लाल क्रांती - टोमॅटो व मांस उत्पादन

ई) बदामी क्रांती - मसाला उत्पादन

फ) सोनेरी क्रांती - फळे उत्पादन

भ) अमृत क्रांती - नद्याजोड प्रकल्प

१९८३-८४ साली दुसऱ्या हरितक्रांतीला सुरुवात झाली.

वरील सर्व योजनांमध्ये भारत सरकारची विविध मंत्रालये सहभागी आहेत. उदा. खते व रसायन मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय, पेट्रोलियम मंत्रालय.

१९९१ नंतर नव्या जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या आर्थिक धोरणांमुळे कृषी क्षेत्रासमोर नवी आव्हाने व स्पर्धा उभी राहिली. उद्योग व सेवा क्षेत्राच्या वाढत्या प्रभावामुळे कृषी क्षेत्रासमोर कर्जपुरवठा, हमीभाव, आयात-निर्यातीची चढ-उतार भांडवलाचा अभाव इ. संकटे उभी

राहिली शेतकरी आत्महत्यांचे दुर्दैवी सत्र सुरू झाले. आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. त्यामागे बऱ्याच प्रमाणात कृषी विषयक धोरणांतील त्रुटी दिसून येतात.

अनंत अडचणींचा सामना करत भारतातील कृषी क्षेत्र सक्षम होत आहे. कृषी विषयक धोरणाला प्राप्त झालेल्या यशातील काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे

- भारत आज अन्नधान्याच्या उत्पादनात स्वंयपूर्ण आहे.
- आजही कृषी क्षेत्र सर्वात मोठे रोजगार पुरवणारे साधन आहे.
- खते उत्पादनात भारत जगात ३ ऱ्या क्रमांकावर आहे.
- नत्रयुक्त (युरिया) खत वापरात भारत पूर्ण स्वावलंबी आहे.
- आंबा, केळी, चिकु, काजू, नारळ यांच्या उत्पादनात भारत प्रथम क्रमांकावर आहे.
- फळे व भाजीपाला उत्पादनात भारत दुसऱ्या स्थानावर आहे.
- तांदुळ व गहु उत्पादनात भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

भारतातील सन २०१६ सालच्या केंद्रातील सत्ताबदलानंतर देशाच्या कृषी मंत्रालयाचे नाव बदलून 'केंद्रीय कृषी व किसान' मंत्रालय करून 'डी. डी. किसान' हे नवे कृषी चॅनेल सुरु करण्यात आले. नीती आयोगाच्या स्थापने नंतर कृषी धोरणात नव्या योजना/ उपक्रम सुरु केले. उदा. मृदा आयोग्य कार्ड, ई-नाम (कृषी बाजारपेठ) नीम कोंटिग युरिया, थेट अनुदान योजना इ.

- **भारतीय कृषी धोरणांसमोरील आव्हाने**

भारतीय कृषी क्षेत्र जगातील झपाट्याने बदलणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम करण्यासाठी कृषी धोरणांतील त्रुटी दूर करायला हव्यात. शेतीचे पारंपारिक स्वरुप बदलून नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. हवामान बदल, तापमानवाढ व अवकाळी पाऊस, ऋतूचक्रातील प्रतिकूल बदल या नैसर्गिक परंतू मानवनिर्मित संकटामुळे कृषी क्षेत्र अनिश्चित बनत चालले आहे.

भारतीय कृषी क्षेत्रांमध्ये सर्वाधिक श्रमिक शक्तीचा वाटा कार्यरत आहे तो महिलांचा. त्यामुळे कृषी धोरणांच्या केंद्रस्थानी या कष्टकरी स्त्रियांना स्थान मिळायला हवे. अल्पभूधारक, सीमांत, भूमीहीन शेतमजुर या प्रकारातील शेतकऱ्यांना कृषी धोरणांतून सुरक्षित स्थान प्राप्त व्हायला हवे. सामान्य व कोरडवाहू शेतकऱ्यांची शेती उत्पन्न शाश्वती देणारी व्हावी यासाठी खते, बी-बियाणे, कृषी साहित्य-अवजारे, जलसिंचन सुविधा, कृषी अनुदाने, कृषी प्रक्रिया उद्योग भांडवल सहाय्य या उपाययोजनांमध्ये अजिबात कपात होता कामा नये. देशातील व राज्यातील कृषी विद्यापीठांचे संशोधन हे शेती-शेतकऱ्याला प्रत्यक्षात उपयुक्त ठरेल व ते सर्वसामान्य शेतकऱ्यापर्यंत उपलब्ध व्हावे. कृषी मूल्य आयोग व संशोधन संस्था राजकीय हस्तक्षेपापासून दूर कराव्या लागतील. भारतीय शेती ही

मोठ्या प्रमाणावर कोरडवाहू क्षेत्रांमध्ये असल्याने आपली शेती 'मान्सूनचा खेळ' असल्याचे मानले जाते.

आपल्या कृषी विषयक धोरणांसमोर फक्त देशातर्गंत आव्हाने नसून आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्था-संघटना आपल्या धोरणाला प्रभावित करतात. उदा. WTO च्या नियम निकषाप्रमाणे आपल्याला देशातर्गंत कृषी मालाला अनुदान देणे, हमीभाव, बाजारपेठ उपलब्धता, अन्न सुरक्षा कायदा या कृषी धोरणांना, शेतकरी हिताच्या असली तरी देखिल ही धोरणे रद्द करावी लागण्याची शक्यता वाढते आहे. विकसित राष्ट्रांचा दबाव काही प्रसंगी निर्णायक ठरतो. खुल्या व्यापार धोरणाचे कृषी धोरणाला प्रतिकूल परिणाम पहायला मिळतात.

- **स्वंय अध्ययन प्रश्न**

**रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

अ) ..... यांना भारतीय हरितक्रातींचे जनक म्हणतात.

ब) केंद्र सरकारने ..... हे नवीन चॅनेल सुरु केले आहे.

क) कृषी हा ..... विषय आहे.

ड) हरितक्रांतीमुळे ..... या पिकांचे उत्पादन प्रचंड वाढले.

इ) अमृत क्रांती ..... प्रकल्पाशी संबंधित आहे.

## ४.२.२ औद्योगिक धोरण

**प्रस्तावना**

'कृषीप्रधान' आणि 'खेड्यांचा देश' अशी वैशिष्ट्यपूर्ण ओळख असणाऱ्या भारतातील औद्योगिक धोरणांची मीमांसा करताना आपल्याला भारतातील उद्योग क्षेत्रातील ब्रिटीशांचे धोरण, त्यांच्या कार्यशैलीचा प्रभाव नाकारता येत नाही. पारतंत्र्याच्या काळात ब्रिटीशांनी भारताचे सर्व बाजूने शोषण करत असताना इंग्लडच्या भरभराटीसाठी भारतात व्यापार व दळणवळणाच्या सोयी निर्माण केल्या उदा. रेल्वे. २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतासारख्या अनेक विकसनशील देशांनी औद्योगिकीकरणास सुरुवात केली. आजही बलाढ्य व विकसित मानली युरोपीय व पाश्चात्य राष्ट्रे औद्योगिकीकरणाच्या जोरावर प्रगत व समृद्ध बनले आहेत.

भारत हा आजही २१ व्या शतकात विकसनशील देश म्हणून मानला जातो. भारतीय शेती ही भारतीय लोकांची जगण्याची पद्धत मानली जाते. कृषी हे भारतीय अर्थव्यवस्थेचे पूर्वीपासून आधारस्थान आहे. कृषी क्षेत्र सर्वाधिक लोकसंख्येला रोजगार पुरवणारे क्षेत्र असले तरी आजही भारतात शेतीकडे व्यवसाय-उद्योग म्हणून न बघता उदरनिर्वाहाचे साधन मानले जाते. भारताचे खंडप्राय स्वरुप लक्षात घेता भारतामध्ये कृषी पेक्षा औद्योगिकीकरणालाही काही प्रमाणात पर्यादा

पडतात. स्वातंत्र्यप्राप्तीपासून आपल्या देशातील केंद्र व राज्य सरकारमार्फत उपलब्ध भांडवल व साधन सामग्रीनिशी औद्योगिकीकरणाची प्रक्रिया  सुरु केली नवस्वतंत्र भारतासमोर अनेक आर्थिक व सामाजिक समस्या मोठ्या प्रमाणावर उभ्या असल्याने उद्योग उभारणीसाठी आपल्याला स्वदेशी उद्योजकांबरोबर परकीय राष्ट्रांची मदत घ्यावी लागली. उदा. रशिया, ब्रिटन, जर्मनी, पहिले पंतप्रधान पं. नेहरु यांनी पंचवार्षिक योजना आणि नियोजन आयोगाच्या माध्यमातून नव्या भारताची औद्योगिक उभारणी सुरु केली.

**औद्योगिकीकरणाची आवश्यकता व महत्व**

औद्योगिकीकरण ही एक प्रक्रिया असून शासन स्तरांवरून यासाठी नियाजनबद्धरित्या धोरण राबवण्यात येते. देशाची उत्पादनक्षमता वाढवून उत्पन्न वाढीस चालना देण्यासाठी अधिक-अधिक भांडवलाचा वापर केला जातो. औद्योगिक धोरणांमधून नवीन उद्योगांची स्थापना केली जाते. औद्योगिक धोरणांमध्ये केवळ वस्तुंची निर्मिती करणे व उद्योग-धंदे वाढवणे. एवढाच मर्यादित अर्थ नसतो तर या एकूणच प्रक्रियेतून संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्था व समाजात रचनात्मक परिवर्तन केले जाते. भारतासह जगातील कोणत्याही राष्ट्राला आज औद्योगिकीकरणा शिवाय पर्याय नाही. प्रत्येक देशाचे स्वतंत्र असे औद्योगिक धोरण असते.

भारताने औद्योगिकीकरणासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचे अधिष्ठान स्वीकारुन औद्योगिक धोरण आखण्यात सुरुवात केली. आपल्या देशातील उपलब्ध नैसर्गिक व आर्थिक साधनांचा पर्यांप्त वापर करुन देशातील सर्व राज्यांचा समतोल विकास साध्य करण्यासाठी आणि पर्यायाने जलद आर्थिक विकासासाठी औद्योगिक धोरण अत्यावश्यक असते. याचबरोबर देशाला आर्थिक क्षेत्रांत आत्मनिर्भर करुन रोजगारांच्या संधीत वाढ करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्नांची गरज या औद्योगिक धोरणांतून होते.

- **भारतातील औद्योगिक धोरणांचे विश्लेषण**

भारतात १८७७ साली जमशेदजी शहांनी औद्योगिकीकरणास सुरुवात केली. स्वातंत्र्यानंतर उद्योग क्षेत्रात शासनालाच भाग घेणे आवश्यक होते. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरची भारताची औद्योगिक धोरणे पुढीलप्रमाणे

**१) स्वतंत्र भारताचे पहिले औद्योगिक धोरण १९४८**

६ एप्रिल १९४८ साली तत्कालीन उद्योगमंत्री श्री श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले.  भारतात 'मिश्र अर्थव्यवस्था' स्थापण्याचा निर्णय घेवून सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांचे सहअस्तित्व मान्य करण्यात आले. या धोरणाला संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून १९५१ साली 'उद्योग कायदा' संमत करण्यात आला. कोळसा उर्जा रेल्वे, नागरी उड्डन शस्त्रे व संरक्षण या उद्योगांना केंद्रसूचीत ठेवण्यात आले व कागद, कपडे, औषधी, सायकल या उद्योगांना राज्यसूचीत ठेवण्यात आले.

## २) १९५६ चे दुसरे औद्योगिक धोरण

३० एप्रिल १९५६ च्या या दुसऱ्या औद्योगिक धोरणात भारतात 'समाजवादी समाजरचना' निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. या धोरणांत सार्वजनिक क्षेत्रांचा अधिक विस्तार करण्यात आला.

तसेच उद्योगांचे ३ अनुसूचींत वर्गीकरण करण्यात आले.

- अनुसूची अ- यामध्ये १७ उद्योग क्षेत्रे होती
- अनुसूची ब- यामध्ये १२ उद्योग क्षेत्रे होती
- अनुसूची क- वरील २ अनुसूचींत न बसणाऱ्या उद्योगांना या मध्ये समाविष्ट केले.

या धोरणांत औद्योगिक विकेंद्रीकरणाबरोबर लघू खादी व ग्रामाद्योगांना महत्वाचे स्थान होते.

## ३) १९६९ चे औद्योगिक धोरण

या धोरणांमध्ये खाजगी क्षेत्रांच्या एकाधिकारशाहीला लगाम घालण्यासाठी श्री सुबिमल दल समितीच्या शिफारशीनुसार MRTP(Monopolies and Restrictive Trade Practices Act) हा कायदा संमत करण्यात आला.

## ४) १९७३ चे औद्योगिक धोरण

या धोरणांमध्ये लोह पोलाद, सिमेंट, कोळसा, कच्चे तेल, उर्जा इ. क्षेत्रातील उद्योगांना नवीन 'मुलभूत उद्योग' अशी संकल्पना वापरली जावू लागली. शासकीय व खाजगी क्षेत्राच्या एकत्रित गुंतवणूकीस संयुक्त क्षेत्र स्थापन करण्यात परवानगी देण्यात आली परकीय चलन नियमनासाठी FERA (Foreign Exchange Regulation Act) हा कायदा संमत करण्यात आला. परकीय गुंतवणूकीय विशिष्ट नियमावलीत परवानगी देण्यात आली.

## ५) १९७७ चे औद्योगिक धोरण

जनता दलाच्या राजवहीत हे धोरण जाहीर करुन अनावश्यक क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणुकीवर निर्बंध घालण्यात आले. लघु आणि कुटीर उद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्यासाठी 'जिल्हा उद्योग केंद्राची (DIC) स्थापना करण्यात आली'.

## ६) १९८०, १९८५ व १९८६ सालची औद्योगिक धोरणे

१९८० मध्ये केंद्रात कॉंग्रेस पक्ष पुन्हा सत्तेत आल्यानंतर १९८० चे नवे धोरण जाहीर करण्यात आले. यामध्ये जिल्हा उद्योग केंद्रे चालू ठेवण्यात आली. परकीय गुंतवणूकीस पुन्हा मान्यता देण्यात आली.

वरील धोरणांना अनुसरुन १९८५ व १९८६ चे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.

### ७) नवीन औद्योगिक धोरण– १९९१

२४ जुलै १९९१ ला नवीन औद्योगिक धोरण जाहीर झाले. उदारीकरणाचे हे सर्वात मोठे पाऊल होते. पंतप्रधान नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहनसिंग यांच्या काळात नवीन आर्थिक धोरणाची सुरुवात झाली.

या नवीन औद्योगिक धोरणाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे होती.

१) उत्पादन क्षेत्रात शाश्वत वाढ घडवून आणणे.

२) उत्पादन रोजगार निर्मिती करणे.

३) मानवी संसाधनाचा पुरेपुर वापर करणे.

४) भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढवणे.

खालील क्षेत्रात बदल करण्यात आले.

**१) औद्योगिक परवाना धोरणाचे उदारीकरण**

देशातील विशिष्ट १८ उद्योग सोडून इतर सर्व उद्योग परवानामुक्त करण्यात आले. सध्या फक्त मद्य, तंबाखू, संरक्षण, ज्वलनशील पदार्थ, घातक रसायने या ५ उद्योगांना परवाना घ्यावा लागतो.

**२) सार्वजनिक क्षेत्रविषयक अनारक्षण**

१९५० सालापासून १७ उद्योगांवर केंद्र सरकारचा एकाधिकार होता. १९९१ च्या धोरणांनुसार आरक्षित उद्योगांची संख्या ८ पर्यंत कमी करण्यात आली.

सध्या फक्त अणुउर्जा, अणुखनिज, रेल्वेवाहतूक हे ३ उद्योग आरक्षित आहेत.

**३) परकीय थेट गुंतवणूक व तांत्रिक कराराचे उदारीकरण**

१९९१ च्या धोरणान्वये परकीय थेट गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्यात आले. भारतातील बऱ्याच उद्योंगासाठी स्वयंचलित मार्गाने परकीय गुंतवणूकीस परवानगी देण्यात आली. जाने. १९९७ साली शासकीय मार्गाने होणाऱ्या थेट परकीय गुंतवणूक सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. २००० साली सेझ धोरण जाहीर केले. परकीय गुंतवणूकीस चालना देण्यात आली.

४) १९७३ चा FERA (Foreign Exchange Regulation Act) कायदा परकीय गुंतवणूकीस जाचक ठरत असल्याने या कायद्याची फेररचना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्या अनुषंगांने १९९९ साली FERA ऐवजी FEMA (Foreign Exchange Management Act) कायदा संमत करण्यात आला.

### ५) उद्योगाचे स्थानविषयक उदारीकरण

नव्या धोरणांनुसार १ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहराच्या २५ कि. मी परिसरात कोणताही प्रदूषण न करता उद्योग स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली. प्रदूषणकारी उद्योगांना २५ कि. मी. पेक्षा दूर स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली.

यामध्ये क्षेत्रीय नियंत्रण, भूमी विषयक कायदे, पर्यावरण कायदे मात्र तसेच ठेवण्यात आले. नवा भूसंपादन कायदा करण्यात आला.

थोडक्यात १९९१ च्या नव्या औद्योगिक धोरणाने उद्योगावरील नियंत्रणे दूर करुन बाजारात टिकाव धारण्यासाठी 'मुक्तता व लवचिकता' प्रदान करण्यावर भर दिला आहे. या धोरणाने भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल मुक्त अर्थव्यवस्थेकडे होत गेली.

- **उद्योग क्षेत्राशी निगडित इतर धोरणे**

### १) राष्ट्रीय उत्पादन धोरण – २०११

पुढील १० वर्षात GDP मध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा २५% करणे व १०० मिलियन रोजगारनिर्मिती करणे या उद्देशाने ४ नोंव्हेबर २०११ ला राष्ट्रीय उत्पादन धोरण जाहीर केले.

यासाठी ६ उद्दिष्ट्ये निश्चित करुन उत्पादन क्षेत्रात संख्यात्मक व गुणात्मक बदल होणे अपेक्षित आहे. तसेच यामध्ये ''राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र'' स्थापनेवर विशेष भर दिला.

### २) मेक इन इंडिया

भारताला 'उत्पादनाचे केंद्रस्थान' बनविण्याच्या उद्देशाने गुंतवणूक वाढावी व्यावसायिक वातावरण निर्मिती व्हावी आणि उत्पादनात लक्षणीय वाढ व्हावी. यासाठी केंद्र सरकारने २५ सप्टेंबर २०१४ ला या अभियानाची मुहूर्तमेढ रोवली. या महत्वाकांक्षी अभियानासाठी २५ प्रकारची उत्पादन क्षेत्रे निवडून त्यासाठी कृती आराखडे बनवण्यात आले.

### ३) स्टार्ट अप इंडिया

एखाद्या कंपनीला सुरुवातीची ५ वर्षे स्टार्ट अप उद्योग म्हणतात. १६ जानेवारी २०१६ ला या उद्योगांचे सशक्तीकरण करण्यासाठी Start up India हा कृषी आराखडा तयार केला. या नव्या उद्योगांना निधी सहाय्य व सवलती दिल्या जातात.

### ४) स्टँड अप इंडिया

हे अभियान ५ एप्रिल २०१६ साली सुरू केले. या अभियाना अंतर्गत तळागाळातील पातळींवर व्यावसायिकत्तेस प्रोत्साहन देवून आर्थिक सबलीकरण आणि रोजगार निर्मिती साठी प्रोत्साहन देणे. हे मुख्य ध्येय आहे.

- **भारतातील उद्योग संरचना**

भारतीय उद्योगांचे विविध निकषांनुसार खालील प्रकार पडतात.

१) मालकी हक्कावरुन - सार्वजनिक, खाजगी, संयुक्त, सहकारी उद्योग इ. प्रकार पडतात.

२) आकारावरुन - जड व हलके उद्योग इ.

३) भांडवलावरुन - मोठे, मध्यम, लघु, सुक्ष्म.

४) कच्च्या मालाचे स्रोतावरून - मुलभूत व दुय्यम इ.

- **भारतातील मोठे उद्योग**

१) कापड व कपडे उद्योग, २) साखर उद्योग, ३) ताग उद्योग, ४) सिमेंट उद्योग

५) खत उद्योग, ६) लोहपोलाद उद्योग, ७) कोळसा, ८) पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू

वरीलप्रमाणे सध्या भारतात कार्यरत असणारे मोठे उद्योग आहेत.

- **औद्योगिक क्षेत्राला सहाय्य करणाऱ्या (अर्थपुरवठा) संस्था व महामंडळे पुढीलप्रमाणे-**

१) भारतीय औद्योगिक विकास बँकेची स्थापना १९६४ साली करण्यात आली.

२) १९७१ साली आजारी उद्योगांना पुनर्वसनासाठी, पुनर्निमाणासाठी, भांडवल-पत-व्यवस्थापन-पायाभूत सुविधा देण्यासाठी भारतीय औद्योगिक पुननिर्माण महामंडळाची स्थापना करण्यात आली.

३) १९९७ मध्ये वरील महामंडळाचे रुपांतर Industrial Investment bank of India मध्ये करण्यात आले. औद्योगिक आजारपणावर उपाय करणे व उद्योगांचे पुनर्वसन करणे.

४) १९८७ साली औद्योगिक व वित्तीय पुनर्निमाण मंडळाची निर्मिती करण्यात आली.

५) २ एप्रिल १९९० ला लघुउद्योगांची वाढ व विकास होण्यासाठी वित्तीय सेवा पुरवण्यासाठी Small Industries Development Bank of India ची स्थापना झाली.

**स्वंयअध्ययन प्रश्न २**

**जोड्या जुळवा.**

| | **धोरण** | **आरंभ वर्ष** |
|---|---|---|
| १) | १ ले औद्योगिक धोरण | अ) १९९१ |
| २) | राष्ट्रीय उत्पादन धोरण | ब) १९४८ |
| ३) | FEMA कायदा निर्मिती | क) १९७७ |

४) जिल्हा उद्योग केंद्रे ड) १९९९

५) नवे औद्योगिक धोरण ई) २०११

### ४.२.३ भारतातील मागासवर्गीय समाजासंदर्भातील धोरण

**प्रस्तावना**

भारतातील जातीव्यवस्थेमुळे आपल्या समाजात विषमता व असमानता निर्माण झाली. काही समाजघटक विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिले. या समाजघटकांच्या सक्षमी करणासाठी शासनस्तरावरुन प्रयत्न सुरु आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी १९०२ साली ५०% आरक्षणाची तरतूद केली होती. छ. शाहू महाराजांचे हे पाऊल पुरोगामी व क्रांतिकारी स्वरुपाचे होते. भारतातील आणि महाराष्ट्रातील द्रष्ट्या समाजसुधारकांनी मागास समाजाच्या कल्याणासाठी कार्य केले. यामध्ये म. फुले, डॉ. आंबेडकर, महर्षी वि. रा. शिंदे इ. यांचा उल्लेख करता येईल. देशातील सर्व समाजघटकांचा समन्यायी व संतुलित विकास झाला तरच देशाची सर्वांगीण प्रगती होवू शकते. यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. भारतीय राज्यघटनेने ही मागासवर्गीय समाजघटकांच्या कल्याणासाठी विशेष तरतूद केली आहे.

- **मागासर्वीय समाजासंदर्भात असणारे धोरण**
- **पहिला मागासर्वीय आयोग**

केंद्र सरकारने २९ जाने. १९५३ साली १ ल्या मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली. काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची निर्मिती झाली. सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा निश्चित करुन किती जाती-जमाती मागास आहेत हे निश्चित करण्यासाठी या आयोगाने कार्य केले. १९५५ सालच्या अहवालात या आयोगाने २३९९ मागासवर्गीय जाती जमाती तर ८३७ अतिमागास जातींची वर्गवारी केली. परंपरागत व्यवसाय, लोकसंख्येतील एकूण प्रमाण या निकषांवर या आयोगाने हे वर्णन केले. केंद्र सरकारने हा अहवाल स्वीकारला नाही.

**२) दुसरा मागासवर्गीय आयोग (मंडल आयोग)**

१ जानेवारी १९७९ साली केंद्र सरकारने श्री. बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा निश्चित करण्यासाठी दुसऱ्या मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली. ३१ डिंसेबर १९८० साली मंडल आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला. ११ निकषांवरती या आयोगाने मागासलेपणा निश्चित केला.

१९९० साली तत्कालीन पंतप्रधान श्री. व्ही. पी. सिंग यांनी या आयोगाच्या शिफारशी लागू केल्या. मंडल आयोगाने इतर मागासवर्गीयासाठी नागरी सेवा व सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये २७% आरक्षणाची शिफारस केली.

### ३) स्थायी आयोग

२ एप्रिल १९९३ साली राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना झाली. १९९२ साली इंद्र सोहनी विरुद्ध भारत सरकार या खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने OBC समाजाच्या समस्या व तक्रारींचे निवारण करुन OBC च्या स्थिती व अडचणींचे परीक्षण करण्यासाठी एखादा स्थायी आयोग असावा असे निर्देश केले होते. नवीन OBC जाती जमातींचा यादीत समावेश करण्यासाठी एक यंत्रणा असावी. यासाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेतील कलम ३४१ न्वये राष्ट्रीय मागास वर्ग आयोग स्थापन करण्यासाठी राष्ट्रपतींना अधिकार दिले आहेत. या आयोगामध्ये ५ सदस्य असून याचा दर्जा निमन्यायिक असतो. देशभरातून सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणांची परिस्थिती जाणण्यासाठी हा आयोग कार्य करतो.

### ४) मागासवर्गीय कल्याण योजना

सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास जातीं-जमाती साठी पद्धतशीरपणे कल्याणकारी योजना राबवण्यासाठी १९८५ साली सामाजिक कल्याण हे वेगळे मंत्रालय करण्यात आले. १९९८ साली या मंत्रालयाचे नाव बदलून ''सामाजिक न्याय व सक्षमीकरण'' असे करण्यात आले. या मंत्रालयामार्फत एस. सी., एस. टी., अल्पसंख्याक आणि ओबीसी समाजघटकांसाठी सहाय्य करणाऱ्या योजना राबवण्याची जबाबदारी आहे. याच मंत्रालयामार्फत राष्ट्रीय मागासवर्गीय वित्तीय विकास महामंडळ ही स्वतंत्र व्यवस्था सुरू आहे.

### ५) शिष्यवृत्ती

मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांना दोन प्रकारच्या शिष्यवृत्या दिल्या जातात.

१) **मॅट्रिकपूर्व** - इयत्ता १० वी पर्यंत शिक्षणांसाठी आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातील मुलांना शैक्षणिक आर्थिक सहाय्य दिले जाते.

२) **मॅट्रीकनंतर**- इयत्ता १० वी नंतर पुढील शिक्षणे चालू ठेवण्यासाठी आर्थिक सहाय्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.

### ६) वसतिगृहे

मागासवर्गीय समाजातील मुलांना शिक्षणाच्या ठिकाणी वसतिगृहांची सोय करण्यात आली आहे. उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहांचा अधिक लाभ होतो.

### ७) घरकुल योजना

मागासवर्गीय समाजातील ज्या कुंटुबांना दारिद्र्यामुळे स्वतःच्या निवाऱ्याची सोय नसेल तर इंदिरा आवास व इतर घरकुल योजनांमधून घर बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. भारत सरकार व सर्वच राज्यातील राज्यसरकारे मागासवर्गीय समाजाला मुख्य प्रवाहात आणून त्या समाजातील

शैक्षणिक, आर्थिक, व सामाजिक मागासलेपणा दूर करण्यासाठी विविध कल्याणकारी व प्रोत्साहनपर योजना, उपक्रम राबवत आहे.

## ४.२.३ भारतातील अल्पसंख्याक समाजासंदर्भातील सार्वजनिक धोरण

**प्रस्तावना**

भारत हा बहुधार्मिक, बहुभाषिक व बहुवांशिक अशी विविधता असणारा सर्वांना सामावून घेणारा उदारमतवादी देश आहे. भारतामध्ये बहुसंख्याक हिंदू धर्मीयाबरोबर इतरही धर्मीय गुण्या-गोविंदाने एकत्रित रहात आहेत. भारतीय संस्कृती केवळ संमिश्र नसून त्यामध्ये ''सवधर्मसमभाव व सहिष्णुता'' या उदात्त मूल्यांचा स्वीकार केला आहे. भारतीय राज्यघटनेनेही भारताची उभारणी धर्मनिरपेक्ष व लोककल्याणकारी शासन प्रणालीच्या माध्यमातून केली आहे. भारतामध्ये सर्व समाजघटकांच्या सक्षमीकरणासाठी कोणताही भेदभाव न करता धोरणे राबवली जातात. अल्पसंख्याक समाजामध्ये कोणत्याही प्रकारची उपेक्षेची व मागासलेपणाची जाणीव राहू नये. यासाठी बहुसंख्याकाप्रमाणे त्याही समाजघटकाला सर्वच क्षेत्रात सबलीकरणासाठी प्रयत्न केले आहे.

सामान्यतः आपण अल्पसंख्याक कोणाला म्हणतो तर ज्यांची लोकसंख्या अल्पप्रमाणात आहे. आपल्या राज्यघटनेने २ प्रकारच्या अल्पसंख्याकाचा उल्लेख केलेला आहे.

१) धार्मिक अल्पसंख्याक, २) भाषिक अल्पसंख्याक

- **अल्पसंख्याक धर्म समूह**

भारतामध्ये पुढील धर्म हे अल्पसंख्याकामध्ये गणले जातात.

१) मुस्लिम २) शीख ३) ख्रिश्चन ४) बौद्ध ५) पारसी ६) जैन (२०१४ साली ''अल्पसंख्यांक'' यादीत समावेश)

- **भाषिक अल्पसंख्यांक हे देशातील प्रत्येक राज्यात वेगवेगळे निश्चित केले जातात.**

उदा. महाराष्ट्रात मराठी भाषिक बहुसंख्यांक असल्याने महाराष्ट्रापुरते सिंधी, गुजराती, उर्दू ही मातृभाषा असणारे समूह महाराष्ट्रात भाषिक अल्पसंख्याक ठरतात.

तसेच जर आपण कर्नाटक मध्ये पाहिल्यास कन्नड ही मातृभाषा असणारे बहुसंख्यांक आहेत तर कर्नाटक मधील इतर भाषिक ज्यांची मातृभाषा भिन्न आहे ते भाषिक अल्पसंख्यांक ठरतात.

भारतीय राज्यघटनेने अल्पसंख्यांकाच्या सामाजिक धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक हितसंबंधाचे संरक्षण व्हावे म्हणून तरतूदी केल्या आहेत.

उदा. कलम २९(१) नुसार अल्पसंख्यांक समूह आपली भाषा, लिपी आणि संस्कृतींचे जतन करु शकतात.

- **भारतातील अल्पसंख्यांक समाजा संदर्भातील धोरण**

**१) केंद्रीय अल्पसंख्यांक व्यवहार मंत्रालय**

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात २९ जानेवारी २००६ रोजी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना झाली. या मंत्रालयाला देशातील अल्पसंख्यांकाच्या कल्याणासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबवण्याचा कार्यभार सोपवला आहे. या खात्याचा कार्यभार ही अल्पसंख्यांक समाजातील मंत्र्याकडे असतो.

**२) राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग**

१९७८ साली केंद्रीय गृहमंत्रालयाने स्वतंत्र आयोगा संदर्भात ठराव मांडला होता. ज्यायोगे राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षतेचे संवर्धन होवून अल्पसंख्यांकाना भेदभावाची वागणूक दिली जावू नये. पुढे १७ मे १९९३ साली या आयोगाची निर्मिती झाली. या आयोगाने १९९३ साली ६ अल्पसंख्याक समूहाची निश्चिती केली. या आयोगाचे मुख्य काम अल्पसंख्याकाच्या विकासासंदर्भात राबवण्यात आलेल्या योजनांचे मूल्यमापन, पर्यवेक्षण करणे, अल्पसंख्यांक समाजावरील अन्याय अत्याचारा संदर्भातील प्रकरणांची दखल घेणे, केंद्र सरकारला शिफारशी करणे इ.

**३) भाषिक अल्पसंख्यांक विशेष अधिकारी**

भाषिक अल्पसंख्यांकाच्या हितासाठी जुलै १९५७ साली केंद्र सरकारने स्वतंत्र विशेष अधिकारी या पदाची निर्मिती केली. यांचे मुख्य कार्यालय 'अलाहाबाद' येथे आहे. राज्य निहाय भाषिक अल्पसंख्याक वेगळे आहेत. त्यांच्या हक्क व अधिकाराच्या संरक्षाणासाठी हे विशेष अधिकारी कार्य करतात.

**४) न्या. रंगनाथ मिश्रा समिती**

२००५ साली अल्पसंख्यांक समाजाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करण्यासाठी ही समिती नेमण्यात आली होती. या समितीने मुस्लीमांना शासकीय नोकरीत १०% आरक्षण व इतर अल्पसंख्यांकांना ५% आरक्षण देण्याची शिफारस केली.

**५) राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास आणि वित्तीय महामंडळ**

३० सप्टेंबर १९९४ साली या महामंडळाची स्थापना झाली. अल्पसंख्यांक समाजातील दारीद्ररेषेखालील समाजाला स्वंयरोजगारसाठी प्रोत्याहनपर विशेष सवलती देण्याचे कार्य हे महामंडळ करते अल्पसंख्यांकामधील दारिद्र्य निर्मूलनासाठी आर्थिक स्वावलंबन महत्वाचे ठरते.

**६) मौलाना आझाद शैक्षणिक महामंडळ**

१९८९ साली या महामंडळाची स्थापना झाली. अल्पसंख्यांक समाजातील मुलांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी व अल्पसंख्यांकातील साक्षरतेचे उच्चशिक्षणातील प्रमाण वाढवणे हे प्रमुख

उद्दिष्ट्य आहे. १०० कोटी इतका निधी शासनामर्फत या महामंडळाला मिळतो. या महामंडळाच्या योजनांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

**७) मौलाना आझाद राष्ट्रीय कौशल्य अकादमी**

अल्पसंख्यांक समाजातील युवक युवतींना रोजगारा भिमुख कौशल्य प्राप्तीचे प्रशिक्षण देण्यासाठी या महामंडळाची निर्मिती झाली. तसेच मौलाना आझाद शैक्षणिक फौंडेशन मार्फत शैक्षणिक प्रोत्साहनपर योजना राबवत आहेत.

**८) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ**

२५० कोटीचे भांडवल असणाऱ्या या महामंडळामार्फत अल्पसंख्यांकांना स्वंयरोजगार व शिक्षणासाठी कर्जपुरवठा केला जातो.

**९) सच्चर आयोग (२००५)**

मुस्लिम समाजाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती कशा प्रकारची आहे याचा अभ्यास करण्यासाठी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळात न्या. राजिंदर सच्यर यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने आपला अहवाल लोकसभेमध्ये ३० नोव्हेंबर, २००६ रोजी सादर केला.

**१०) समान संधी आयोग**

फेब्रुवारी २०१४ साली केंद्र सरकारने न्या. राजिंदर सच्चर समितीच्या शिफारशीनुसार समान संधी आयोग स्थापन करण्यात आला. अल्पसंख्यामधील दारिद्र्य बेकारी आणि निरक्षरता या समस्यांना नियोजन बद्ध पणे हाताळण्यासाठी हा आयोग कार्य करतो.

**११) पंतप्रधान १५ कलमी योजना**

विशेषकरून अल्पसंख्याकांच्या सर्वांगिण कल्याणासाठी एक दीर्घकालीन व बहुउद्देशीय कार्यक्रम राबवण्यासाठी या १५ कलमी योजनेची सुरुवात करण्यात आली.

या १५ कलमी योजनांमध्ये शिक्षण, रोजगार राहणीमान, जमातवादी दंगल नियंत्रण या बाबींवर भर देण्यात आला. मुस्लीम समाजातील दारिद्र्य व निरक्षरता नष्ट करण्यासाठी ही योजना उपयुक्त आहे.

**१२) अल्पसंख्याकासाठीच्या राष्ट्रीय योजना**

या अंतर्गत मौलाना आझाद राष्ट्रीय शिष्यवृत्ती ही २००९-१० पासूनची शैक्षणिक योजना आहे. विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत एम. फिल व पीएच.डी साठी ५ वर्षाच्या काळासाठी आर्थिक शिष्यवृत्ती दिली जाते. अल्पसंख्याकामधील युवक-युवतींना उच्च-शिक्षणासाठी या शिष्यवृत्तीचा उपयोग होतो.

**१३) नई मंजिल**

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयामार्फत ''नई मंजिल'' ही योजना २०१७ साली सुरु करण्यात आली. प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षण घेत असताना अल्पसंख्याकामधील जी मुले अर्धवट शिक्षण सोडतात (Drop out) अशा मुलांना रोजगाराभिमूख कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

यासह अल्पसंख्याक समाजातील युवक-युवतींना पोलीस मोफत भरती पूर्व प्रशिक्षण देण्याची सोय आहे.

**स्वंयअध्ययन प्रश्न ३**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पहिला मागासवर्गीय आयोग कधी नेमण्यात आला?

२) मंडल आयोगाने OBC साठी किती प्रमाणात आरक्षणाची शिफारस केली.

३) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना कधी झाली?

- **महिला सबलीकरणाचे धोरण :**

**प्रस्तावना**

प्राचीन वैभवशाली संस्कृतीचा वारसा प्राप्त असणाऱ्या आपल्या देशात पुरुषप्रधान अशा समाज व कुंटुब व्यवस्थेने स्त्रीयांना दुय्यमस्थानी ठेवून त्यांना विकास व प्रगतीची संधी नाकारली. भारतात १९ व्या शतकातच आपल्या समाजसुधारकांच्या कृतिशील प्रयत्नांमुळे महिला सक्षमीकरणाला सुरुवात झाली. आपल्या समाजातील अनिष्ट रुढी, प्रथा व परंपरा ज्या पूर्णपणे मुलभूत मानवी हककाच्या विरोधात होत्या. या प्रथा स्त्रीयांना सर्वाधिक घातक होत्या उदा. बालविवाह, सतीप्रथा इ. भारतीय कुंटुंब व विवाहसंस्थेने स्त्रीला ''चूल आणि मूल'' या क्षेत्रांतच बंदिस्त करून तिला तिच्या मनाप्रमाणे जगण्याची व सक्षम होण्याची सर्व दारे बंद केली. याला 'मनुस्मृती' या स्त्री दास्याचा पुरस्कार करणाऱ्या प्राचीन ग्रंथाचा आधार मिळाला होता.

देशाच्या लोकसंख्येतील ५०% भाग असणाऱ्या महिलांना नैसर्गिक असे मानवी हक्क ही नाकारले गेले होते. लिंगभेद, शारीरिक व मानसिक शोषण, समाजातील असमानता या कारणांमुळे महिलांना दर्जा, संधी व हक्काबाबत नेहमीच दुय्यम व उपेक्षित रहावे लागले. म. फुले, महर्षी कर्वे, सावित्रीबाई फुले, न्या. म. गो रानडे, गो. ग. आगरकर, डॉ. बी. आर. आंबेडकर या थोर व कृतिशील समाजसुधारकांच्या दीर्घकालीन प्रयत्नांतून २० व्या शतकांत महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया गतिमान बनली. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, पं. रमाबाई ॲनी बेझंट, ताराबाई शिंदे या महिला समाजसुधारकांच्या माध्यमातून स्त्रीमुक्तीला प्रारंभ झाला. पारतंत्र्यात

ब्रिटीशांनी ही बालविवाह, सतीप्रथा या संदर्भात कायदे करुन अमानुष प्रथा निर्मूलनासाठी प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्वतंत्र धोरणे निर्माण केली.

**अर्थ आणि स्वरुप**

महिला सबलीकरणाची चळवळ ही महिलांना त्यांचे हक्क, अधिकार मिळवून देवून समाजातील सर्वंच क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने समान संधी व दर्जा मिळवून देण्याची सकारात्मक परिवर्तनाची प्रक्रिया असते. महिला सबलीकरणाचे धोरण हे स्त्री केंद्रीत असते. स्त्रीयांना संधी, दर्जा बरोबर प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याचे मुख्य उद्दिष्ट्य असते. महिला सबलीकरणाच्या धोरणांत स्त्रीयांना त्यांच्या स्वविकासाबरोबर देशांच्या सर्वांगीण विकासात योगदान देता यावे यासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम योजना व कार्यक्रम राबवण्यात येत असतात.

भारतीय राज्यघटनेने मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून ''स्त्री मुक्ती'' व विकासाची मुलभूत रुपरेषाच आखून दिली आहे. स्त्री-पुरुष समानता हे कल्याणकारी राज्य निर्मितीचे अत्यावश्यक अंग आहे. महिला सबलीकरणाचे धोरण हे जरी पूर्णपणे स्त्रीवादी असले तरी ते पुरुषविरोधी नसते. मूळात स्त्री सक्षमीकरण किंवा स्त्री मुक्ती याचा अर्थ पुरुषप्रधान व्यवस्थेवर सूड उगवणे नसून पारंपारिक व सनातनी पुरुष प्रधान व्यवस्थेत प्रबोधनाबरोबर त्याच पुरुषप्रधान व्यवस्थेची मदत घेत स्त्रीयांना सक्षम व स्वावलंबी बनवणे होय.

भारतासारख्या परंपरा प्रधान देशात, जेथे स्त्री ही दुय्यमच असते या रुढीप्रिय मानसिकतेला छेद देत शासकीय धोरणांच्या माध्यमातुन स्त्री सबलीकरण प्रक्रिया घडवून आणणे हे आव्हानात्मक व वेळखाऊ कार्य आहे. आज लष्कर पोलीस, प्रशासन, वाहतूक, शिक्षण राजकारण, विज्ञान आणि कलेच्या क्षेत्रांत स्त्रीचा पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत आहेत. हे आपल्या धोरणाचे यश आहे.

- **महिला सबलीकरण धोरणाची उद्दिष्ट्ये**

**१) स्त्री-पुरुष समता निर्मिती**

महिला सबलीकरणाचे धोरण स्त्रीयांना समाज व कुटुंबात पुरुषांच्या बरोबरीने हक्क व अधिकार प्राप्त करुन राज्यघटनेला अपेक्षित असणारी स्त्री-पुरुष निर्माण करणे.

**२) आर्थिक व सामाजिक न्याय**

समाजातील एक मोठा घटक असणारा स्त्री वर्ग दुबळा व अप्रगत राहिल्यास आर्थिक व सामजिक न्याय प्रस्थापित होवू शकत नाही. सबलीकरणाचे धोरण आर्थिक व सामजिक क्षेत्रांत स्त्रीयांना सक्षम बनवते.

**३) स्त्रीयांवरील अन्याय-अत्याचाराला पायबंद**

आपल्या समाजातील वर्चस्ववादी व पूर्णपणे एकतर्फी असणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेतून स्त्रीयांच्यावर होणाऱ्या सर्व प्रकारच्या अन्याय अत्याचाराला विविध कायदे नियम व जनजागृतीतून पायबंद घालणे.

**४) रोजगारप्राप्ती व मानसिक बौद्धिक विकास**

देशाचे महिला सबलीकरणाचे धोरण हे स्त्रीयांना रोजगाराभिमूख बनवण्यासाठी विविध प्रोत्साहनपर योजना व शिक्षणांच्या संधी उपलब्ध करुन देवून त्यांचा मानसिक व बौद्धिक विकास घडवून देते.

**५) निर्णयप्रक्रियेतील सहभाग व राष्ट्रविकास**

या धोरणांचे सर्वात प्रमुख साध्य म्हणजे स्त्रीयांना ''अबलातून सबला'' बनवणे व समाज कुंटुंब पर्यायाने देशाच्या राजकीय-आर्थिक- सामाजिक व शैक्षणिक निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन राष्ट्राच्या विकासप्रक्रियेला सर्वसमावेशक रुप देणे.

- **महिला सबलीकरणाची साधने**

१) साक्षरता व आर्थिक स्वावलंबन या माध्यमातून स्त्रीयांना प्रगतीची संधी देणे.

२) प्रशिक्षण व जनजागृती या दोन साधनांमध्ये देशात स्त्रीयांना कौशल्यप्राप्तीचे प्रशिक्षण शासकीय व स्वंयसेवी संस्थाच्या माध्यमातून देवून त्यांना स्वावलंबी बनवणे.

३) दबावतंत्र आणि प्रसारमाध्यमे या दोन साधनांच्या माध्यमातून स्त्रीवादी संघटना व संस्था आपल्या न्याय्य व योग्य मागण्यासाठी संघटितपणे दबाव तंत्राचा वापर करतात. या कामी सर्व प्रकारची प्रसारमाध्यमे प्रचार व प्रसारासाठी महत्वाची भूमिका बजावतात.

४) कायदे आणि आरक्षण या दोन साधनांच्या माध्यमातून शासन प्रत्यक्ष कायदे मंडळाच्या सहाय्याने स्त्री सक्षमीकरण व जुनाट, कालबाह्य व अमानुष प्रथा नष्ट करण्यासाठी कठोर कायदे करत असते. आरक्षण किंवा राखीव जागा मुळे स्त्रीयांना सन्मानाने अधिकार व संधी मिळते.

- **भारतातील महिलासबलीकरणाचे धोरण**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने राज्यघटनेने आखून दिलेल्या मार्गावरून नवस्वतंत्र भारताची उभारणी करायला सुरुवात केली. आपल्या देशासमोरील अनेक आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक प्रगतीच्या समस्याबरोबर आपल्या कुटुंब व समाज व्यवस्थेतील स्त्रीयांच्या स्थान, दर्जा व अधिकारांबाबत असणाऱ्या जुनाट व अन्यायी मानसिकतेला नष्ट करत स्त्रीयांना सक्षम बनवणे हे प्रमुख आव्हान होते.

भारतीय समाजाची मानसिकता बदलणे व देशांत सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी शासन स्तरांवरुन विविध प्रयत्न झाल्याचे दिसतात.

**१) भारतीय राज्यघटनेतील तरतुदी**

जगातील सर्वात मोठी व लिखित असणाऱ्या भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या तत्वांचा पुरस्कार केलेला आहे. राज्यघटनेतील भाग ३ व भाग ४ मधील अनुक्रमे मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वांमधून सर्वच समाज घटकांना स्वातंत्र्य-समता-न्याय व दर्जा संधी ची तरतुद केली आहे. सर्वप्रकारच्या भेदभावांना तिलांजली दिली आहे. स्त्रीला ही एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून तिच्या मनाप्रमाणे स्वईच्छेने जगण्याचे व प्रगती करण्याचे हक्क व अधिकार दिले आहेत भारतीय राज्यघटना हा स्त्रीमुक्तीचा जाहीरनामाच मानला जातो. स्त्रीयांच्या कोणत्याही प्रकारच्या शोषणाला कायद्याने प्रतिबंध घातलेला आहे. उदा. अनैतिक व्यापार प्रतिबंध.

१९४२ साली ७६ व्या घटना दुरुस्तीने समाविष्ट करण्यात आलेल्या ''मुलभूत कर्तव्यामध्ये'' एक महत्वाचे कर्तव्य म्हणजे आपण भारतीयांनी स्त्रीयांच्या सन्मान आणि प्रतिष्ठेला बाधा किंवा अडथळा आणणाऱ्या प्रथा परंपराचा पूर्णपणे त्याग करायला हवा. हे स्त्री सबलीकरणाचे तत्व आहे. आपली राज्यघटना भारताचे संमिश्र रुप लक्षात घेवून सर्व समाजघटकांतील स्त्रीयांना ही देशाच्या सर्वसमावेशक विकास प्रक्रियेत सहभागी करण्यासाठी, आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचे शासनाला मार्गदर्शन करते.

**२) भारतीय दंडविधान संहिता** (IPC)

ब्रिटीश काळात तयार झालेल्या IPC मध्ये स्त्रीयांशी निगडीत गुन्ह्यांना व अन्याय अत्याचारातील प्रकरणी कडक शिक्षेच तरतुद करण्यात आली आहे. स्वातंत्र्यानंतर स्त्रीयांवरती अन्याय अत्याचार व शोषण करणाऱ्या अनेक प्रथा नष्ट करण्यात यश आले आहे. उदा. बालविवाह

**३) प्रसुतिहक्क रजा**

अलीकडेच केंद्रसरकारच्या नव्या निर्णयानुसार नोकर करणाऱ्या स्त्रीयांना प्रसुतीकाळासाठीच्या रजेमध्ये वाढ करण्यात आली आहे. १९६१ साली मातृत्व हितरक्षण कायदा तयार करण्यात आला आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना प्रसुती काळात सर्व प्रकारची सुरक्षा पुरवण्यात आली आहे. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांमधील कलम ४२ नुसार प्रसुतिकाळात विश्रांतीची तरतूद आहे.

**४) स्त्री दर्जा अभ्यास गट**

१९७१ साली केंद्र सरकारने स्त्रीयांची स्थिती, त्यांच्या समस्या व स्त्री सबलीकरणासाठी राबवण्यात येणाऱ्या धोरणांचा आढावा घेण्यासाठी एक स्वतंत्र अभ्यास गट स्थापन केला होता १९७२ साली या अभ्यासगटाने स्त्री स्थिती, दर्जा, संधी व समानता याचा अभ्यास करुन अहवाल सादर

केला. ''समानतेकडे वाटचाल'' असे या अहवालाचे शीर्षक होते. स्त्रीयांच्या सबलीकरण धोरणांच्या आखणीसाठी हा अभ्यासगट उपयुक्त ठरला आहे.

### ५) समान वेतन

मार्गदर्शक तत्वांमधील कलम ३९ नुसार स्त्रीयांना पुरुषांसमान समान कार्यासाठी समान वेतन दिले पाहिजे अशी तरतुद आहे. १९७६ साली केंद्राने यासाठी स्वतंत्र कायदा केला आहे.

### ६) स्वतंत्र विभाग

आपल्या देशातील केंद्रीय व राज्य पातळीवर महिलांसाठी स्वतंत्र कार्यभार व धोरण तयार करणारा विभाग म्हणजे 'महिला व बालकल्याण मंत्रालय' होय. शिवाय स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद मध्ये स्वतंत्र महिला व बालकल्याण विभाग व समित्या आहेत. अत्याचारग्रस्त पीडित महिलांसाठी सध्या 'मनोधैर्य' नावाची आर्थिक मदत पुरवणारी महत्वांकाक्षी योजना महाराष्ट्रात राबवली जात आहे.

### ७) अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा

१९८६ साली हा कायदा तयार करण्यात आला. राज्यघटनेतील मुलभूत हक्का मध्ये कलम २३ नुसार मानवी व्यापार व वेठाबिगारी सारख्या व्यवसायांना प्रतिबंध घालण्यात आला आहे. वेश्या व्यवसाय, मानवी अवयव तस्करी यासारख्या अमानवी शोषण करणाऱ्या समाज विघातक गुन्ह्यांना बंदी आहे. स्त्रीयांचे शारीरिक शोषण रोखून लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी हा कायदा उपयुक्त ठरतो.

### ८) सतीबंदी कायदा

१९८७ साली या अमानुष प्रथेला प्रतिबंध घालणारा कायदा केला गेला. पतीच्या निधनानंतर विधवा पत्नीने पतीच्या चितेवर स्वतःला जिंवतपणीच आगीत लोटायचे ही कुविख्यात निर्दयी प्रथा स्त्रीयांना स्वतंत्र जगण्याचा हक्कच नाकारत होती. १९२९ मध्ये ब्रिटीश अधिकारी जनरल बेंटींकने सतीबंदी कायदा केला होता.

### ९) राष्ट्रीय व राज्य महिला आयोग (१९९२)

सद्या आपल्या देशांत केंद्र व राज्यस्तरावर महिलांशी निगडित प्रकरणे हाताळण्यासाठी, उपाययोजना सल्ले सुचवण्यासाठी १९९२ पासून स्वतंत्र राष्ट्रीय व राज्य महिला आयोग कार्यरत आहेत. हा आयोग दरवर्षी आपले निरीक्षण व अभ्यास अहवाल केंद्रसरकारकडे सादर करतात. विशेषतः महिला अत्याचाराशी निगडित विषयांवर आयोग तत्पर व कठोर भूमिका घेतात.

### १०) ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती

भारतीय संसदेने ७३ वी (१९९२) व ७४ वी (१९९३) घटनादुरुस्ती संमत करून महिलांना स्थानिक व शहरी स्वराज्य संस्थामध्ये $^{१}/_{३}$ जागा राखीव ठेवल्या. पुरुषी वर्चस्वाच्या राजकारणाला या

राखीव जागांच्या धोरणांमुळे मर्यादा आणल्या. २०११ पासून केरळ, महाराष्ट्र या राज्यांत स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद) व महानगर पालिका, नगर परिषदेमध्ये महिलांना ५०% जागा राखीव ठेवल्या आहेत. महिलांना राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची कायद्याने प्राप्त करुन दिलेली ही मोठी संधी आहे.

- **महाराष्ट्रातील महिला सबलीकरणाचे धोरण**

१९९४ साली स्वतंत्र महिला धोरण आखाणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. महाराष्ट्राची पुरोगामी व परिवर्तनाचा इतिहास असणारी परंपरा यामुळे देशासमोर आली. या धोरणांअंतर्गत माहेर योजना मदत केंद्रे, अन्नपूर्णा योजना अशा उपयुक्त महिला केंद्रीय उपक्रमांना सुरुवात झाली.

२००१ साली नवे सुधारित धोरण तयार केले गेले. या अंतर्गत स्वंयसहाय्यता गट, साक्षरता कार्यक्रम आयोग्य सुविधा, प्रसाधनगृहे, पाळणाघर या सुविधा महिलांसाठी सुरू झाल्या. या धोरणाअंतर्गत महिलांना शासकीय नोकरी व उच्चशिक्षण क्षेत्रांमध्ये ३०% जागा राखीव ठेवण्यात आल्या. प्रसुतिकाळातील रजेमध्ये वाढ करण्यात आली.

मे २०१४ साली केंद्रात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या सरकारने देशाच्या महिला धोरणांत नव्या स्वरुपाच्या योजना व उपक्रम सुरु केले.

उदा. बेटी बचाओ बेटी पढाओ

२००५ साली केंद्र सरकारने ''कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा करुन कुंटुंबातील लोकांकडून स्त्रीयांना सहन कराव्या लागणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधात कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.''

वरीलप्रमाणे भारतात शासन स्तरावरुन महिला सबलीकरणासाठी कायदे, नियम व योजनांच्या माध्यमातून सक्रिय प्रयत्न सुरू आहेत.

परंतु भारतासारख्या परंपराप्रिय व रुढीवादी मानसिकता असणाऱ्या देशांत महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही दीर्घकालीन चालणारी असून ती सहजसाध्य नसल्याचे दिसते.

- **स्वंयअध्ययन प्रश्न ४**

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा?**

१) स्थानिक स्वराज संस्थामध्ये महिलांना ..... आरक्षण आहे.

२) स्वतंत्र महिला धोरण राबवणारे ..... देशातील प्रथम राज्य होय.

३) स्त्री दर्जा अभ्यास गट ..... झाली नेमण्यात आला.

४) १९ व्या शतकांत ..... या समाजसुधारकाने महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले.

५) ..... या साली समान वेतनाचा कायदा करण्यात आला.

## ४.३ पारिभाषिक शब्द

**१) पंचवार्षिक योजना**– स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पं. नेहरु यांनी देशाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी रशियाच्या धर्तीवर १९५० पासून दर ५ वर्षांचा विकास आराखडा तयार केला.

**२) हरितक्रांती**– भारतीय कृषी क्षेत्रासाठी १९६५ नंतर अन्नधान्य उत्पादन वाढीसाठी राबवण्यात आलेला दीर्घकालीन कार्यक्रम/ अभियान.

३) WTO (World Trade Organization) – जागतिक व्यापार संघटना मुख्यालय जीनिव्हा.

**४) समाजवादी समाजरचना** – उत्पादनांच्या सर्व साधनांची मालकी सरकारकडे घेवून सर्व समाजात संपत्ती व साधनांचे समान वाटप करणे.

**५) अल्पसंख्याक**– एखाद्या देशातील अथवा समाजातील असा समाजघटक जो बहुसंख्याक समाजांच्या तुलनेने संख्येने अल्प असतो.

**६) स्त्रीमुक्ती**– स्त्रीयांना सर्व प्रकारच्या सामाजिक, धार्मिक आर्थिक व राजकीय बंधनातून मुक्त करत स्वविकासाची पूर्ण संधी देणे.

## ४.४ स्वंयअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**१) स्वंयअध्ययन प्रश्न १**

**रिकाम्या जागा भरा.**

अ) डॉ. एम.एस. स्वामीनाथन

ब) D. D. Kisan

क) राज्यसूची

ड) गहु व तांदूळ

इ) नदीजोड

**२) जोड्या जुळवा**

१) १९४८

२) २०११

३) १९९९

४) १९७७

५) १९९१

**३) एका वाक्यात उत्तरे**

१) १९५३

२) २७%

३) १९९३

**४) रिकाम्या जागी योग्य शब्द**

१) ५०%

२) महाराष्ट्र

३) १९७१

४) म. फुले

५) १९७६

## ४.५ सारांश

'भारतातील सार्वजनिक धोरणांचे विश्लेषण' या घटकामध्ये आपण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात राबवण्यात आलेल्या पुढील मुख्य धोरणांचा अभ्यास केला.

१) कृषीविषयक धोरण, २) औद्योगिक धोरण, ३) मागावसवर्गीय व अल्पसंख्यांक समाजासंदर्भातील धोरण, ४) महिला सबलीकरणाचे धोरण.

सदर धोरणांच्या विश्लेषणावरून आपणास भारतातील सार्वजनिक धोरण निर्मिती व त्यांची अंमलबजावणी कशा प्रकारे होते याचे आकलन झाले असेल भारतासारख्या विकसनशील देशांसमोर अनेक आव्हाने आहेत. तरीही भारताची वाटचाल सर्वसमावेशक विकासाचे धोरण स्वीकारुन होत आहे. आज स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या ७५ वर्षात आपल्या भारताचे चित्र लक्षात घेतल्यास भारताने वरील सर्व क्षेत्रांत तुलनेने समाधानकारक यश मिळवले आहे. कृषी क्षेत्रांसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. कृषीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पाची मागणी होत आहे. भारतीय उद्योग क्षेत्र नव्या स्पर्धेत सक्षम होण्यासाठी झगडत आहे भारत आज शेजारी राष्ट्रांना वीज व अभियांत्रिकी वस्तू निर्यात करतो. अजुनही या दोन क्षेत्रात आपल्याला बराच पल्ला गाठायचा आहे.

मागास समाज घटक व अल्पसंख्याकांना सक्षम करण्यासाठी शासन व प्रशासन पातळीवरुन प्रयत्न सुरू आहेत. परंतु आजही अल्पसंख्याक समाजघटक मोठ्या प्रमाणावर मुख्य विकास

प्रवाहापासून वंचित असल्याचे विविध अभ्यासगट सांगतात. महिला सक्षमीकरणासाठी अजुनही कायदे, नियम यांपेक्षा आपली संस्कृती व जुनाट मानसिकता त्यागावी लागेल. आपला देश आज या सर्व आव्हानांना तोंड देत सर्वांगीण विकासाचे चित्र साकारत आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

- **टीपा लिहा.**

  अ) हरितक्रांती

  ब) कृषी मूल्य आयोग

  क) उदारीकरण

  ड) सार्वजनिक उद्योग

  इ) भाषिक अल्पसंख्याक

  ई) कौटुंबिक हिंसा

- **सविस्तर उत्तरे लिहा.**

  १) भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे योगदान स्पष्ट करा.

  २) भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण स्पष्ट करा.

  ३) राष्ट्रीय मागासवर्ग आयोग रचना, अधिकार व कार्यपद्धती स्पष्ट करा.

  ४) महिला सक्षमीकरणाची साधने चर्चा करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) डॉ. प्रकाश पवार, २०१० सार्वजनिक धोरण- संकल्पना सिद्धांत आणि भारतीय सार्वजनिक धोरणांचा आढावा, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२) Rathod P. B., 2005, framework of public policy: the Discipline and Dimensions, New Delhi oxford University press.

३) भारतीय संविधान आणि राजकारण- तुकाराम जाधव, युनिक अकादमी, पुणे.

❒❒❒